THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192553
UNIVERSAL LIBRARY

# विद्या आणि वारुणी

[ सामाजिक कादंबरी ]

लेखक

दिवाकर कृष्ण

आवृत्ति पहिली ] १९४४ [ मूल्य २॥ रुपये

मॉडर्न बुक डेपो, प्रकाशन

प्रकाशक—

मा. त्र्यं. भिडे,

मालक, मॉडर्न बुक डेपो, पुणें २.

"दिवाकर कृष्णा"ची इतर पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| समाधि व सहा गोष्टी | रु. | १ |
| तोड ही माळ | ,, | १ |
| किशोरीचें हृदय | ,, | १। |
| रूपगर्विता व सहा गोष्टी | ,, | १। |

मुद्रक—

भ. पं. सोमण,

मॉडर्न प्रिंटिंग प्रेस,

३९१, नारायण, पुणें २.

# विद्या आणि वारुणी

## : : : : : प्रकरण १ लें

" शिक्षण आणि विचार यांनीं पुनीत झालेल्या मनाने जे न्याय्य आणि चांगलें म्हणून ठरविलें त्याप्रमाणें न वागता येणे म्हणजेच दास्य. "

विद्या आपले विसगत विचार सुसगत शब्दांत स्वतःशींच मांडू पहात होती. तिनें ते आपल्या अस्फुट मधुर वाणीनें वायुलहरीवर मांडले एवढेंच नव्हे, तर आपल्या नाजुक एकवल्याकित हातानें सुवर्णांकित झरणीनें जवळील नोटपेपरवर स्थिर केले.

धाडकन् दार उघडून पुष्पा हिरेमठ आत आली.

" ओहो ! विद्यादेवी चौधराणी ! – हांऽ – ह – ह ? "

तिनें तो कागद ओढून घेण्याचा प्रयत्न केला.

कुशल नर्तकी तालावसानी जशी गिरकी घेते तशी विद्येनें घेतली. तिच्या काळया केसाच्या शेवटाला बाधलेल्या हिरव्या फितींनीं वर्तुळें निर्माण केली. निळे डोळे, गोरे गाल आणि लाल इयररिंग्ज यांच्या छटांचीं द्वंद्वें झाली. 'छट' असा आवाज डाळिंबी दात आणि गुलाबी ओठ यांनीं सहकार्यानें काढला. इंद्रधनुष्याच्या रगाच्या वसनानें वावटळीप्रमाणे अल्पकालीन अशातता धारण केली आणि समेवर पडलेल्या थापेप्रमाणें पाढऱ्या क्रोमच्या वाहणेने फटकार केला.

" शकुंतला पत्रलेखन ! "

" नॉन् सेन्स् "

" तव न जाने हृदय मम पुनः कामो ऽ– "

" पुष्पा ! "

" मग दाखव तर काय आहे ते. "

खालीं कोणींतरी हाक मारली.

" ए पुष्पा ऽ ! ... " ती गॅलरींत गेली.

" एनो बरती एनु "

" बरुदिह्ला. "

अर्धवट ऐकू आलेला दुसरा प्रश्न.

" विदिगे...चिंतिह्ला...हेळतिनी. "

पुष्पेनें दारात येऊन विचारलें,

" काय ग ? दाखवायचय् कीं नाहीं ? "

" नोन्. "

" थाब, सुब्बीला, कुमुदला आणि सगळया जणींना जमा करतें. "

ती पुन्हां व्हराड्यात जाऊन हाका मारू लागली. " ए सुब्बी—"

" ए ऽ ऽ नको ग. "

" मग दे तो कागद इकडे. "

" कोणाला दाखवणार...सांगणार नाहींस ? "

" हुं ऽ ऽ "

तिनें तो कागद तिच्या अगावर फेकला आणि खिडकीतून बाहेर पहात म्हटलें:—

" डोण्ण मेणशिनकाई कुठली !

पुष्पानें ते लेखन पहिल्यानें मनांत आणि नतर मोठ्यानें वाचलें आणि म्हटलें:—

" अय्या ! लेक्चर आणि तत्त्वज्ञान ! पण बाईसाहेब, कुठ सुचली ही !"

बराच वेळ उत्तर आले नाहीं तेव्हा ती जवळ गेली. विद्येच्या डोळ्यांत आणि गालावर तिने अश्रु पाहिले आणि ती विरघळली.

" काय ग, काय झाल ? "

काहीं न बोलता टेबलाच्या ड्रॉवरमधून एक पत्र काढून तिनें तिच्यापुढें टाकले. खिडकीच्या दारावर डोकें टेकून शून्य दृष्टीनें ती बाहेर पहात राहिली.

पत्र वाचून पुष्पाचा चेहरा प्रफुल्लित झाला आणि ती प्रथम हळुहळु आणि नतर खड्या आवाजात आलाप घेऊ लागली.

" पाटलाची व्हनार ही सू ऽ न ऽ —"

" शटअप् पुष्पा ! तुला काहीं काळवेळ कळते का ग ? " विद्या एकदम् वळून म्हणाली.

" कशी कळेल ! " ती पुन्हा आलाप घेऊ लागली.

" बाई मी भोळी. आपले मनात ऽ ग ऽ " तिनें दोन्ही हातानीं तिचे गाल दाबले आणि तिचे आलाप शीळेसारखे निःशब्द निघू लागले.

" गप ग; नाहीतर तू माझी मैत्रीण नाहींस. "

" आतां काय करायचीय मैत्रीण ? "

आणि थट्टेचें बोलणें हितगुजांत पर्यवसित झालें ते त्या मैत्रिणी—अगदीं जिवलग मैत्रीणी असल्याशिवाय का !

पुष्पा हिरेमठ ही शहापुरच्या सावकाराची मुलगी. अगदीं बालपणापासून विद्येबरोबर वाढलेली – खेळलेली. विद्या नेहमी आपल्या आजोळी बापूजी नाईक कुरुदवाडकर यांच्याकडे पुष्पाच्या शेजारच्या घरांत राहात असे.

त्या दोघी मैत्रिणींत तसें पाहिलें तर साम्य असें काय होतें बर ? विद्या अति चपळ, सडपातळ, तरतरीत. – बापुजी नाईक तर तिला फटाकडी म्हणूनच संबोधत.

पुष्पाच्या वयःसंधीचा विकास जरासा भारदस्त होता. तिच्या स्थूलतेंत प्रमाणबद्धता, मांसलतेंत नाजुकपणा, गोमटेपणात नीलच्छवी, काळ्या डोळ्यात तेज, भुऱ्या केसात कुरळेपणा आणि आवाजात माधुर्य—कमालीचें गांधाराचें माधुर्य—होतें. तिचीं मास्या आळापानीं म्हटलेलीं गाणी डोलायला लावत. तिनें सहज विचारलेला प्रश्न लाडिकपणाचा पडत असे.

विद्या तेजस्वी, कुशाग्र आणि चपळ तर होतीच पण आपल्या चपलपणाचा तिला मोठा अभिमान असे. बाळपणीं पुष्पाच्या वाड्याच्या प्रशस्त अगणात शिवाशिवी खेळताना ती कुणालाही सापडत नसे आणि बाकीच्या मुलींच्या वर तीनतीनदा डाव येऊन गेला तरी ती स्वतः अशीव राही आणि मग म्हणे, 'कोरा कागद काळी शाई, अजून काहीं भिजली नाहीं.' अंगावर डाव आलेल्या मुली या दर्पोक्तीनें तिच्याच मागें लागत. तिच्या झुकांड्यानीं गिरक्या घेत स्वतःही दमत आणि तिलाही दमवीत.

पुष्पा, सुखात शिस्तींत प्रीतीच्या पखरणीखाली वाढलेली. तिचें घराणें तिच्या जातींत सुधारलेले, व्यापाराचा जम बसलेला आणि चतुर आईची लाडीक देखरेख; हवेसें वाटेल ते मिळण्याचा आनंद, सुदृढ प्रकृति, साजूक खाणें, शाळा आणि शिकवणी, खेळ आणि गाणीं—निष्काळजी जीवन, निरागस वृत्ती, मनमिळाऊ स्वभाव—आणि काय नाहीं !

विद्या ही बापूजी नाईकाच्या मुलींची मुलगी. तिचे वडील दादासाहेब चौधरी मोगलाईत औरंगाबाद जिल्ह्यात, शेवर्ती नावाच्या एका लहान गांवीं एक मोठें मातबर जमीनदार होते. बापूजी नाईकाचे घराणें जुनें प्रसिद्ध जमीनदारींचेंच पण आज त्याची स्थिति केवळ सुखवस्तूच राहीली होती. काहीं शेतीवाडी, काहीं सावकारी आणि बाकी मामलेदारीचा पगार यावर त्या गांवांत ते इभ्रतेनें राहात होतें. लहानपणीं जाणते अजाणते अशा वयात तिची आई तिला सोडून गेली आणि तें अर्भक पाखरासारखें भिरभिरत नानातऱ्हेच्या प्रश्नानीं भंडावून दादासाहेबांना अधिकच दुःखी करू लागलें.

त्यांनीं तिला आजोळी पोंचविली. कालांतरानें ती आईला विसरली खरी, पण बापूजी नाईकानाच तिचा लळा लागला. पुढें शिक्षणाचेंही निमित्त झालें.

विद्येचें आपल्या आजीशीं कधींहि जमलें नाहीं– तिच्या मनासारखी ती कधींही वागली नाही. नुसता वाद घाली. आपल्या मनासारखी वागे. नको म्हणत असताना वागे. तिला माहीत होतें कीं बापूजीकडे तक्रार गेली तरी निकाल एकपक्षी निश्चित. शेवटीं आजीनेंच विचारीनें मिळतें घेतलें. इतकें कीं जी हिरेमठांच्या घरीं पाणी पिऊं नको म्हणून विद्येला रागें भरीत असे तिला ती त्यांच्या घरीं राहिलेली चालू लागली. विद्येनें कधीं ऐकलें असे नाहींच.

ती आजोळीं राहिली हें बरेंच झाले. दादासाहेबांचा करारी स्वभाव आणि विद्येची अवखळ बडखोरीची वृत्ति याचे तिळमात्र जमलें नसतें. सुटींत वगैरे आली म्हणजेही ती उछृखल वागेच; पण तें लाडीकपणाचें नावानें खपून जाई.

दूर राहिल्यामुळेंच दादासाहेबाना आपल्या मुलीबद्दल एकप्रकारें अपूर्व अतितीव्र जिव्हाळा वाटू लागला होता. त्यामुळें त्यांनी दुसरें लग्न केलें नाहीं. वार्धक्याची छाया पडू लागली तसें त्यांना वाटूं लागलें कीं मुलीचें लग्न लवकर सुस्थळीं करून टाकावें आणि तिच्या मुलाला आपला वारस ठरवून ठेवावें.

विद्या आणि पुष्पा एकदमच मॅट्रिक झाल्या. पुष्पाच्या मामाला मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें छोटीशी नोकरी होती, त्याच्याकडे ती पुढील शिक्षणासाठीं राहिली आणि विद्येलाही तिनें हट्टानें आपल्याबरोबर नेलें. मुंबईत त्या दादर येथें हिंदु कॉलनींत राहात. त्याच्या चाळींत मराठी व कर्नाटकी दोन्ही प्रकारचीं बिऱ्हाडें होतीं आणि मुंबईच्या त्या धादलीच्या जीवनांत विद्येला पहिल्यापहिल्यानें तर फार मजा वाटे.

दादासाहेबाचें अचानक पत्र आलें कीं तुझें लग्न ठरवणें आहे तरी तावडतोब निघून ये. दादासाहेबानीं बोलाचाली आणि इतर व्यवस्था करण्यासाठीं बापूजी नाईकानाही बोलावलें होतें.

आणि हेंच विद्येच्या अश्रूचें, मल्लतेचें आणि त्राग्याचे कारण होतें. या हुकुमशाहीचा अवमान करण्यासाठीं तिचें मन स्वतःला चिथवीत होते.

कितीतरी सिद्धांत तिनें आपल्या मनाशीं कायम केलें होतें पण त्यांची प्रमेयें मात्र जशीच्या तशींच, " न सुटलेलीं कोडीं " राहीली होतीं.

एकः—कीं तिचा कागद कोरा आहे. असेल ! पण तें तिचें जिवालाच माहीत.

दोनः—हा आयुष्याचा स्वच्छंद बहरता बागडता नवथर वसंत इतक्यात सरता करण्याची काय एवढी घाई ? हो; पण हे तिच्या हातीं कोठें होते.

तीनः—शिक्षण आणि विचार यांनीं पुनीत झालेल्या मनानें जें न्याय्य आणि चागले म्हणून ठरविले, त्याप्रमाणें वागता न येणे म्हणजेच दास्य.

नायमात्मा प्रवचने न लभ्यो न मेधया वा बहुना श्रुतेन ।

घटकाभरानें विद्येचे अश्रु मुक्तबंध होऊन अवखळपणें वाहूं लागले, तिला वाटलें आपल्या प्रतिकारशक्तीवरचा विश्वास वितळून विरघळून जात आहे. कांहीं रहस्य असे नव्हतेंच मुळीं. पण जें काय मनांत होतें तें तिनें पुष्पाजवळ बोलून दाखविलें.

"मग काय ? तू आतां मोठी जहागीरदारीण होणार तर !"

"पुष्पा तुला कांहीं अक्कल आहे का ग !" विद्या चिडून म्हणाली. "इतका वेळ मी काय सागतें आहे अन्——"

"होय; तूं सागते आहेस कीं तुझी जाण्याची इच्छा नाहीं आणि लग्न करण्याची तर मुळींच नाहीं."

"हो, हो; आणि आय् मीन् इट्".

"दादासाहेबानीं बापूजींनाही बोलाविलें आहे. बापुजी तुला घेऊन जायला आले तर तू काय करशील ग ?"

पण ते आले नाहींत. त्यांनीं दुसरे दिवशीं तार केली की, "मी आज सकाळचे गाडीनें निघतों आहे. तू उद्या सकाळीं पूना मेलनें पुण्याला ये. स्टेशनवर येतों."

बंधनाचें हें असें आहे. बंधनें सोडल्याशिवाय मुक्तता नाहीं आणि मुक्त झाल्याशिवाय बंधनें सोडताच येत नाहींत.

जाळ्यात अडकलेल्या मधुमक्षिकेची प्रत्येक धडपड तिला जास्त गुंतविण्याला कारण होते.

दलदलींत फसलेल्या माणसाचें प्रत्येक पाऊल त्याला जास्त खोलांत नेऊं लागतें.

आणि प्रेमांत ? – हीच ती वारुणी – ही माया आकाशालाही आवरून राहिली आहे.

त्या दोघी मैत्रिणींचे आणखी पुष्कळ बोलणें झालें, पण तारेप्रमाणें दुसरे दिवशीं सकाळीं निघावें याशिवाय दुसरा निर्णय त्याना काहीं सुचला नाहीं. "कोरा कागद काळी शाई अजून काही भिजली नाहीं." असें बालवयाच्या स्वच्छंद आनंदाच्या अजाण अभिमानानें नाहीं, तरी मुग्ध नवयौवनाच्या साकूत मधुर कोमल कूजितानें विद्या आपल्या मनाशीं आणि क्वचित् आपल्या मैत्रिणींशीं म्हणेच. तसें आजही झालें.

"पण कोऱ्या कागदाचा हा अभिमान" पुष्पा पुन्हां परिहासानें म्हणाली– "ही जाहीरात–ही पताका–अशी फडकवत फिरूं नये अं ! काय नेम केव्हा काय अन् कोण —"

वाक्य पुरें होण्यापूर्वीं विद्येनें तिला गुदगुल्या करून गप्प बसविलें.

विद्येनें आपल्या मैत्रिणीला निक्षून सांगितलें कीं, "मी उद्यां जरी जात असलें तरी आपलें स्वातंत्र्य कायम ठेवण्याचा माझा अगदीं निर्धार आहे. त्यासाठीं मी काय वाटेल तें करीन–आणि–बघशील मी लगेच परत येतें कीं नाहीं."

## प्रकरण २ रें

दुसरे दिवशी दादरच्या स्टेशनवर पूना एक्स्प्रेसची वाट पहात आपल्या मैत्रिणींबरोबर इतस्ततः फिरणाऱ्या विद्येची प्रसन्नता प्रभातकाळचा परिणाम आहे असें तिला पोंचवायला आलेल्या पुष्पाला वाटत असलें, तरी तिला स्वतःला ती वादळानंतर आलेल्या समुद्राच्या शांततेसारखी वाटत होती. आपण जें योजिलें आहे तें साधलें नाही तर? अशा विचाराच्या वाऱ्याची एखादी झुळूक, सुळुक करून तिच्या मनाच्या जलपृष्ठावरून रोमांचकारी शीत-तुषार उडवीत निघून जात असे. पण तो विचारसुद्धां त्या तुषारवाही वायु-लहरीप्रमाणें अंतर्यामीं सुखदायीच होता

आणि पुष्पाचें विशेष लक्ष वेधलें तें तिच्या अत्यंत आकर्षक प्रसाधनाकडे. तो एक विद्येच्या करमणुकीचा विषय – छंद म्हणा–पहिल्यापासून होताच; पण मुंबईला आल्यापासून हा तिचा अभ्यासाचा विषय झाला होता, आणि मुंबईला तिला क्षेत्र काय कमी?

प्रसाधनांच्या बाबतींत तिचे कांहीं नियम–सिद्धांत म्हणा ठरलेले होते. ती म्हणे, "आपली मोहकता कुणाच्याही मनावर परिणाम करीत असतांना,

त्याला ती कशानें जनित आहे हें कळता कामा नये. नकळत उत्तेजित करणें हेंच चांगल्या टॉयलेटचें गमक आहे."

या कृत्रिम मोहकतेच्या बाबतीत विद्येला किती कल्पनेच्या बाहेर यश येते हे पुष्पानें अनेक वेळां पाहिलें होतें. पण आजचे तिचे निबधन तिला अगदीं अलौकिक वाटलें.

कांहीसुद्धा तसे त्यात विशेष नव्हतें आणि सदोषता काही थोडी नव्हती. तिच्या हातातलें रिस्टवॉच तसे म्हटले तर स्त्रियांच्या फॅशनच्या मानानें जरा मोठें होतें पण ते केवळ त्याच्या ऑल-रेझिस्ट या नावावर फिदा होऊन मुंबईला येतांच तिनें फेवर ल्यूबात विकत घेतले होतें. केवळ नावामुळें तिला प्रिय झालेलें दुसरें प्रसाधन म्हणजे ब्यूरजॉयचे पॅरिसमधील सायकाळ नावाचें.

तिच्या केसाच्या रचनेंत मात्र वैशिष्ट्य होतें खरें. एक वेणी, दुवेणी किंवा त्रिवेणी ही नेहमींची कोणतीच पद्धत न स्वीकारता तिनें आपल्या केसाच्या अनेक वेण्या गुफून, त्या मरव्याच्या पानांसह अशा सुबक रितीनें एकमेकींत खोवून दिल्या होत्या कीं, त्याकडे सारखे पहातच राहून यामध्यें हिचा किती वेळ गेला असेल, याचाच कुणीही विचार करीत राहिलें असतें. व्हॅनिशिंग क्रीम पुष्कळ मुली वापरतात, पण तिचीं नखें क्युटेक्सनें आणि ओठ टेन्जीनें अलंकृत—अगदी नकळत का होईना—होतें. तिचा बिनबाह्याचा ब्लाउझ कुशल निरीक्षकाला शार्मरेन्च्या मासीजचे आणि अकुशलाना ४७११ च्या सुगंधाचे अस्तित्व सूचित करीत होता.

पुष्पानें इकडे तिकडे पाहिले तेव्हा तिला जवळच्याच बाकावर बसलेला एक तरुण अनिमिष नेत्रांनीं आपणाकडे— आपल्या मैत्रिणीकडे पहात आहे असें वाटलें.

गाडी येण्याची सूचना झाली आणि प्लॅटफॉर्मवरील सर्व प्रवासी एकचित्त झाले. हमालानें झटकन् विद्येचें सामान नेऊन एका सीटवर ठेवलें. उभयतां

मैत्रिणींनीं खिडकीतून परस्परांशीं सविनोद, सविभ्रम, सलास्य अशा नर्मोपालभांची देवाण घेवाण केली आणि पुष्पानें दुसरें कांहीं करावयास राहिलें नाहीं म्हणून पुनरपि त्या तरुणाकडे पाहिलें. विद्येच्या डब्याच्या दाराशीं तो उभा होता. त्याची चर्या किंचित् चलचित्त, अनिर्णीत (इर्रेझोल्यूट) आणि मार्दवयुक्त अशी तिला वाटली. कुतूहलानें ती त्याच्याजवळून गेली.

विद्या आपल्या डब्याच्या उघड्या दारात बेफिकीरपणें उभी होती. तिनें एक पाय जवळच्या सीटच्या टोंकावर ठेवला होता. डब्यांत आलेल्या लोकांनीं आपल्या सामानाची जमवाजमव चालविली होती. गाडी सुटण्यापूर्वीचीं कांहीं मिनिटें म्हणून प्रवाशांची चढउतार बद झाली होती. पुष्पाला वाटलें त्या तरुणाला डब्यांत चढायचें आहे; पण तो विद्या बाजूला सरण्याची वाट पहात आहे. साहजिकच (इन्स्टिंक्टिव्हली) तिनें आपला हातरुमाल काढून हवेंत फडकविला. विद्येनेंहि तसेंच केले. पण ती दारांतून हलली नाहीं. तिचें लक्ष डब्यात कुणाकडे तरी वेधलें गेलें असावें. ओळखीच्या अभिप्रायाचें स्मित तिच्या चेहऱ्यावर झळकलें. "किती वाजले बर ! झालीच असेल सुटायची वेळ." असें मनाशीं म्हणत पुष्पानें प्लॅटफॉर्मच्या छपराला टांगलेल्या विजेच्या घड्याळाकडे वळून पाहिलें. इतक्यांत विजेच्या इंजिनानें शीळ घातली आणि गाडी चालू झाली.

पुष्पा वळेपर्यंत विद्येचा डबा दादरापलीकडे दिसेनासाही झाला. पुष्पानें ओझरतें पाहिलें कीं तो तरुण दाराच्या रेलिंगला धरून दारांत उभा आहे आणि विद्येचा उजवा हात त्याच्या गळ्यांत आहे. या दृश्यानें तिला इतकें बुचकळ्यांत टाकलें कीं, गेटवरच्या तिकिट विचारणाऱ्या कलेक्टरला कांहीं उत्तर देण्याचेंहि तिला भान राहिलें नाहीं.

विद्या विस्कळित आणि विमनस्क होऊन गाडींत खिडकीशीं बसली होती. पूंना एक्स्प्रेस भरवेगानें चालली होती आणि तिच्या मनांत विचार विकारांचें तुमुल युद्ध चाललें होतें. तिच्यासमोर एका मद्राशी गृहस्थाशेजारीं ती

तरुण बसला होता. तो मद्रासी गृहस्थ टाईम्स वाचण्यांत गर्क होता; पण हा तरुण मात्र याचक वृत्तीनें तिच्याकडे अनिमिष नेत्रानीं पहात होता.

विद्येच्या मागे चार बाकें टाकून दुसऱ्या बाजूला दोन वयस्क गृहस्थ बसले होते. विद्येला ते पाठमोरी बघू शकत. विद्या त्यांची दृष्टादृष्ट चुकविण्यासाठी मुद्दामच या सीटवर येऊन बसली होती. वास्तविक हमालानें तिचें सामान समोरच्या सीटवर खिडकीशीं ठेवले होतें; पण तें उचलून त्या तरुणाला तिनें बसायला जागा करून दिली. तिच्या शेजारीं खिडकीशीं एक काळीकुट्ट मद्रासी स्त्री बसली होती

त्या दोन वयस्क गृहस्थाना तो तरुण खिडकीच्या उजेडामुळें लाइमलाइट' मध्यें असल्यासारखा झाला. विशेष लक्ष वेधण्यासारखें त्याच्या स्वरुपांत वास्तविक असामान्य असें कांहीं नव्हतें. वर्ण निमगोरा, चेहरा तजेलदार, नाक जरा मोठें, डोळेही मोठेच आणि काळे, आकृति स्थूल, उंची मध्यम आणि वेष साधा. विद्येच्या सनिध तो नसता तर त्याच्याकडे त्यांनीं लक्षही दिलें नसतें.

"काय हो पैकाजीराव ? ही दादासाहेब चौधरींची मुलगी ना ?" त्यांच्या बोलण्यांत वऱ्हाडी हिस्के — हेलकावे स्पष्ट होते.

"होय; आणि तिनें आपणाला ओळखलेंही; पण चुकवाचुकवी करते आहे."

"आन् बरोबर कोण आहे ?"

"असेल कोणी दोस्त !"

"अन् तुम्हीं पाहिलें नाहीं ? का हो संतुकराव ?" पैकाजीरावानें कांहीं वेळानें डोळे मिचकावीत विचारलें.

"हां हां, नाहीं कामुन ? वा राव !"

"मग केली ना मला क्षमा ?" त्या तरुणानें अगदीं हलक्या आवाजानें खालच्या नजरेनें विद्येला विचारलें. "मी अनत अपराधी आहे; क्षमेला अपात्र आहे; पण...

" आय् हेट यू ! " विद्येनें दात खात सामर्षशिंजित केलें, त्या मद्राश्यानें टाईम्समधून आपले डोकें काढून क्षणमात्र तिच्याकडे पाहिलें. विद्येला आपली चूक कळून आली आणि ती लाजली.

" पण मी प्रामाणिक आहे. " त्या तरुणानें आर्जव आणि मार्दव यानी कंपित अशा स्वरात म्हटलें.

विद्येनें उत्तर दिलें नाहीं. ती तो मद्राश्याच्या टाईम्स पाठीकडून वाचू लागली. कांहीं वेळानें विचार करू लागली – आठवू लागली. सुसगत स्मरण करण्याइतकें तिचे चित्त ठिकाणावर तरी कुठें होते ?

मुबईत धावत्या ट्राममध्यें चढण्यात अतिशय पटाईत आपण आणि याच भावनेनें – अभिमानानें आपण उघड्या दाराला रेलून उभें राहिलो. पुष्पाला फेअरवेल फडकवला. इतक्यात आपलें लक्ष मागें बसलेल्या लोकाकडे गेलें. आपल्या वडिलाच्याकडे गेल्या हिवाळयात पाहुणे म्हणून आले होते ते. पाहिलें असेल का त्यानीं ? अन् त्याचा काय अर्थ करतील ते ? काय समजतील ? काय म्हणतील ?...

आपला तोल गेला आणि आपण पडलों. चटकन् दारात आलेल्या त्या तरुणाच्या अंगावर पडलों. आपल्या ओठाचा त्याच्या गालाला स्पर्श झाला. कितीतरी वेळ त्यानें आपणाला तसेंच धरून ठेविलें...नाहीं, नाहीं; लगेच त्यानें आपल्याला सावरून उभें केलें. पण तसें करताना त्यानें आपल्या अंगाभोंवतीं हात घातला...होऽ आणि क्षणमात्रच, अगदीं हलकेंच, नाजूकपणें...

आपण झटकन् दूर झालों आणि काहींतरी पुटपुटलों. काहींतरी रागानें बोललों. त्यानें पुढे सरून दार लोटलें, बद केलें आणि आपली क्षमा मागितली. आपण म्हटलें 'विनयभग' तो भयभीत, स्तिमित झाला. अवश झाला. आपण तिरीमिरीनें आपल्या सामानाशीं आलों, सामान उचलून रॅकवर ठेवलें; वळून पाहिलें कीं आपल्या वडिलाच्या स्नेह्याच्या दृष्टि आपणावर खिळलेली

आहे. त्याची सतत दृष्टि चुकविण्यासाठीं आपण समोरच्या बाकावर मद्रा-स्याच्या बाईशेजारीं बसलों आणि त्या तरुणानें आपली रिकामी जागा घेतली. त्यानें गहिंवरलेल्या स्वरात ओठातल्या ओठात म्हटलें, "माझ्या अपराधाला माझें तारुण्य जितकें कारण आहे, तितकेंच आपले लावण्यही ..."

विद्येला राग आला तो ह्याच बोलण्याचा, आणि कांहीं वेळ स्तब्ध राहून त्यानें पुन्हां जेव्हां क्षमेची भाषा काढली, तेव्हां भान न राहून तिनें फटत्कार केला.

पण आतां विद्या विचार करूं लागली:— "अन् असेलही हा निरागस आणि सालस दिसणारा तरुण गुन्हेगार अपराधी. मनुष्य स्खलनशील आहे. आपण नाहीं का त्याच्या स्पर्शानें किंचित्— अगदीं किंचितच् पुलकित झालों ! तसेंच त्याचेंही झालें असेल. संयम न राहून त्याच्या हातून थोडासा अति-प्रसंग झाला असेल; पण स्थळ, काळ, व्यक्ति, परिस्थिति, उद्दीपनें आणि विभावनें याचा विचार करून आपण उदार, दयाशील झालें पाहिजे. क्षमा करणें आपलें कर्तव्य आहे — निदान ती आपल्या इच्छेची गोष्ट आहे — नव्हे तो आपला हक्क आहे. समाज आपल्याला क्षमेपासून परावृत्त करूं शकत नाहीं. आपल्याला वाटेल तेव्हां क्षमा करता आली नाहीं तर तेंहि एक प्रकारचें दास्यच होईल — नव्हे निव्वळ जुलूम होईल !"

आणि खरच, आपण आज कित्ती कित्ती शृंगार केला होता ! जरा जास्ती फाजील नाहीं का झालें नटणें ? पुष्पानें तर म्हणूनच दाखविलें कीं, विद्ये, तूं आपल्या नटण्यानें कामिनींच्याही मनात काम उत्पन्न करशील."

ठाण्याच्या स्टेशनवर गाडी आली आणि तो तरुण उतरण्यासाठीं चुळबूळ करूं लागला; जणूं काय तो केवळ तिच्या संमतीसाठीं—अनुज्ञेसाठींच ताटकळत राहिला आहे. गाडीची तिथें थांबण्याची मिनिटें सरत आली पण त्याच्या मनाचा निश्चय झाला नाहीं.

"काय नाव तुमचें ?" विद्येनें एकदम विचारलें.

या अनपेक्षित प्रश्नानें तो तरुण इतका गोंधळला आणि तो सगळा गोंधळ त्याच्या चर्येवर आणि वागणुकींत इतका प्रतिबिंबित झाला कीं, विद्येला खुद-कन् हसूं आलें.

"वासुदेव बाजपेयी" बंदीशाळेला अभिमुख झालेल्या आरोपीच्या बेफि-कीरपणें त्यानें उत्तर दिलें.

"कुठले ?"

"मोंगलाई."

"मुंबईत काय करतां ?"

"कांहीं नाहीं."

"बेकार आहांत ? बी. ए. पण आहांत का ?"

तो तरुण जाण्यासाठीं उभा राहिला. एकदम गाडी चालू झाली. त्याचा झोक गेला; त्यानें खिडकीच्या गजाना धरलें आणि हताश होऊन परत सीट-वर अंग टाकलें.

कांहीं मिनिटें गेलीं आणि त्यानें हळूहळू विद्येला आपली हकीकत सांगि-तली. निजामाबाद जिल्ह्यांतील गोदातीरच्या उमापतीपूर नांवाच्या एका खेड्यांतील अनंतभट जोशी वाजपेयी यांचा तो मुलगा. अंगच्या हुशारीमुळें शिष्यवृत्तीवर आणि सुहृदांच्या प्रोत्साहनावर तो शिकला. मुंबई विद्यापीठाचा पदवीधर होण्याचा गुन्हा केल्यामुळें त्याला मोंगलाईत नोकरी मिळूं शकली नाहीं. शेवटीं मुंबईला शिकवणी नोकरी कांहींतरी करून एल्एल्. बी. तरी व्हावें म्हणून तो आला आणि दादरला पाटील टेरेसमध्यें आपल्या एका मित्राकडे राहिला.

"कुठपर्यंत जाणार ? पुणें ? लोणावळें ?" विद्येनें सहजच विचारलें.

"कुठेंच नाहीं."

पहिल्यानें तिला या उत्तराचा कांहींच बोध झाला नाहीं; पण नंतर त्यानें सांगितलें कीं, आपल्या मित्राचा सीझन पास आपल्या खिशांत आहे आणि तो ठाण्यापर्यंतचाच आहे; आणि तीच त्यानें मनांत योजिलेली प्रवासाची मर्यादा होती.

" अन् हें तर कल्याण आलें." तिनें बाहेर पाहून म्हटलें. रुळांच्या कप्-लिंगजमधून गाडी खडखडत होती. गॅंग्वेमधून तिकिट-इन्स्पेक्टर आणि त्याचा पोर्टर डब्यांत आले.

वासुदेव वाजपेयींच्या पोटांत धस्स झालें. त्याच्या खिशांत पुरेसे पैसेही नव्हते. तो अभावितपणें आपलें सर्व खिसे पुन्हा पुन्हां चाचपून पाहूं लागला. खरें कारण विद्येच्या चटकन् ध्यानांत आलें. तिकिट इन्स्पेक्टर जवळ येतांच ती आपली व्हॅनिटी बॅग उघडीत म्हणाली:—" मला आणखी एक तिकिट पुण्याचें पाहिजे. माझ्याबरोबर येणारी सोबत ऐनवेळीं न आल्यामुळे, अनपेक्षितपणें यांना माझ्याबरोबर यावें लागलें आहे."

तिकिट इन्स्पेक्टरचा तिच्या बोलण्यावर विश्वास बसलासें दिसलें नाहीं. तो साभिप्राय त्या दोघांकडे पहात म्हणाला:—" पण गार्डाला कळविलें नाहीं. पेनल्टी द्यावी लागेल."

विद्येने आपलें स्वतःचें तिकिट आणि एक नोट आपल्या व्हॅनिटी बॅग-मधून काढून इन्स्पेक्टरच्या हातावर ठेवली. इन्स्पेक्टरनें तिच्या तिकीटावर सही केली, दुसरें एक कागदाचें तिकिट लिहिलें आणि कांहीं नाण्यांसह सर्व तिच्या स्वाधीन केलें. तिच्या व्हॅनिटी बॅगचें नांव इतकें सार्थ कधींच ठरलें नसेल.

रेल्वेचा अधिकारी निघून गेल्यानतर तिनें तें कागदाचें तिकिट हळूंच त्याच्यापुढें केलें. तो किती किती विरमला आणि लाजला होता पण! थर-

वरल्या बोटांनीं त्यानें तें तिच्या हातून घेतलें. कृतज्ञतेनें अनिमिष तिच्याकडे पाहिले आणि म्हटलें — कांहींच म्हटलें नाहीं, खालीं मान घातली.

कल्याण स्टेशन येतांच पैकाजीराव व संतुकराय आपल्या सामानासह उतरले. पूर्वीं त्यांनीं तिचें लक्ष आपणाकडे वेधवून घेण्याचा आणि तिच्याशी बोलण्याचा व्यर्थ यत्न केला. पण ते दोघे डब्यात असे तों तिने खिडकीच्या बाहेर तोंड काढून स्टेशनांत कुणाला तरी शोधण्याचा बहाणा केला आणि ते प्लॅटफॉर्मवर उतरताच आपल्या जागीं बसून त्या तरुणाचें सकुतूहल सस्मित अपांग निरीक्षण चालविलें. एक प्रकारचा धिटकेलपणा तिच्यामध्यें आला होता. त्या मद्राश्यानें आपल्या टाईम्सचें पारायण सपवून, आपल्या चष्म्यांतून इकडे तिकडें पाहण्यास सुरवात केली होती आणि तीं काळीकुट्ट मद्रासी बाई आपल्या दुरडींतून संत्रीं काढून त्याच्या फोडी सोलून खाऊं लागली होती. आणि सीत्कार करीत गाडीनें कल्याण सोडलें.

ते दोघे वयस्क गृहस्थ उतरून गेल्यामुळें विद्येच्या मनावरचें दडपण उडालें. अवचित् आलेले मळभ पावसाची सर येऊन सरावें आणि दिशा उजळाव्या, पानेतृणें तरारावीत, आणि मनें उच्छृंखल व्हावीत असें झालें. वासुदेव वाजपेयी मात्र विषण्ण, अधोमुख, पराजित, विदिष आणि विमनस्क होत्साता किती तरी वेळ स्थिरकाय आणि अस्थिर मन असा वसल्या जागीं खिळून राहिला.

मैलांमागून मैल अंतर वेगानें काढणारी गाडी न कळत सह्याद्रीची चढण चढूं लागली. मोठमोठ्या डोंगरांच्या कपारी धावत्या गाडीच्या खिडक्यातून डोकावून पाहूं लागल्या. लहान लहान बोगद्यांनीं केलेल्या अल्पकालीन अंधेऱ्या रात्रीनंतर एकदम उजाडणाऱ्या उषःकालानें दाखविलेलीं दऱ्याचीं दृश्यें अहेतुकपणें उत्साहजनक होत होतीं.

"तुम्ही ठाण्याला कुणाकडे जात होतां?"

वासुदेव वाजपेयी क्षणमात्र घुटमळला आणि म्हणाला—

" कुणाकडेही नाहीं. "

" म्हणजे ? ठाण्याला तुमचे कोणी ओळखीचें नाहीं ? मग तुम्ही कशाला ठाण्याला जात होता ? "

कितीतरी वेळ झाला तरी त्यानें कांही उत्तर दिलें नाहीं. विद्येच्या मनांत एक कल्पना चमकून गेली. या तरुणाला कोठेंही जावयाचें नसतांना केवळ आपण पडणार असें पाहून प्रसंगावधानानें हा चटकन् चालत्या गाडींत चढून तर आला नाहीं ?

आपला प्रश्न कोणत्या शब्दात विचारावा हे न कळून तिनें म्हटलें—

" मग काय तुम्ही केवळ माझ्यासाठीं चालत्या गाडींत चढून आला ? "

" होय. "

हे अनपेक्षित अनेकार्थी उत्तर अनेक प्रकारें भावनाक्षोभक होण्यासारखें होते. सह्याद्रींतील एका अत्यंत मनोवेधक दृश्याकडे लक्ष वेधल्यामुळें असेल किंवा असल्या उद्दाम उत्तरानंतर विद्येच्या नजरेला नजर भिडविण्याचें धैर्य न झाल्यामुळें असेल, तो खिडकींतून बाहेर पाहू लागला. विद्येच्या मनातील विचार आणि विकार बाहेरच्या दृश्याइतक्याच वेगानें बदलू लागले.

" यासाठीं मी निरंतर उपकृत रहावे अशी अपेक्षा असेल......"

" छे छे ...... "

" आणि त्या तसल्या अविचारानंतर'ही ...... "

चढावर चढणारी गाडी जशी हळूहळू वेग घेते, तसें वाजपेयीच्या मनानें धैर्य धारण केलें, आणि त्यानें हळूच विचारले —

" मी आपलें नांव विचारू का ? "

" माझें नांव शारदा शहाणे." मिस्किलपणें तिनें उत्तर दिलें. रिव्हर्सिंग जवळून गाडी जाऊं लागली तेव्हा वाजपेयीला वाटलें कीं तेथल्या अलौकिक सृष्टिसौंदर्याला सर्व प्रवासी कायमचे मुकले हें चांगलें झालें नाहीं.

या तरुणानें आपलें नाव विचारलें नसतें तर बरें झालें असतें, आणि आपण खोटें सांगितलें नसतें तरी बरें झाले असतें. केवळ पराक्रमाच्या स्फूर्तीनें जर त्यानें आपलें अपघातापासून संरक्षण केलें असें म्हणावें तर हें त्याचें विचारणे विसंगत नाहीं का ?

आणि एखादा निसर ( स्लिप ) माणसाला उंचावरून कोसळायला कारण होतो. तसेंच झालें. क्षमेला पात्र होण्यासाठीं वाजपेयीनें प्रामाणिकपणें कबूली दिली. आपण विद्येला पाहून अकारण सहजाकर्षण म्हणून गाडींत चढलो आणि पुढचे सर्व अचानक घडलें असें त्यानें सांगितलें.

आणि या आत्मनिवेदनाचा विपरीत परिणाम होऊन विद्येनें त्याला लोणा-वळें स्टेशनवर उतरण्याची आज्ञा केली आपण असल्या माणसाचें तोंडही पुन्हा पाहू इच्छित नाहीं असें तिनें सांगितले आणि अवमानकल्पित आम-र्षानें धुमसत ती पुण्यास आली तिथें तिला बापूजी भेटलेच नाहींत, येऊ शकले नाहींत. त्याना तार केली तरी त्याचे उत्तर आलें नाहीं. दोन दिवस आपल्या मैत्रिणीकडे राहून, वाट पाहून, कटाळून, चिडून, रागावून नाइ-लाजानें ती एकटीच शेवतीला निघून गेली.

## प्रकरण ३ रें

शेवंती येथील दादासाहेब चौधरी यांचा वाडा म्हणजे एक छोटेखानी किल्लाच होता; आणि किल्ल्यासारखा त्याचा उपयोगही अनेक वेळां झालेला

होता. धामधुमीच्या काळातले खदक आता नुसते खळगे राहिले होते. पण गढीचा तो दोनमजली अजस्र दरवाजा तेल दिलेल्या बिजागिऱ्यांवरही दहा गड्यांना ढकलायला जड जाई. नेहमीं तो बंद असे. विशेष कार्यप्रसंगीं तो उघडला जाई आणि एखाद्या महत्त्वाच्या वेळीं तेलपाणीही खाई. पण नेहमीं वहिवाट दिंडी दरवाजानेंच चाले. एखादा घोडेस्वार घोड्यासह सहज त्या दिंडींतून निघून जाईल दरवाजालगत दोन मोठे चिरेबंदी बुरूज होते, पण बुरुजावरच्या सफीलीची पडझड झालेली होती.

गावालगत वाहणाऱ्या एका ओढ्याच्या अलीकडे एका उंचवट्यावर ही गढी होती. याच्या सर्व भींतींचीं चिरेबंदी जोतींच पुरुष दीड-पुरुष उंच होतीं.

आणखी तीन मातीचे उंच उंच बुरूज होते. त्यावर जाणें आज अशक्य झाले होतें. वाड्याच्या समोर उभें राहिलें म्हणजे दूरवरचा प्रदेश, अगदीं औरंगदाबाद, नांदगाव, वैजापूर रस्ते जिथे मिळतात, त्या चौकापर्यंत दिसत असे.

वाड्याच्या आत आवार फार मोठें होते पण दाराजवळची चारदोन दालनेंच शाबूत आणि वापरात होतीं. आणि बाकीची सर्व इमारत पडित आणि जमीन लागवडींत होती. मागच्या बाजूला वाड्याहून विलग अशा एका छपरात गोठा गडीखाना इत्यादि होते.

सूर्यास्ताची वेळ होती. दादासाहेबांचें खासगी कारभारी शाहूराव वाड्या-समोरील पटांगणात उभे होते. त्यांच्या हातांत एक तार होती. त्यांनीं थोडा वेळ विचार केला, आणि देवडीवरील शिपायाला हाक मारली:—"अरे शंभु"

" जीऽ " त्यानें ओ दिली आणि तेलकट हातांनीं तो दिंडी बाहेर आला.

" काय करतो आहेस ? "

" जी बाईच हत्यारं साप करतुया न्हवकां ? "

" ही पहा ताईसाहेबांची तार आली आहे. आज अलाहाबाद एक्स्प्रेसनें नांदगांवला येईन, एकटीच आहे; मनुष्य पाठवा म्हणून."अन् त्या आज दुपारीं

दीड वाजतां आल्यासुद्धा असतील आणि तार आतां येत आहे सहा वाजतां! हें तारखातेंसुद्धा आमच्या मोगलाईत शिरताच असें मोगलाई होतें!"

"मग ताईसाब तत ठेसनवर काय म्हगत असत्याल?"

"होय, कुणीतरी गेलं पाहिजे आणि ताबडतोब गेल पाहिजे–"

"अन् धनीसाब तर गाडीघोडा घेऊनश्यान् पावण्यांना वाटी लावायला रोटेगावला गेलेर्ता."

"मग पाढरा घोडा बाहेर काढून त्याला जीन कर. मी स्वतः नादगांवला जातों"

"त्यो घोडा ठाणबद होऊनशान लई माजलाय् जीनबी धरत नाहीं. नगर बाबा – त्या परता –"

"असू देरे. चागला फटकावला म्हणजे होईल नरम!"

"मग वाईच हत्यार साप करूनशान्—"

"हत्यार राहू देत तशींच. आधीं जा. मिनिटामिनिटाला वेळ जातोय–"

काहीं वेळानें शभूनें अंगच्या रगेनें थैमान घालणाऱ्या घोड्याला बाहेर आणलें. "दादासाहेब येईपर्यंत दिंडी लावून जागत रहा" असें बजावून शाहूरावानें घोड्याला टाच दिली. "अख्ख नांदगाव पालथे घातल्याबिगर न्हाऊ नका ताईसायबासाठीं" असें त्यानेंही उलट बजावलें.

सूर्यास्त झाला. चद्रोदय झालाच नाहीं. कारण चद्र आधींच कासराभर वर होता. या दोन प्रकाशात विलीन होणारी छाया चिरतन प्रणयत्रिकोणांतील नायिकेप्रमाणें दिसत होती.

दादासाहेब परत येतांच शंभूनें त्यांना ताईसाहेबांची तार दिली, आणि शाहूराव त्यांच्यासाठीं पांढऱ्या मस्त घोड्यावर नादगावला गेल्याचें सांगितलें. दादासाहेबांनीं तार वाचली आणि "कशाला त्यानें आपला जीव धोक्यांत घातला?" एवढेंच म्हणून ते आंत निघून गेले.

शंभूला जरा चमत्कारिकच वाटलें. त्याला वाटत होतें दादासाहेबांचें हृदय वात्सल्यानें क्षणभर भरून येईल. ते म्हणतील, "ताई नांदगांवला दुपारींच आली असेल आणि स्टेशनवर कुणीच आलें नाहीं असें पाहून ती काय करील ? कुठे जाईल ? कुठे राहील ?—एकटीच येण्यात तिनें मोठी चूकच केली !"

पण तसें झालें नाहीं. पैकाजीराव आणि सतुकराव पाहुणे आले होते. त्याना पोंचविण्यासाठीं ते रोटेगावपर्यंत गेले होते. वाटेंत बोलतां बोलतां त्यांनीं आपण विद्येला कुठें आणि कसें पाहिलें, तिनें आपल्याला कशी ओळख दिली नाहीं, तिच्याबरोबर कोण होते इत्यादि सर्व सांगितलें. तें ऐकून त्यांनीं अविश्वास दाखविला, आश्चर्य लपविलें, अवमान गिळला आणि त्या उभयतांनीं अगदीं शपथ घेऊन सांगितलें तेव्हा कांहींसें मुलीच्या अनुकूल बोलून त्यांना गप्प बसविलें.

पण त्याच्या वाचेचें विष भिनून राहिलेंच. विचारांत—अस्वस्थ विचारांत दादासाहेबांचा कितीतरी वेळ गेला. जेवणखाण झालें. नगारखान्याच्या माडींत येऊन बसण्यापूर्वी त्यांनीं शंभूला दिंडी बंद करून निजण्यास सांगितलें आणि सिगारेटच्या धुरात विचारांचीं वलयें बनूं लागली.

आणि अकारण त्यांना विद्येच्या आईची आठवण झाली. तें तारुण्य, तें स्वरूप, तो उन्माद, तो मोकळेपणा—मोगलाईतल्या स्त्रियाना क्वचितच दिसणारा तो विशेष गुण—ज्यासाठीं सुधारलेल्या ब्रिटिश मुलखातली वधू त्यांनीं पसंत केली—त्या संध्या, त्या छाया, त्या निशा—

नगारखान्याच्या दालनाच्या काळयाभोर कडीपाटाकडे पाहून त्यांना एका सुखद प्रसंगाची आठवण झाली. विद्येची आई त्यावेळीं गर्भभरालस आणि म्हणून दादासाहेबांच्या दृष्टीनें अधिकच मोहक दिसत होती. तारुण्याच्या उन्मादात त्यांनीं एकदा नोकराचाकरादेखत तिला जवळ घेतलें आणि या अपराधाबद्दल याच दालनात तिनें त्यांना नर्मवचनें ऐकविलीं, लाजविलें, आणि म्हटलें :—

" या गोष्टी आम्हा स्त्रियाना नको असतात असे का आहे ! पण आपण घरंदाजपणाच्या मर्यादा पाळल्या पाहिजेत. कुलीनाचा विषय कडीपाटालाही दिसू नये म्हणे—"

दादासाहेबाना सकारण विद्येचा आणि अकारण त्या पाहुण्यांचा राग आला. एकदां तिच्याबद्दल काळजी, हुरहूर आणि उत्सुकता वाटली आणि एकदां वाटलें, " या बेलगामी वागण्याबद्दल या पोरीला अद्दल घडवलीच पाहिजे."

बराच वेळ गेला. बऱ्याच सिगरेट्स्ची राख झाली आणि " रात्री कुणी येण शक्य नाहीं, तुम्ही स्वस्थपणें झोंपायला जा " असें त्यानी स्वयपाकच्या आजीबाईला आणि कुळबीणीला सागूनही टाकलें.

हळूहळू सगळे गांव झोपीं जाऊ लागले. चादणें जास्त सतेज वाटू लागले. जनावरांचें चारा खाणें आणि पक्ष्याचे फडफडणें, याशिवाय दुसरा आवाज फारसा ऐकूं येईनासा झाला; आणि हळूहळू येणाऱ्या गुगींत दादासाहेब विचार करू लागले कीं, " विद्या कुठे असेल ? काय करीत असेल ? शाहूरावाची गाठ पडली असेल का ? आणि रात्री ती कुठें राहील ? "

सहज त्यांचें लक्ष सज्जातून समोरच्या मैदानाकडे गेलें. रस्त्यांतून दूरवर कुणीतरी येत आहे असें त्यांना दिसलें. वाड्याच्या रोखानें येणारी ती व्यक्ती जसजशी जवळ येऊं लागली तसतसे तिचे विशेष जास्त स्पष्ट होऊ लागले. सरत्या शिशिरातील चांदण्यारात्रीची थंडी उबदार रुजमध्यें निजून राहिले-ल्यांना जरी गुलाबी वाटली तरी रस्ता चालणाऱ्याना कांहीं ती तितकी सुखद नसते, आणि डोकीवरून पदर घेऊन त्यावर जाभळ्या लोकरीचा ओव्हर-कोट घातलेल्या, हातात एक मोठी चामडी बॅग घेऊन जाणाऱ्या त्या गौर-काय आणि डौलदार प्रवासिनीला तशी ती नव्हतीही. तिच्या त्या नाजुक, पातळ, जरतारी, मद्रासी वाहणाना रुतणारी रस्त्यावरील खडी, आपल्या अपराधाचें परिमार्जन करण्यासाठीं बाजूची धूळ त्यावर टाकीत होती.

दादासाहेबांनीं विद्येला दुरुनच ओळखलें आणि पहिल्या उर्मीत त्याना असेही वाटलें कीं धांवत जावें आणि तिला पोटाशीं धरावें. पण त्याना तिच्या आईच्या वचनाची आठवण झाली कीं, "घरंदाज माणसानीं आपल्या भावनाचा आवेग इतराना दिसू देऊ नये." ...... कुलीनत्वाच्या कल्पनेबरोबर त्याना पेकाजीराव आणि सतुकराव यानी सांगितलेल्या गोष्टींची आठवण झाली. त्याबद्दल तिला जाब विचारावा, रागें भरावें, शिक्षाही द्यावी असें आपण ठरविलेलें आठवलें. क्षणभर त्यांनी दोही अंगीं विचार केला आणि ज्या समंजसपणानें लोक कडू औषध आधी घेऊन त्यानंतर वर स्वादिष्ट पेयाचा घोट घेतात, त्याच समजसपणें त्यानीं तिला प्रथम शिक्षा करण्याचे ठरविलें. एक भलें मोठें कुलूप घेऊन त्यानीं तें हलकेंच जाऊन दिंडीला लावलें आणि किल्ली कनवटीला लावून ते आपल्या शयनागाराच्या दाराशीं क्षणभर थावले. आपल्या खोलींत जाऊन झोपावें कीं नगारखान्याच्या माडीत बसावे यांविषयी त्यांचा काहीं वेळ निर्णय होईना पण कन्येच्या दर्शनाची उत्कठा विजयी झाली आणि ते नगारखान्याच्या माडीत गेले.

इतक्यात ती अपराधिनी गढीच्या दारात आली आणि दार ठोठावूं लागली. दादासाहेबाच्या कुलूप लावण्याच्या आवाजाने अर्धवट जागा झालेला शंभू खडबडून जागा झाला. त्यानें आपला कंदील मोठा केला आणि विचारलें "कोण आहे?"

"दार उघडा. माझी तार पोंचली नाहीं का?" शंभू विद्येचा आवाज ओळखून दार उघडण्यासाठीं आला; आणि दिंडीला कुलूप पाहून चकित झाला. विचार करण्याची त्याला संवय नव्हती. दादासाहेबाना शोधण्यासाठीं साऱ्या वाड्यात फिरून त्यानें इतरांना जागें केलें. वेळ गेला आणि दाराबाहेर वाट पाहून कंटाळलेली ताईसाहेब आणखी जोरजोरानें दार ठोठावूं लागली.

शेवटीं दादासाहेबच माडीवरून ओरडले. "शभू, कोण गडबड करीत आहे?" शभू साधेपणानें सागू लागला कीं, "ताईसाहेब आल्या आहेत पण दिंडीला कुलूप आहे."

"असेल-मग सकाळी उघडेल. तिला म्हणावं उजाडेपर्यंत गोठ्यांत जाऊन नीज. पुढें पाहता येईल."

नगारखान्याच्या माडींतून येणाऱ्या या आकाशवाणीनें शंभु भयभीत झाला. इतर नोकर स्तिस्मित झाले. आणि बाहेर विद्या रागाने लाल झाली.

कांहीं काळ अशीच अनिर्णयाची शांतता राहिली आणि मग विद्या कंपित स्वरात म्हणाली:—

"बाबा, दार उघडा-हें काय चालवलें आहे? मी विद्या-तुमची ताई आले आहे आणि तिला तुम्ही असें बोलता? तुम्हांला कसला इतका राग आला आहे? आधी मला घरांत घ्या आणि मग-" क्षणभर विद्या घुटमळली. आणि पुढें काय बोलावें याचा विचार करू लागली. शभूने दादासाहेबांच्या जवळ जाऊन कुलूपाची किल्ली नम्रपणें भीतभीत मागितली.

"तुला काय करावयाचें आहे? ताईला म्हणावं घरात घेण्याजोगी तू राहिली आहेस असें सिद्ध झाल्याशिवाय कुणीही तुला घरात घेणार नाहीं."

शंभू निमूटपणें खालीं आला आणि आपल्या आपल्यांत चूर राहिला. विद्येला कांहीं उमज पडेना कीं दादासाहेब कां भडकले. त्यांचा तिला राग आला. "एवढासुद्धां विश्वास हे आईबाप आपल्या मुलीच्यावर कसा ठेवीत नाहींत?- आणि हा असा अपमान! गोठ्यांत जाऊन नीज-इतकी आपली किंमत कमी आहे? - तुला कुणीही घरांत घेणार नाहीं - घर कसले तें! तुरुगच- आणि तुरुंगाची कल्पना दृढमूल करायला तो अजस्र बंद दरवाजा आणि ते उंचउंच दगडी बुरूज समोरच दत्त म्हणून उभे! — आणि यासारख्या तुरुगांत आणखी आपण होऊन काय म्हणून कोंडून पडावें? मुक्त होण्याची संधि आली असतांना कां..."

क्षोभाच्या आवेगाने तिने पुन्हा जोरानें दार ठोठावलें आणि म्हटले, "बाबा, पहिल्यानें दार उघडा आपल्या निष्कलंक कन्येला दुखविल्याबद्दल आधीं तिची क्षमा मागा आणि मग—"

दादासाहेब नगारखान्याच्या सज्जात आले आणि म्हणाले, "पैकाजी-रावाची आणि तुझी गाडींत गाठ पडली. तू ओळख दिली नाहींस. तुझ्या-बरोबर आणखी कुणीतरी होतें. यात काय खोटें आहे?"

"सर्व खरें आहे पण—"

"त्यानी तुला त्याच्या गळयात आलेली पाहिली."

"पण बाबा—"

"बस् मला तुझ्या सुशिक्षित बतावण्या नको आहेत एक शब्दही मी ऐकू इच्छित नाही" असे म्हणत व दडदड जिना उतरत ते आपल्या शय्या-गाराकडे निघून गेले. शभू आपल्या बिछान्यावर जाऊन बसला आणि काय करावे हे न सुचून त्याने पथारीवर अंग टाकलें. आजीबाई पूर्वीच जाऊन निजली होती, पण कुळवीण मात्र अंगणात घुटमळत होती.

पण ती निर्वासिता एक शब्दही त्यानतर बोलली नाही. कुळवीण काहीं वेळ ताटकळत राहून निघून गेली. दिवसाच्या श्रमाने थकलेला शभू दिवा ढणढणत ठेवून झोपी गेला.

त्या पुरातन गढीच्या उंबरठ्यावर आपल्या सूटकेस शेजारीं बसून विद्या शून्यदृष्टीनें आसमतातील सृष्टीकडे पाहू लागली. विचार करू लागली. सतप्त, निराश, आणि भयभीत झाली.

एकदा तिला वाटलें शरण जावे.

पुन्हा वाटलें आणखी एकदा ओरडून बजावावे की, ताबडतोब दार उघडलें नाहीत तर मी अशी निघून जाईन आणि पुन्हा कधीही येणार नाहीं.

आणि एकदां वाटलें आपला एक शब्दही ऐकू इच्छित नाहींतनां ? मग बोलू नये एकही शब्द ! तसेंच जावें.

पण कुठें जावें ?

चार दिशेकडे जाणारे ते रस्ते चादण्यांत तिला स्पष्ट दिसत होते. तिला ते माहीत नव्हते असेंही नाही; पण चार भिंतींत दरवाजाआड, छपराखाली रहावयाला सरावलेलें तिचें मन गोंधळ—" गर्तासूगीव सनये धनानाम् " असा उषेचा उल्लेख करणारी ऋग्वेदातील ऋचा तिला आठवली. वृ म्हणजे आवरणें, वारुणी माया म्हणजे परिस्थिति इत्यादि विवेचन प्राध्यापक आठवले यानीं एकदा तिच्या वर्गात केलेलें तिला स्मरलें. ही वारुणी शिशिरवायूहूनही जाचक, उभ्या दगडी बुरुजाहूनही कठोर, माहीत नसलेल्या रस्त्याहूनही फसवी, नको असलेल्या चादण्याहूनही लाजिरवाणी आणि जुलुमाच्या शांततेहूनही भीषण असें तिला वाटलें.

कुठें जावें याचा निर्णय न होतां जावें एवढ्या निश्चयानेंच ती निघाली आणि ओढ्यापलीकडील गावाच्या दिशेनें चालती झाली.

दोन तीन घटका गेल्या, पण दादासाहेबाना काहीं स्वस्थ राहवलें नाहीं, मुलगी तिथें उबऱ्यात झोपी तर गेली नाहीं ह्या कल्पनेने त्यानीं शभूजवळचा कदील घेतला, हळूच दार उघडलें आणि चहूकडे पाहिले. चादणें, थंडी, आणि शातता याशिवाय काहींही नव्हतें.

दादासाहेबानीं घाबरून शंभूला उठविलें. त्या दोघानी सर्व ठिकाणीं कसून तपास केला. गाडीवानालाही सर्व रस्त्यानीं दूरदूरपर्यंत जाऊन येण्यास सांगितलें आणि स्वतःही लोक नको नको म्हणत असता, त्या तशा मस्त थडींत रात्रभर विद्येला शोधत फिरलें. ते मनातून इतके विरमले, चूर झाले, भयभीत झाले.

# : : : : : प्रकरण ४ थें

वासुदेव वाजपेयी जेव्हा लोणावळयाच्या स्टेशनवर उतरला, तेव्हा त्याची स्थिति मोठी चमत्कारिक झालेली होती. खिशात मित्राचा अनधिकारानें वापरलेला ठाण्याचा पास, दंड भरलेलें पुण्याचें तिकीट, पोटात भूक आणि मनात शारदा शहाणे बद्दलचे विचार; असा तो प्लॅटफॉर्मवर उभा असतांना त्याला आढळून आलें कीं, आपल्याबरोबर उतरलेलें सर्व उतारू भराभर निघून गेलेले आहेत. आणि भटक्या म्हणवून घ्यायला नको असेल तर आपल्यालाही कोठेतरी गेलें पाहिजे. रेल्वेच्या स्टॉलवर काहींतरी फराळ करावा, तर त्याला तसें धैर्य झाले नाहीं; कारण खिशातील पैसे पुरतील असें खात्री नव्हती. भुकेच्या वेळीं चहा घेतला तर आणखी भणभणेल, म्हणून त्यानें तोही घेतला नाही. परत दादरला कसे जावे ही विवचना होतीच.

पण मग तो स्टेशनच्या बाहेर पडलाच गेटावर जेव्हां त्यानें तें दंड भरलेले तिकीट देऊन टाकलें तेव्हां तिकीट इन्स्पेक्टरनें त्याच्याकडे साशंक दृष्टीनें पाहिले. त्याला वाटलें तिकिटाशिवाय प्रवास करताना पकडला गेलेला हा भटक्या प्रवास पुरा न करता मधेच उतरला आहे.

स्टेशनबाहेर पडल्यावर कुठें जावें, काय करावें, याचा त्याला विचार पडला. सरत्या शिशिरातील तापहीन सूर्यही माथ्यावर आल्यामुळें त्याला निर्णायक दिशा दाखवू शकला नाहीं. आपोआपच त्याचे पाय खंडाळ्याच्या

घाटाच्या दिशेने वळले. त्याच्या मनश्चक्षूसमोरील शारदा शहाणेची रगेल मूर्ती त्याची टिंगल करण्याच्या स्वरात म्हणत होती: —

"तुमच्या अंगात काहीं पाणी असेल तर असेच पायीं चालत घरीं परत जाल, आणि नसेल तर ड्यूकच्या नाकावरून उडी टाकून जीव द्याल! एकदरींत हीच खडाळ्याची दिशा बरी आहे नाही?"

आणि खरोखरीच त्या दिशेनें तो झपाझप चालू लागला. कितीतरी वेळ चालला तो कुठे गेला असता किंवा त्याने काय केले असते हे सागणें कठीण आहे, पण एका मोठ्या श्रीमंत बगल्याच्या विस्तीर्ण बागेच्या फाटकातून बाहेर पडणाऱ्या एका मोटारीनें त्याची गति कुंठित केली.

फर्रकन् विजेचे हॉर्न वाजले, तो फाटकापुढून बाजूला सरला, आणि झरकन् ती भली मोठी लॅन्सिया त्याच्या अगदीं जवळून निघून गेली—वळली, थाबली, मागे हटली आणि तीतून कुणीतरी त्याला हाक मारली. गतीबरोबर त्याची मतीहि कुंठित झाली. उमापतीपूरच्या देशमुखाची सून त्या मोटारी-तील लालभडक आस्तरणाच्या आसनावर रेलून बसलेली होती. चलच्चित्र-गृहात बराच वेळ अधार पडावा आणि कटाळून प्रेक्षकानें आपल्या रोजच्या रुक्ष स्मरणींत गर्क होऊ लागावें, इतक्यात रजतपटावर विविधरगी चलत्-चित्र नायिकेच्या सुष्टदर्शनाने सुरू व्हावें तसें काहींसे त्याला झालें.

त्यानें तिला ओळखलें खरें; पण चार वर्षापूर्वी उमापतीपूरला पाहिलेल्या मानाने तिचें कितीतरी रूपातर झालेले होतें. आपला निराभरण, शुभ्र आणि मासल डावा हात बाहेर काढून अगुलीनिमिलनानें तिनें त्याला जवळ येंण्यास खुणाविलें. समोर ड्रायव्हरशेजारीं बसलेल्या तरुणानें वळून पाहिलें आणि मान फिरविली. वासुदेव वाजपेयीला दिसून आलें कीं, आपल्याशीं बोलण्याची-हि त्याची इच्छा नाहीं.

"वा तुम्ही इकडे कुणीकडे?" तिनें म्हटलें.

" आम्ही तर मुंबईला तुमचा शोध करणार होतो."

वासुदेव वाजपेयीला कांहींहि उत्तर देणे शक्य नव्हतें, आणि त्यानें दिलेही नाही त्याला काही उत्तर सुचलेच नाहीं.

उमापतिपूरची देशमुखी म्हणजे मोठे मातब्बर घराणे. कितीतरी जुनें. इनाम जमिनी, पतमक्ते, सेदवने, जागीरगावें, नगदी वर्षासने, रुसुम देशमुखी, साहुकारी, बागाईत कितीतरी उत्पन्नाचीं साधने – आणि नवल विशेष म्हणजे कर्जवाम नाही. हिस्से-सिकमाचे तटे नाहींत. खर्चवेच, इभ्रत इतमामासाठीं जो काही होईल तोच – तोही कांहीं थोडका नाही.

मूळ हे घराणे महाराष्ट्रीय कीं आंध्र ह काहीच सागता येणार नाहीं वसती महाराष्ट्राच्या सीमेवर, घरातील भाषा मराठी पण रीतीरिवाज तेलगणाचे; दंत-कथानी लावलेला ऋणानुबंध राष्ट्रकूटाशी, तर कुलदैवत पूर्वदेशींचें, सेवा-यवनाची आणि भक्ति महाराष्ट्राच्या स्वराज्याची – " पण आपण इकडे कोणीकडे ? आपली इथ भेट होईल अशी मला मुळींच कल्पना नव्हती." वासुदेव वाजपेयीनें आपले मनाचा गोंधळ लपविण्यासाठीं कांहींतरी नम्रपणें म्हटले. कांहीं झालें तरी त्याचे वडील देशमुखाचे आश्रित होते.

" ओ. हो ! श्रीमत लोक लोणावळयाला बगल्यातन राहतात हें तुम्हाला ठाऊकच नाही वाटत वाट चुकून आलात कीं काय इकडे ? "

थोडेंसें तसें झालें होते खरे ! पुन्हां वाजपेयी निरुत्तर राहिला. तिच्या उप-लभातील गर्भितार्थ त्याच्या लक्षात आल्यावाचून राहिला नाहीं. देशमुखाच्या शागीर्दपेशानें लहानपणी त्याचा एकदा अपमान केला तेव्हां तो जेवणावरून उठला होता. आणि पुन्हां त्यांच्याकडे कधींही जेवायला गेला नाहीं. त्या निमित्तानें जी बोलाचाली झाली त्यामध्यें श्रीमती आणि गरीबी या विषयाचा बराच ऊहापोह झाला आणि ही देशमुखाची सून त्याला साक्षी होती.

या आठवणी कांहीं त्याच्या मनाला या वेळीं मोठ्याशा उत्साह देणाऱ्या नव्हत्या. देशमुखाचे जन्मतः गर्भश्रीमतीच्या तोऱ्यात वाढलेले उर्मट, मग्रूर

आणि गर्विष्ठ चिरंजीव रावसाहेब यानीं त्या शार्गीर्दपेशाची तरफदारी करून आपल्या मानी मनाला दुःख देण्यात कसा तामसी आनद मानला हे तो विसरला नव्हता. हे रावसाहेब पुढें फार दिवस राहिलेच नाहीत. नाहींतर त्यानीं काय केलें असतें आणि देशमुखाच्या या सुदर सुनेचें आयुष्य कसें गेले असतें हें सागणें कठीण आहे.

"या, बसाना गाडींत. कुठे निघाला होता? आम्ही तुम्हाला जिथ जायच तिथ सोडून पुढे जाऊ."

हे सौजन्य आणि आपलेपणा पाहून त्याला चागलेच आश्चर्य वाटलें. अगदीं अनपेक्षित होतं सर्व काही !

चार वर्षात किती तरी स्थित्यतर झाले होतें. ज्या उमेदीने हैद्राबादच्या रगराव देवगिरीकर वकिलानी आपली मुलगी असा, अनुसूया ऊर्फ हसा देश-मुखांच्या एकुलत्या एक मूर्ख मुलाला दिली होती ती सर्व एका वर्षाच्या आंत धुळीला मिळून असेला वैधव्य, देशमुखाना दुःख आणि देवगिरीकरांना निराशा मात्र लाभली होती.

दोन तीन वर्षे अशींच पुत्रशोकात गेल्यानंतर देशमुखाना इस्टेटीच्या वारसाची व्यवस्था करायला पाहिजे अशी लोकानीं जाणीव करून दिली. कल्याणराव नावाचे एक कारस्थानी गृहस्थ स्वतःला देशमुखाच्या दूरच्या भाऊबदांपैकीं म्हणवू लागलें. त्यानी कृत्रिम वशवृक्ष तयार केला आणि त्याला एक नवीन फांदीही फुटली.

देशमुखानी आपल्याला सुनेच्या मांडीवर दत्तक घ्यावें असें त्यानें बोलणें सुरू केलें आणि काय झालें कसे झालें कोण जाणें पण देशमुखही त्याला भाळलें. आपल्या वडिलांच्या सागण्यावरून असेनें नकार दिला. कल्याणराव तिच्यापेक्षां सवाईनें वडील, पण आपलें कागदोपत्रीं वय त्यानें हाहा म्हणतां कमी केलें आणि

तो राधेघरच्या कृष्णाप्रमाणे लहान झाला. अंसेचें मन वळवण्याचेंहि त्यानें अंगावर घेतलें.

संसाराच्या सुखास्वादाचा काठ ओठाला लागून दूर झाल्यामुळें अंसेची मनःस्थिति मोठी चमत्कारिक झालेली होती. सुखाचा स्पर्श व्हावा आणि मोक्ष होऊं नये म्हणजे जी सनसनी दीर्घकालपर्यंत शिवशिवत राहातें तसें तिला झालें होतें. श्रीमंताच्या जीवनात नेहमींचेंच असलेलें ऐषआराम अशा रुखरुखी रवरवेला चेतावणी देणारे होऊन तिच्या गतीला वर्धमाना करतात, चैन पडूं देत नाहींत, आणि आपल्या मजलेला पोंचवितात.

असेचे असेंच झालें. लग्नानतर वैधव्यापूर्वी आणि नंतरही जेव्हा जेव्हां ती माहेरीं आली आणि बहुतेक ती माहेरींच असे, तेव्हा तेथल्या श्रीमंत, सुखवस्तु, असस्कृत आणि आपल्या पैशाचें आणि वेळेचें काय करावें एवढीच काळजी असलेल्या लोकामध्यें वावरावें लागल्यामुळें हळूहळू ती सुखलोलुप आणि अमर्याद झाली. ' लौकिकाची भीति श्रीमंताना नाहीं ' या मंत्राचा जप जवळपासचे सर्व लोक तिच्या कानात करीत राहिले आणि कालातरानें ते तिच्या मनात ठसूंही लागलें.

कल्याणरावानें चाणाक्षपणानें हें ओळखलें. तिचे चोचले वाढवावे आणि देशमुखाच्या विश्वस्त मनाला फसवून ते पुरवावेत असा त्यानें क्रम सुरू केला. एवढया मोठया इस्टेटीची ही सुदर तरुण आणि कामवेडी मालकीण जर वश झाली तर आपले मनोगत अनायासें साधतील हें जाणून अजून वसंत कितीतरी दूर असतानाही त्यानें तिला प्रकृतीचे निमित्त करून प्रथम लोणा-ळयाला आणलें. आणि वारंवार काहींना काहीं कारणानें तो तिला मुंबईला नेऊं लागला.

अंसेचें मनही हळुहळू वारा पिऊं लागले. तिला लोणावळयापेक्षां मुंबई-लाच राहणें जास्त आवडूं लागले; आणि म्हणून मुंबईच्या एका शहाण्या

डॉक्टरलाही तिच्या प्रकृतीसाठी समुद्रकाठच्या हवेची शिफारस करावी लागली. जुहूला एक कॉटेज भाड्याने घेण्यात आले. सामानसुमान नोकर-चाकर पुढे पाठविण्यात आले; आणि स्वतः मालकीण या महत्त्वाकांक्षी आणि आशेला गुतलेल्या दिवाणजीसह आपल्या नव्या निवासस्थानाकडे जात होती.

वासुदेव वाजपेयीला आपण लोणावळ्याला का आणि कसे आलो हे कटु सत्य लपवून तासाभरात त्याच्या मोटारींतून दादरला पोंचतां आले आणि या यशानें उल्हसित होऊन गतकालीन अपमान आणि कल्याणरावाबद्दल सकृद्दर्शनी वाटू लागलेला तत्कालीन तिरस्कारही क्षणभर विसरून त्याच्याशी तो मोकळेपणाने व आपलेपणानें वागला. असेनें त्याच्याशी त्याच्या वडिलाची नेमनिष्ठा, देशमुखाची प्रकृति, उमापतीपूरचे लोकश्रम, हैद्राबादचें राजकारण, मुंबईच्या स्त्रियाची फॅशन, इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व इत्यादि अनेक विषयावर सबंध प्रवासात त्याच्या शेजारीं बसून चर्चा केली सरळ त्याला जुहूला आपल्या बंगल्यावर जेवायला नेले.

दुसरे दिवशी स्वतः त्याच्या बिऱ्हाडाला आपण होऊन तिने भेट दिली आणि त्याच्या हातचा चहा घेतला. तिसरें दिवशी सबंध दिवस त्याला आपले येथें रहायला बोलावले. चौथें दिवशी त्याला गिरगावात सिनेमाला ब्रह्मचारी बघायला नेले, पाचवे दिवशी जुहूच्या बीचवर स्नानविधि झाला, सहावे दिवशीं राणीच्या बागेत सहल करताना आपल्याला इंग्रजी शिकवायला एक सुशिक्षित शिक्षिकीण शोधण्यासाठीं तिने त्याला सांगितलें. सातवे दिवशीं कल्याणराव त्याच्याकडे पाहून दातओठ खाऊ लागला. आठवें दिवशी पाटील टॅरेसमधील त्याच्या खोलींत त्याच्याबरोबर राहणाऱ्या मित्राने 'तू आजकाल कुठें असतोस? काय करतोस? तुझें लक्षण काहीं ठीक दिसत नाहीं असें त्याला बजावलें.' नववे दिवशी त्यानें निश्चय केला कीं, यापुढें या लोकांकडे जास्त जा-ये करायची नाही आणि कदाचित् त्यानें तो पाळलाही असता. पण—

तो रविवारचा सुट्टीचा दिवस होता, तरी सकाळीच उठून तो स्वतःचें सीझन तिकिट घेऊन खिशात बरेचसे पैसे बाळगून बी. बी. च्या दादरच्या स्टेशनवरून चर्नीरोडला आला. मनात विचार होता कीं इकडेच भटकावें. ओळखीचे उंबरे पूजावेंत आणि जुहुहून निरोप घेऊन गेल्यानतर परत घरीं जावें आणि झोपावें. होय, आदले रात्रीं त्याला अनिमिष जागरण झालें होतें.

गाडींतून उतरताना त्याला दिसलें की, त्या दिवशीची ती शारदा शहाणे त्याच गाडीनें पुढें जाण्यासाठीं प्लॅटफार्मवर उभी आहे. तिच्याकडे पाहिलें न पाहिलेसें करून तो तिकिटगेटकडे वळला. शीळ घालून गाडी चालूं लागली आणि त्याला वाटलें कीं, ती त्या गाडींतून गेली असेलच.

तोंडानें पास म्हणत त्यानें आपल्या कोटाच्या घड्याळाच्या खिशावर हात ठेवला. बकध्यानपूर्वक हात पसरून बसलेल्या टी. सी.च्या अगावरून तो पुढें जाणार, इतक्यात तिनें पाठीमागून हाक मारली. त्यानें ऐकलें न ऐकलेसें केलें पण टी. सी. नें त्याला कोटाचो बाही धरून थांबविलें. त्याने आपलें तिकिट काढून दाखविलें. तेव्हा त्यानें तें लक्षपूर्वक पाहिलें आणि स्मितपूर्वक म्हटलें—

"मला वाटते प्लॅटफॉर्मवर कुणीतरी तुम्हाला हाक मारीत आहे."

एवढ्या वेळात ती 'शारदा शहाणे' गेटपर्यंत आलेली होती. त्याच्या हातांतील तिकिटाकडे पहात तिनें म्हटलें:—

"हो ऽ ऽ. तुमच्याजवळ तर सीझन तिकिट आहे. मग तुम्ही प्लॅटफॉर्मवर येऊं शकत नाहीं असं काहीं नाहीं."

प्लॅटफॉर्म जवळजवळ निर्जनच होता. एका बाजूच्या बाकावर ती बसली आणि नजरेनें तिनें त्याला शेजारी बसण्यास खुणाविलें. "माझी तुम्ही गाडी चुकविलीच आहे. तेव्हां दुसऱ्या गाडीच्या वेळेपर्यंत आपल्याला इथें बोलत बसलेच पाहिजे." तिनें आपल्या हातातील घड्याळाकडे पहात म्हटलें.

"मीं गाडी चुकविली..."

" हो ऽ. तुम्ही दिसला नसतात तर मी त्या गाडीनें गेलेच असतें मुळी." तिनें हसत हसत म्हटलें.

त्याला हसणें – निदान स्मित करणें तरी भाग होतें.

"आणि आपली अशी अकस्मात गाठ पडली हें बरं झाल नाहीं कां ? नाहींतर मुद्दाम भेटायच म्हटल तरी — मला तुमचा पत्ता माहीत होता म्हणा. पण तुम्हाला माझा पत्ता कुठ ठाऊक होता ? "

हो खरच. त्याला अनेक वेळा, तिच्याविषयींच्या स्मृति जेव्हां उत्कट झाल्या, तेव्हा या गोष्टीची जाणीव झाली होती " आणि माहीत असता तरी मी आपल्या सौजन्याचा फायदा घेतला नसता " – असें काहींतरी तो म्हणणार होता. इतक्यात तिनें म्हटलें—

" ता खरच; तुमच सीझन तिकिट चर्चगेटपर्यंत आहे ना ? "

" होय. "

" मग मिळूनच जाऊ आपण. "

त्यानें बुचकळ्यात पडून प्रश्नार्थक मुद्रेनें तिच्याकडे पाहिलें. कितीतरी फरक तिच्यांत झालेला त्याच्या लक्षात यायला हवा होता. – पण आला नाहीं.

" चर्चगेटपर्यंत — मला तिथं काहीं फारसं काम नाहीं. एका मैत्रिणीला भेटायच आहे उभाउभी – आणि जातायेता खुपस बोलायलाही मिळेल."

एवढं काय बोलण असेल हे त्याला काहींच कळेना – पण तो तिजबरोबर गेलाच.

आणिं खूप बोलणही पण झालं. त्याला अचंबा वाटला कीं, त्या दिवशीं जिनें मूर्तिमत दाक्षाियिणीचा अवतार धारण करून आपल्याला आगगाडींतून जवळजवळ हाकून दिलें, तीच ही शारदा शहाणे का ?

चर्चगेटला उतरून तो तिच्या ख्रिश्चन मैत्रिणीकडे नेला गेला. तिचा एक चांगला मित्र म्हणून परिचित झाला. त्यांच्या आपापसातल्या बोलण्यावरून त्याला कळलें कीं शारदा शहाणे नोकरीच्या शोधांत आहे.

घरच्या परिस्थितीमुळें तिला तसें करणें भाग आहे. ती अगदीं घायकुतीला आली आहे. मैत्रिणीच्या प्रयत्नाला यश आलें नाहीं असें कळताच ती निराशेने अगदीं रडकुंडीला आली.

परत येताना त्यानें तिला सांगितलें कीं, हैदराबादकडील एक श्रीमंत देशमुखीण जुहूला येऊन राहिली असून, तिला इंग्रजी शिक्षकीण हवी आहे. तिनें मोठ्या औत्सुक्यानें या बातमीचा स्वीकार केला. "तुम्ही मला मदत करालच" असा विश्वास बोलून दाखविला. आपली उपकृत बुद्धि हरिणसदृश नेत्रांनीं व्यक्त केली; आणि वासुदेव वाजपेयी कोरड्या बर्फासारखा विरघळला.

तिने त्याच्याकडून त्या श्रीमंत देशमुखिणीचे नावगाव, पत्ता, भेटण्याची वेळ इत्यादि लिहून घेतले आणि मी उद्या सकाळीं मुद्दाम जाऊन तुमच्याबद्दल शिफारस करीन असें अभिवचनही घेतले.

त्याला राहून राहून नवल वाटलें कीं, त्या दिवशीचा पहिला सुखद स्पर्श, त्यानंतरचे ते विचित्र प्रसंग, आणि आजचा तिचा हा मनमोकळेपणा हे असे कसे?—असें का?

आणि तो मोठा शास्त्रज्ञ असता तरी त्याला कदाचित् हें कळलें नसतें, आणि म्हणून तर विद्वान् पंडित वादांत जिंकतात आणि प्रेमात पराभव पावतात.

त्याला वाटलें कुणाशीही आपलेपणानें वागावें हा कामिनीचा जातिधर्मच असावा, आणि असेचे उदाहरण समोर होतेंच. तसें पाहिलें तर तिच्या वर्तनातील दूरता केव्हांही कमी झाली नाहीं, पण त्याला आपले वाटलें.

ऑपेरा-हाऊसजवळ तिनें त्याला सोडलें आणि त्यानें देऊ केलेला चहा निक्षून नाकारला. त्यानें तिला पत्ता विचारतांच ती विचारांत पडली आणि शेवटीं "मी सध्या आपल्या मैत्रिणीकडे आहे. मीच उद्यां संध्याकाळीं तुमच्याकडे येईन. तुम्ही आपला पत्ता बदलला नाहीं ना?" येवढेच म्हणाली.

त्याच्या मनानें प्रश्नमालिका ओविलीः—ही कोण ? कुठली ? नोकरी का शोधते ? मैत्रिणीच्या घरीं का राहते ? आपल्याला तिनें चर्चगेटला कां नेलं ? आपण का गेलो ? तिची शिफारस करण्यासाठीं असेकडे जाण्याचें आपण का कबूल केलें ?

आणि उत्तरादाखलही पुन्हा प्रश्नच.

तिच्याशी आपल्याला काय करायचें आहे ? आपण तिच्याबरोबर जाण्यांत चूक केली का ? आपण असेकडे जावें का ?

आणि शेवटीं—

तरुण कुमारिका नेहमी अशाच विसगत वागतात का ? आपण असेकडे गेलो नाहीं तर उद्या शारदा शहाणे आली म्हणजे काय म्हणेल ? पण कबूल केल्याप्रमाणे ती येईल का ?

दुपारींच तो असेकडे गला. जुहूचें ते कॉटेज लहानच होतें. दोन बाजूला लहानशी बाग होती, तिसऱ्या बाजूच्या तीन खोल्याच्या खिडक्या समुद्राच्या वाऱ्याशीं संतत सामना करीत होत्या. या खिडक्याच्या काचेच्या तावदानाच्या आंतून पडदे होते. या खोल्या खास असेच्या उपयोगासाठीं—एक बसायउठायची, एक निजण्याची आणि एक लहानशी स्नानगृहाची— होत्या.

समोर कुणी दिसलें नाहीं. दिवाणखान्याचें दार बद होतें. मागील बाजूला मोटारखान्याचा भय्या, आचारी, ड्रायव्हर आणि बाल्या गप्पा मारीत बसले होते. दाराजवळचें विजचें वर्दीचें बटन दाबण्याएवजीं तो नेहमीं येणाऱ्या माणसाच्या सराईतपणानें बागेंत गेला. त्याच्या गप्पांचा विषय श्रीमत लोक आणि त्याची वागणूक हा होता आणि तो रंगातही आला होता पण त्याला पाहतांच बाल्या सामोरा आला. आणि त्यानें सांगितले कीं बाईसाहेब स्नान करीत आहेत आणि कल्याणराव मुंबईला गेले आहेत. नतर मागील दारानें नेऊन त्याने त्याला बाईसाहेबांच्या बसण्याउठण्याच्या

खोलींत बसविलें आणि तो रंगात आलेल्या गप्पांमध्यें भाग घेण्यासाठीं निघून गेला.

बराच वेळ वासुदेव वाजपेयी त्या आधुनिक रीतीनें सजविलेल्या खोलींत वस्तुमात्राचें निरीक्षण करीत बसून राहिला. नंतर त्याला स्नानगृहातून अस्फुट आलाप ऐकूं येऊं लागले. देशावरील स्त्रियांच्या भुलईतील गाण्यासारखे ते सूर होते. मधून मधून एखादा चरण स्पष्ट ऐकूं येई :—

"लाडे लाडे येते ही ऽ मनभंजना –"

कांहीं वेळानें गाणें बंद झालें. सर्व सामसुम झालें. आणि वासुदेव वाजपेयी एका सखोल कोचामध्य बसून वेळ घालविण्यासाठीं समोर मोठ्या फ्रेममध्ये टांगलेल्या 'आदमची स्वर्गातून हकालपट्टी' नावाच्या सुप्रसिद्ध विलायती चित्राकडे अळसटपणे पहात राहिला.

असेने स्नानगृहाचें दार अर्धवट उघडून पाहिले, स्वतःशींच स्मित केलें, तेथल्या पूर्णाकार आरशात पाहून मिस्किसपणें डोळे मिचकावले आणि सुटलेला अंबाडा बांधत बांधत ती सहजगत्या त्याच्या समोर आली. चमकली, लाजली, क्षणभर त्याच्याकडे टक लावून पहात राहिली, आणि चटकन् शय्यागारात निघून गेली.

चित्रातील एखादी आकृति तर सजीव होऊन आपल्यासमोर येऊन उभी राहिली नाहींना असें क्षणभर त्याला वाटलें आणि कदाचित् क्षणभरच असेंहि वाटलें असतें कीं, तिला स्पर्श करावा पण हें सर्वच त्याला अगदीं अनपेक्षित होतें म्हणून तो चकित झाला आणि निष्क्रिय राहिला. त्याचें मन शारदा शाहणेच्या विचारानीं भारलें होतें आणि म्हणून तें निर्जीव चित्र आणि हें सजीव चित्र त्यावर हवातसा परिणाम करूं शकलें नाहीं आपण येऊन येथें बसलों आहोंत हे असेला माहीत नसेल – अगदीं बाजूच्या स्नानगृहांत असलेल्या असेला आपण येथें येऊन थोडा वेळ नोकराशीं मोठ्यानें बोलल्यानंतरही—

माहीत नसेल या कल्पनेवर त्याचा विश्वास बसेना; आणि असें असूनही असा स्नानगृहांतील एकांत या ठिकाणी कल्पून कशी आली याचा त्याला उमज पडेना. त्या कुशल युरोपियन कलावंताला असंख्य आकृतींच्या सहाय्यानें उत्पन्न करतां आलें नसेल, इतकें मादक वातावरण या एका सजीव आकृतीनें उत्पन्न केलें याची जाणीव त्याला झाली आणि तो कावराबावरा झाला. स्वतःवर त्याचा पुरता विश्वास नव्हता आणि या प्रसंगीं आपण शुकवत कसें राहिलो याचें त्याला कौतुकही वाटलें. अस्वस्थ होऊन त्यानें समुद्राकडील खिडकीचीं ताव-दानें उघडलीं. शीतल वारा त्याच्या अंगावरून आंत घुसला. त्याने बाहेर पाहिलें तो बीचवर पुष्कळशा श्वेतांगना दुपारच्या उन्हांत जलक्रीडा करीत होत्या. शय्यागारातून असने म्हटलें:—"ह बसा ह वासुदेवराव, मी आलेंच तुम्ही केव्हा आला पत्ताच नाहीं."

कांही वेळानें बाहेर येऊन तिने त्याच्या येण्याची वर्दी आपणाला तत्क्षणींच न दिल्याबद्दल नोकरांवर यथेच्छ तोंडसुख घेतलें. तो समजून चुकला कीं ही निव्वळ बतावणी आहे. अंगावर आलेला डाव सावरण्यासाठी ही हुलकावणी आहे.

इकडचे तिकडचें बोलणे झालें, शारदा शहाणेविषयीं सांगणें समजावणें झालें, कॅरम बुद्धीबळें खेळणें झालें, योग्यवेळीं चहापाणी झाले, सायंकाळीं तिच्याबरोबर बीचवर फिरणें सवरणें झालें, तिच्या आग्रहास्तव रात्रीं जेवण खाण झालें आणि मोठ्या शिकस्तीनें रात्रींच्या शेवटच्या लोकलनें तो परत दादरला आला. त्यानें सुटकेचा निश्वास सोडला, देवाचे आभार मानले, मनाचा निर्धार केला. शारदा शहाणेचें चिंतन केलें आणि निद्रेचें आराधन केलें.

दुसरे दिवशीं शारदा शहाणे आली नाहीं. तिसरे दिवशींही आली नाहीं आणि पुढें पधरा वीस दिवस गेलें तिचें कांहींच वर्तमान कळले नाहीं. तो इकडेही कधीं गेला नाहीं आणि अंधेकडूनही कुणी आले गेलें नाहीं.

## प्रकरण ५ वें

विद्येला आणण्यासाठीं नादगावला गेलेला शंभूराव दुसरे दिवशीं सकाळीं परतला. त्यानें सांगितलें कीं, नादगांवच्या धनजी भाईची मालाची लॉरी नादगांवहून आली, तिच्यांत ताईसाहेब रात्रींच इकडे आल्या. रात्रींची हकीगत शंभूकरवीं ऐकून त्याला फार वाईट वाटलें. त्यानें त्यालाच सगळा दोष दिला. "तुझी अक्कल अशी कशी गेली !"

गावांत शोध करण्यासाठीं शाहूराव गेला पण कांहीं पत्ता लागला नाहीं. दादासाहेबांचें वागणें त्याला वावगें वाटणें शक्यच नव्हतें इतकी त्यांच्यावर त्याची भक्ति होता.

शाहूराव भिदबा पाटलाचा मुलगा. वास्तविक शिवारच्या पाटिलकीचें सगळें उत्पन्न त्याचें एकट्याचें. चाळीस वर्षांपासून दोन आणे आठ पैचा हिस्सा आणि दोन शेतें यावरच शिदबाला आयुष्य कंठावें लागलें होतें. आणि ही दोन्हीं सोन्याच्या तुकड्यासारखीं शेतेंही वारसाचौकशीपायीं झालेल्या कर्जांत हरीराम रामरतन मारवाड्याकडे जात होतीं. पण दादासाहेबांनीं मोठें मन केलें, सिदबाला आश्रय दिला, त्याचीं शेतें आपल्या पदरचे पैसे देऊन वाचविलीं, आणि त्यापायीं त्या सावकाराशीं वैमनस्य संपादन केलें.

शाहूराव अगदीं लहान असतानाच सिदबानें आपला देह ठेवला. त्याची फार इच्छा होती कीं आपल्या मुलानें शिकावें, शहाणें व्हावें आणि नांव

काढावें दादासाहेबांनी त्याला शिक्षणासाठीं हैद्राबादेस ठेवलें आणि त्याच्या अज्ञानपणीं त्याच्या "हरळीच्या मुळांचीही" योग्य काळजी घेतली.

पण शिक्षणाचें शाहूला साधलेंच नाहीं शाळेंत नेहमी हुशार म्हणून गाज लेल्या वासुदेव वाजपेयीला जिवलग मित्र करावं यापलीकडे शिक्षणाशी त्याचे जास्त सख्य झाले नाहीं वासुदेव मॅट्रिकसाठी ज्या वर्षी पुण्याला गेला त्याच वर्षी तिसऱ्या यत्तेतून शाळा सोडून तो गावी आला. त्यानतर त्या उभयताचा सबंध हळूहळू सुटत चालला. वर्षादोनवर्षात पत्रव्यवहार बंद पडला. पुढे वर्ष-सहा महिन्यानीं अचानक गाठ पडली असे होत राहिले आणि अलीकडे तर आपापलें जीवनात गर्क झालेले ते एकमेकाना विसरलेच होते

शाहूराव एक दिलदार भावनाशील कडवा तरुण होता. दणकट शरीर आणि मोकळें मन यानीं त्याच्या ठिकाणी अडदांडपणा आला होता. शिक्षण सरलें तरी वाचनाचा नाद विशेषत. कादंबऱ्याचा कायम राहिला विवे-चनाचें शास्त्र अध्ययनाने आले नाहीं तरी व्यवहाराचें चातुर्य अनुभवाचे आलेच शाळेतील शिक्षकाच्या गंभीर प्रकृतीचा मनावर परिणाम होऊन स्त्रिया, देश आणि सत्कार्य याबद्दल अत्यंत आदर बसून राहिला. काहीं करावे तरी अशी कळकळ वाटू लागली

आपल्या दक्षतेनें आणि प्रामाणिकपणाने त्यानें दादासाहेबाचा इतका विश्वास संपादन केला कीं, स्वत.चे सगळे व्यवहार सांभाळून तो दादासाहे-बांचाही कारभार पाहू लागला विद्या त्याला वचकून असे. पण तिच्याशी तो कधीं बोलतही नसे. ती अशा तऱ्हेने निघून गेली याचें त्याला मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं. कारण ती किती लहरी आणि अभिमानी आहे हे त्याला चांगलें माहीत होते. तो मुकाट्यानें तिच्या शोधांत राहिला गावात किंवा जवळपास ती नाहीं अशी खात्री होताच त्यानें तिच्या आजोळीं तार केली. पण दोन दिवस तारेचें उत्तर आले नाही. तेव्हा दादासाहेबाना अधिकच काळजी वाटू लागली. आणि शाहूरावानें स्वतः शोधाला जावे असें ठरले

तो शहापुरला पोंचला तेव्हा बापूजी नाइकाच्या दाराला कुलूप होतें. हिरेमठ सावकाराच्याकडे समजले कीं आठ दिवसापूर्वी बापूजींना अचानक मृत्यू आला. ते पुण्याला जायला निघाले होते व त्यांनीं विद्येला पुण्याला येण्यासाठीं तार केली होती. पण निघताना फीट येऊन ते टांग्यातून बेशुद्ध होऊन पडले ते शुद्धीवर आलेच नाहीत. विद्येची आजी आपल्या भावाबरोबर कोंकणात गेली. त्यानतर दुसरेच दिवशीं विद्या येऊन पोचली. बापूजींच्या मृत्यूच्या बातमीनें तिला जबर धक्का बसला. बापूजींची येतो म्हणून तार आली आणि त्यानतर त्यांचा काहींच पत्ता नाही म्हणून शोधासाठी मी आलें असे तिनें सागितले. एक दिवस हिरेमठाच्याकडे राहून ती मुबईला निघून गेली. शेवटीला जाण्यायेण्यासबधी ती काहींच बोलली नाहीं.

शाहूराव नतर दादरला पुष्पा हिरेमठच्या मामाकडे आला. पण तिथें त्याची निराशाच झाली. त्यानें सारी हकीकत सागून उलट पुष्पालाच काळजीत टाकलें. आल्यासारखा तीनचार दिवस तो मुबईत राहिला, पण विद्येच्या शोधाचें काम यापुढें तिच्या मैत्रिणीकडेच सोपविणे त्याला भाग होतें. मुबईहून परत निघण्याच्या दिवशी दुपारीं असाच गिरगावांतून जात असतां ठाकूरद्वारच्या नाक्यावर त्याची अचानक त्याच्या शाळेतला स्कॉलर मित्र वासुदेव वाजपेयी याची गांठ पडली. उभयतां शेजारच्या उपहारगृहात गेले. आपण कां आलो हें त्याने काहीं खरें सागितले नाहीं. दादासाहेबाच्या घराण्याच्या लौकिकाची तमा त्याला वाटून राहिली. वासुदेवालाच त्यानें कुठें असतोस, काय करतोस, पुढें काय करणार इत्यादि अनेकविध प्रश्न विचारलें.

वासुदेव वाजपेयीने प्रामाणिकपणे त्याला सागितलें कीं नोकरी न मिळाल्यामुळें आपण येथें एल्‌एल्. बी. होण्यासाठी आलो आहोत आणि वढाईखोरपणें असें सागितलें कीं, यापुढें नोकरी न करतां ग्रामोद्धाराचें कार्य करायचें अशी आपण शपथ घेतली आहे.

ग्रामोद्धाराचें नाव निघताच शाहूराव खूपच बोलू लागला. कारण त्यावर अशिक्षिताच्या व्यवहारी दृष्टीनें त्याने बराच विचार केला होता आणि काही स्वतःच्या कल्पनाही निर्णीत केल्या होत्या.

एका सुशिक्षित माणसानें असें एखाद्या खेड्यात जाऊन रहायचें ठरवलें आणि शिक्षण देत राहून निरपेक्षपणे हिताहिताचा सल्ला गावकऱ्याना देण्याचा परिपाठ ठेवला तर थोड्याच अवधीत गावच्या लोकाचा त्याच्यावर विश्वास बसेल आणि या विश्वासाच्या जोरावर तो तेथला राजाच होईल. वाटेल तें त्याच्या हातून करवू शकेल, पण प्रथम माणसानं गावकऱ्याचे अज्ञान काढले पाहिजे आणि त्याच्यात विश्वास उत्पन्न केला पाहिजे

ग्रामोद्धारावर त्याचे बरेच बोलणे झाले आणि शाहूरावाचे म्हणणें पडलें की या स्कॉलर मित्रानें शिक्षण सोडूनही ग्रामोद्धार कार्यासाठीं शेवतीला यावे आणि त्यानें शिक्षण सरल्यावर येईन असें वचनही दिलें. यापुढें तरी पत्रव्यवहार कायम ठेवला जाईल अशी प्रतिज्ञा करून, उभयतानीं एकमेकांचा निरोप घेतला.

पण वासुदेव वाजपेयी ग्रामोद्धाराबद्दल किंवा कशाबद्दलही तितका उत्सुक नव्हता. अलीकडे अभ्यासात किंवा कशातच त्याचे लक्ष लागेना. वेळीं अवेळीं केव्हाही शारदा शहाणे येईल या आशेनें त्यानें सतत घरीं राहण्या-पासून कुठं जवळपास गेलें तरी शेजारी निरोप सागून ठेवण्यापर्यंत सर्व प्रकार करून पाहिले. खोलीला सहसा कधीही कुलूप लागू दिलें नाहीं. पण जसजसे दिवस जाऊ लागले तसतसे त्याने घरात बसणें सोडून ती भेटण्याचा सभव असेल अशा ठिकाणीं भटकण्याला सुरवात केली. अशाच एका प्रसगीं त्याची शाहुरावशी गिरगावात गाठ पडली. आणखी काहीं दिवस गेले आणि चर्चगेटजवळच्या तिच्या त्या ख्रिश्चन मैत्रिणीच्या घरासमोर फेऱ्या घालणाऱ्या वासुदेव वाजपेयीने त्या मैत्रिणीला बाहेर निघताना पाहून हटकून विचारलेच.

तिचे लक्ष आपणाकडे आहे असे पाहून तो स्मित करीत जवळ गेला व आपली घोंगडीची टोपी काढून हातात घेत ऐटीत चाचरत म्हणालाः—

"हॅलो! चांगली सायकाळ! आपली उभयताची मैत्रीण अलीकडे तुम्हाला कधी भेटली का?"

तिने त्याच्याकडे पाहिले, ओळखलें. पण ओळख कबूल करावी की नाहीं याबद्दल क्षणभर विचार केला असावा आणि म्हटले:—

"नाहीं, ती एकदा आली होती पण माझी भेट झाली नाही, म्हणून चिठी ठेवून गेली त्यात तिने आपल्याला नोकरी मिळाल्याचे उल्लेखिल होते मला वाटते ती बाहेरगावीं गेली असावी"

तो कांहीं बोलणार इतक्यात तिने कोणाला तरी येताना दुरून पाहिले असावे चटकन् "बरय्-चांगली सायकाळ, मला माफ करा ह ऽ ऽ" असे म्हणून ती त्याच्यापासून दूर गेली.

कांहीं दिवस गेले आणि त्याची निराशा दृढमूल झाली. चर्नीरोड स्टेशन-वरच्या त्या तिकिटइन्स्पेक्टरची बदली झाली नाही तर त्याने याला रोज सकाळ सध्याकाळ तासतास प्लॅटफॉर्मवर घालविताना पाहिलें आणि लक्षांत घेतले असते.

आता त्याच्या मनाने घेतलें का, आपल्या हातुन कांहीं अभ्यास होणें शक्य नाहीं. मग शाहूरावाच्या म्हणण्याप्रमाणें त्याच्या गावी तरी का जाऊ नये?

पण अचानक नवल वर्तलें. अशाच एका रविवारी सकाळी चहा घेऊन वेळ कसा भरावा याचा विचार करीत तो आरामखुर्चीवर पडला असताना त्याची चिरवाञ्छित शारदा शहाणे दारात येऊन उभी राहिली.

तिची कळी चांगली खुललेली दिसत होती. पहिल्या भेटीला अवश करण्याला कारण झालेली प्रसाधने आज नव्या स्वरूपात नादत होती. त्याला अकारण आवडणाऱ्या स्लेट रंगाची साडी ती गोल नेसली होती. बिनबाह्यांच्या

रेशमी जपरवर काळा शेपटा रुळत होता. पेटट लेदरचा काळा बूट, नस-लेल्या उबऱ्याला ठोकरा देत होता. दोन्ही दारावर हात ठेवून ती म्हणाली.–

" काय चालल आहे ! "

गडवडीनें उठून वाजपेयी म्हणाला:–" काहीं नाही. उगीच स्वप्न याना आंत. आज वाकडी वाट कुणीकडे केली ? "

" मी तुमचे आभार मानायला आले आहे. "

" कशासाठीं ? "

" तुम्ही माझी असाबाई देशमुखाच्याकडे शिफारस केली ना ? "

" बर मग ? "

" त्या दिवसापासून मी त्याच्याकडे कपॅनियन म्हणून राहिलें आहे. " वासुदेवाला चक्क झाले

"जवळ जवळ महिन्यांत तुम्ही तिकडे अजिबात फिरकला नाहीं ! " तो मनातल्या मनात चूर राहिला—

" कां आला नाहीं ? " तिने निरखून विचारलें.

वाजपेयींनें खाला पहात म्हटले, " उगीच. काहीं विशेष कारण नाही. वेळ मिळाला नाहीं. अन् शिवाय तुम्ही तिथें असाल अशी मला मुळींच कल्पना नव्हती. "

"असाबाईनीं तुमची पुष्कळदा आठवण केली. "

" बसाना. असे उभाऊभी कुठवर बोलणार ! "

" कशाला ? जावच झाल."

" वा ! चहा घेतल्याशिवाय ! "

बाहेरून सामान घेऊन येणाऱ्या बाल्याला त्यानें चहा सांगायला सांगितलें.

" नको, मला संवय नाहीं."

" बर दूध आणायला सांगतों. आणि श्रूजबेरी."

" कशाला पण ? "

" वा ! असं कस होईल ? मला कस पॅरॅडाईज लॉस्ट सारख झाल होत ! मला कळल तुम्ही परगावाला गेला."

"कुणी सागितल ? "

"तुमच्या त्या चर्चगेटच्या मैत्रिणीन "

" मी तर तिला मला नोकरी मिळाली एवढच कळवलं होत–हो ऽ कदाचित तिनें तर्क केला असावा—

" असेल. ही सध्याची नोकरी कशी काय वाटली तुम्हाला ? शिकवणी पण असेल ? "

" ओ.के. राहणें, जेवण, चहापाणी, शिकवणी, रजा, सुट्टी, सर्व कांहीं आणि वर नाटकसिनेमा भरतीला ! आजच पगार घेतला गेल्या महिन्याचा. चालेल तितके दिवस काहीं वाईट नाहीं. " बोलता बोलतां तिनें रिकाम्या आरामखुर्चीवर अंग टाकलें.

" मग काय तुम्ही या देशमुखाच्या श्रीमत सुनेवर खुष आहां तर ? "

" तुम्ही पण नाखूष दिसतां त्याच्यावर ? "

" तस काहीं नाहीं ! "

" मग आजच कां येत नाहीं तिकडे ? "

" अंबाबाईनीं किती किती बोलावलें आहे. बरोबर घेऊनच यायला सागितलें आहे मला " आणखी इकडचें तिकडचें बोलणें झालें. खाणेंपिणें झालें आणि तो तिच्याबरोबर बाहेर पडला. बोलतां बोलता त्याला कळलें कीं, देशमुखणीचे कुलमुखत्यार कल्याणराव घरांत फारसे नसतातच ! नवीन मास्तरीणबाई येतांच त्यांना समजून चुकले कीं, आपली जबाबदारी अजीबात कमी झाली. ते चारपांच दिवसांनीं केव्हांतरी जेवणाच्या वेळेला हजर असले

तर असले, आणि सध्यातर काहीं निमित्तानें काहीं दिवसासाठी स्वतःच्या गावीं निघून गेले होते.

आणि या त्याच्या उदासीनतेची कुणाला फारशी पर्वाही नव्हती. असाबाईला त्याचा ससेमिरा सुटल्यामुळे हायसें वाटले. तिनें नवे चादणे पाहिले होते.

शारदा शहाणेसाठी वासुदेव वारवार जुहूला जाऊ लागला. आसा आनंदित झाली. वासुदेव पुन्हा येऊ लागला. त्या दिवशीच्या प्रसंगानंतरही — हे पाहून तिला समाधान झाले आशा वाटू लागली निदान भीति तरी उडाली तिघाच्याही मनात उत्साहाचें नवें क्षितिज निर्माण झाले.

विद्येला त्या वादळी अंधारमय रात्रीनंतर बाणेदार जीवनाचा उषःकाल नवे नामाभिधान — नव्या ओळखी — नवा अनुभव !

असेला त्या उन्मादाच्या अधःपाताभिमुख भयाण क्षणैक प्रसंगानंतर आशेचे नवे किरण.

वासुदेवाला हरवलेल्या खेळण्याची पुनः संधि, न शिकलेल्या खेळाची गोडी. न प्यायलेल्या वारुणीची नशा —

जसजसें ऊन वाढूं लागले तसतसा असाबाईला मुंबईचा कटाळा येऊं लागला कुठे जावे, कसे जावें, याबद्दल काहीं दिवस खल झाला. आणि असें ठरलें कीं, पनवेलमार्गें मोटारने महाडला जावे, रायगड पहावा आणि तसेंच प्रतापगडावरून महाबळेश्वरीं जाऊन तेथे सीझन संपेपर्यंत मुक्काम करावा. कल्याणरावाचे गेल्यापासून पत्रच आलें नाहीं. पण देशमुखाच्याकडून रक्कम मात्र खर्चासाठीं आली.

शारदा शाहणेचें एकटीच्या जबाबदारीवर सर्व व्यवस्था करण्याचें धैर्य होईना म्हणून तिच्यासाठीं महाबळेश्वरापर्यंत येण्याचे वासुदेव वाजपेयीनें कबूल केलें. सुटीच असल्यामुळें त्याला तरी काय काम होते ! दादरच्या पाटील

टेरेसमध्ये त्याच्याबरोबर राहणाऱ्या त्याच्या मित्राचा वडील भाऊ महाडला नोकरीवर होता. त्याला सविस्तर पत्र पाठविलें गेले. तारेनें उत्तर मागविले. आणि अपेक्षित उत्तर आल्यानतर भय्या आणि आचारी याना हुकूम देण्यात आला की, त्यानीं सामानासह जाऊन पुण्यास रहावें. आणि महाबळेश्वराहून मालकिणीची तार येताच तेथें निघून यावें. काकणी बाल्याच्या पोराला बरोबर घेण्यात आले आणि ती भली मोठी लाल आस्तरणाची लॅन्सिया एक दिवशीं सकाळीं जुहूच्या वाळवटाला वंदन करून निघाली.

सायकाळी महाडला त्याचें यथोचित स्वागत झालें. उकाडा जास्तच होता. दुसरे दिवशीं सकाळी जवळचे ऊन पाण्याचे झरे पहायला जाण्याचा कार्यक्रम झाला:—

नदीपलीकडील एका मळ्यातील त्या एकात उष्णोदकाच्या हौदात शारदा शहाणेसह मनसोक्त डुबण्याचें स्वारस्य वासुदेव वाजपेयीला जुहूच्या जलविहाराहून जास्त वाटले. अर्धा तास त्या गधकमिश्र पाण्यात राहिल्यानतर लागणारी भूक ही खरी भूक नसून उद्दीपक परिस्थितीनें उत्पन्न होणारी मनसिजाची मूर्च्छना आहे असेंच त्याला वाटत राहिले आणि काहीं वेळाने त्या दोघींनीं बाहेर येऊन, वस्त्रातर करून भुकेजून जेव्हा त्याला फराळासाठीं बोलाविलें, तेव्हांही आपण भुकेले आहोत का भोगातुर आहोंत या भ्रमातच तो होता.

महाडचे ते सद्गृहस्थ मोठे आर्जवी आणि उमद्या स्वभावाचे दिसले. त्याची पत्नी आपल्या धाकट्या मुलाना घेऊन माहेरपणाला गेलेली होती. घरात नुकतीच इग्रजी शाळेंत जाऊ लागलेली मुलगी आणि स्वयंपाकाची म्हातारी फक्त होती. मुलीच्या आग्रहास्तव आठवड्याच्या सुट्टीला जोडून त्यानीं एक दिवसाची रजा घेतली, आणि गडावर राहण्याची सर्व व्यवस्था करून देऊन तेही स्वतः बरोबर आले.

दुपारींच सर्व मंडळी पायथ्याच्या गावाला येऊन पोंचली. चढण अवघड, कठीण, डोंगरी म्हणून असाबाईसाठीं एक डोली ठरविण्यात आली. सामाना-

साठीं आणि जरूर पडल्यास त्या मुलीला खांद्यावर घेण्यासाठीं एक मावळाही बरोबर घेण्यात आला; पण त्या मुलीनें अभिमानानें आपल्या शक्तीबाहेर असलेली गडाची चढण चढून जाऊन आणि रात्रीं गडावर मुक्कामाला पोंचल्यानतर पाय दुखूं लागल्यामुळें उपचार करून घेऊन कौतुक आणि विनोद यांना विषय मिळवून दिला. शारदा शहाणे तर मुलखाची मानी. आपण चपळपणांत पुरुषांपेक्षां मुळींच कमी नाहीं हे सिद्ध करण्यासाठीं ती अल्लडपणें सर्वांच्या-पुढें त्यांच्याबरोबर चालू लागली.

पहिल्यानें कांहीं वेळ सगळें साजून गेले. पण पुढें पुढें वाऱ्यानें केस विस्कळित केले, उन्हाच्या तिरपेनें कपोलावर घर्मबिंदु आणले, चालण्याच्या श्रमाने दम लागला, बोलणें बंद झाले, गति मंद होऊं लागली, वारंवार विश्रांतीसाठीं थांबावें लागू लागले, पण कबूल कोण करील ? अर्ध्या वाटेवर दोन डोंगरांच्या सापटीतील खिंडींत वारा इतक्या जोरानें वहात होता कीं, अशक्त माणसाला आपला तोल कष्टाने सांभाळावा लागावा. या ठिकाणी थांबून शारदा शहाणे म्हणाली " या वाऱ्यावर एखादे टरबाईन चालवून रायगडावर विजेचा पुरवठा सुद्धा करता येईल नाहीं का ? "

" हो ऽ आणि त्या विजेवर एखादा लिफ्ट सुद्धा चालविता येईल.

" लिफ्ट नकोय् मला. लाईट पाहिजे. "

" पुढची चढण अजून अवघड — अगदी उभी दिसते आहे बर का ? "

" कांही नको मला हिणवायला — तुम्ही सुद्धां काहीं कमी दमलां नाहीं !"

" मला तरी कुठें चढण्याची सवय आहे ? आणि मी थकणार नाहीं असा तरी कुठें बाणा धरला होता ? पण शेवटपर्यंत टिकून राहीन एवढ खर ! "

" आणि मी राहणार नाहीं वाटत ! "

" हेच आश्वासन मला हवं ... "

" शारदा शहाणे एकदम त्याला अभिमुख होऊन म्हणाली, " कोणत्या अर्थान म्हणता बरं ? "

" इन्या त्या अर्थान "

" म्हणजे हो ऽ – गूढगुजन आहे म्हणायचं ! "

" तस म्हटल तरी – "

" ही पहा मागची मडळी आली. त्यानी आपल्याला गाठल अस व्हायला नको "

असे म्हणून ती भराभर चालू लागली. किती तरी वेळपर्यंत कुणी बोलले नाहीं. हिरकणी बुरुजाच्या सुळक्याखालून पाऊलवाट जाऊ लागली तेव्हा वासुदेवनें म्हटलें: —

" हाच तो हिरकणी बुरूज असावा. जाताना दिसतो म्हणतात तो "

" किती उच्च आलो आपण " तिने दुसऱ्या बाजूच्या खोऱ्याकडे पाहून म्हटलें. " ती पहा मागची मडळी किती तरी खाली राहिली."

" हिरकणी हें नाव एका गवळणीवरून पडल नाहीं का ? " बाजूच्या एका सपाट दगडावर बसून शारदा शहाणे म्हणाली.

" हो; घरच्या ओढीमुळे ती शिवाजी महाराजाची आज्ञा मोडून येथून उतरली."

" या उभ्या दरडीवरून उतरली ! "

" बुरूज नव्हता त्या वेळी. जिवावर उदार झाली म्हटलें पाहिजे. "

" प्रेमाने बेफाम झाली होतीना त्या वेळीं ? "

" तान्ह्या मुलाला घरीं ठेवून गडावर दूध घालायला आली होती; रात्र झाली आणि गडाचे दरवाजे बद झाले."

" घराची ओढ इतकी विलक्षण असते अं ऽ ! "

" घर केल्याशिवाय कस समजणार ? "

" ओढ लागल्याशिवाय घर कस करायचं ? "

" असे म्हणून ती अल्लडपणे हसू लागली आणि हसतच म्हणाली: —

" खरच, असं काहीं तरी साहस केल्याशिवाय कृतार्थताही नाहीं. हो ना ?"

" कोणते साहस ? " असें विचारावें असे त्याला वाटलें, पण तो नुसते म्हणाला :—

" हा उभा डोंगर पाहून पाहणाऱ्याचे डोळे फिरतात. अशा ठिकाणाहून रात्रीं एकटी एक गवळण उतरून आली हे खरसुद्धा वाटायसारख नाहीं."

" पण तो काळही वेगळा होता, शिवाय ती रोज गडावर जाणाऱ्या-पैकी होती "

पण तिनं कबूल केले कीं, आपली सरळ पाऊलवाटेने चालण्यातही फजिती झाली. अननुभवामुळें आपली वेषभूषाही हास्यास्पद झाली. पातळ चामड्याच्या मद्राशी वाहाणा डोंगरी रस्त्याला कशा चालणार ? आणि महाडाहून निघताना गडावर थंडी असते अशी सूचना मिळाली असूनहि आपण बरोबर घेतलेले गरम कपडे गड्याच्या डोक्यावरील गाठोड्यात ठेवले आणि एक तलम पातळ व रेशमी जंपर यासह ऐटींत गड चढायला सुरवात केली व्हॅनिटी बॅग ऐवजीं हातात काठी असती तरी बरें झालें असते. आणि उंचावर चढून आल्यावर वारा चांगलाच अंगाला झोंबू लागला ! "

वासुदेवानें ही संधि साधून आपल्या अंगातला खादीचा कोट काढून तिला घालायला देऊ केला.

" काहीं नको, आपण मागची मंडळी येईपर्यंत थांबूच म्हणजे झाल मग मी सामानातून आपला स्वेटर काढून घेईन " असें म्हणून तिनें त्याचा विरस केला, पण लगेच तिला काय वाटले कोण जाणे. तिनें त्याचा कोटही स्वीकारला आणि लगेच चढायला सुरवातही केली, आणि गडा-वरील कमिटीच्या विश्रांतिकुटीराला पोचेपर्यंत ती मध्ये दमली नाहीं.

सर्व मंडळी गडावर येऊन पोचेपर्यंत अंधार पडला. लोकल फंडाच्या धर्मशाळेंत प्रवाशांना गाद्याही मिळतात, हे पाहून सर्वांना गम्मत वाटली. हासत खिदळत सर्वांनीं चहाफराळ केला, थकलेल्या गात्रांनी निद्रादेवीशीं सख्य केलें. पहाटे जेव्हा पांघरुणें कमी पडूं लागलीं तेव्हा आपण किती उंचा-वर आलों याची त्यांना खरी जाणीव झाली.

वैभवाची तीं पुंभट पावलें विनेने विषाद आणि विराग यांनी भरलेल्या मनाने पाहिली आणि वेळोवेळी तिच्या तोंडून जे त्वेषाचे स्फूर्तीचे वीरतेचे आणि बेफाम छटत्काराचे उद्गार निघाले त्यामुळें वासुदेवाच्या तिच्याबद्दलच्या भावनेला भरते येत राहिलें. टकमक टोकावरून वाकून जेव्हा ती रायनाक महाराचे खालच्या खोऱ्यातील थडगे पहाण्याचा यत्न करूं लागली, तेव्हां खरोखरीच हात धरून तिला त्यानें मागें खेचलें आणि नंतर कितीतरी वेळ तिचा हात सोडला नाही.

दुपारी तिनें आणि असेने दोघींनीं मिळून स्वयंपाक केला; आणि भूक हवा आणि पाणी यांच्या प्रभावानेंच केवळ तो कितीतरी रुचकर लागला.

सायंकाळी दूरदूरचीं स्थळें पाहण्यासाठी सहल झाली आणि वादविवाद, थट्टामस्करी यांनी वेळ मजेंत गेला. सूर्यास्ताच्या शोभेने मनें प्रशस्त झालीं संधि मिळताच हितगुज झाले आणि पाय घसरणे, ठेचा लागणें आणि काटे बोचणें हेही पण झाले.

दुसरे दिवशीं सकाळीं गड उतरून जेवणापूर्वी ते महाडास परत आले तेथें उमापतिपुरहून देशमुखाकडून मुंबईला जाऊन आलेले पत्र त्यांची वाट पहात होते. असेने ते पत्र फोडून शारदाबाईजवळ वाचण्यास दिले. देशमुख साहेबांची प्रकृती एकदम बिघडून गेली होती. छातींत धडधड सुरुंही झाली होती. वैद्याने घाबरे केले होते. डॉक्टरही आपले बिल साधून घेत होतें. सुनेनें यावेळी आपल्याजवळ असावे अशी त्यांची इच्छा साह-जिक होती. ताबडतोब निघावे अशी सूचना होती.

असेनें थेट निघून जायचें ठरवलें आणि बरोबर शारदा शाहणेलाही घेण्याचं ठरविलें तिच्यावर असेचा आतोनात विश्वास बसला होता. आणि सर्व प्रसगीं ही सुशिक्षित, समजस, धीट, निर्भीड, निर्भय आणि चार देश पाहिलेली सोबतीण आपल्याबरोबर असणे आपल्या हिताचेच आहे असें तिच्या मनानें घतलें होतें.

मोटारीचा लाबचा घाटातला प्रवास असल्यामुळें वासुदेवरावने पुण्यापर्यंत यावें असें ठरलें.

शारदा शहाणे तिच्याबरोबर जायला कबूल झाली याचें वासुदेवाला वाईट वाटलें. त्याची इच्छा तिनें जाऊ नये, मुबईला परतावे अशी होती. तसें त्यानें बोलूनही दाखविलें.

"माझें मुबईला कुणी नाहीं; आणि कुठें तरी नोकरी करूनच रहायचें तर उमापतिपूर काय वाईट आहे." असें तिनें उत्तर दिलें. "शिवाय असाबाई किती किती चागल्या वागतात."

मोंगलाई आहे, खेडेगाव आहे; वाचायला वर्तमानपत्रेंही मिळत नाहींत, चळवळी नाहीत, करमणुकी नाहींत, काहींच नाहीं, इत्यादि मुद्याना तिनें काहींना काहीं उत्तरें दिलीं.

"आणि मुंबईला कुणी नाहीं कसं म्हणता ? आम्ही कुणी नाहीं वाटत!" असा प्रस्ताव करून जेव्हा तो काही काहीं गुलगुलील बोलू लागला तेव्हा तिनें शीळ घालीत म्हटलें:—

" अय्या ! तुम्ही तर प्रेम करू लागला कीं ! " आणि नंतर त्यानें अगदीं मागणीच घातली – " ते कुणी तरी आपल माणूस मला होऊ द्याल का ! "

" नाहीं. "

" कारणें ! "

" कुणीतरी एक निर्धन बापाचा मुलगा, सुशिक्षित बेकार — कोण त्याला आपला म्हणेल ? "

" काहींतरी कर्तृत्वाचें तेज दाखविल्याशिवाय — चमक दिसल्याशिवाय — माझें मन कसें ओढ घेईल ?

" शिवाय नाजुक सुखविषयक गोष्टी मनांत येण्याइतकें माझें मन तरी कुठे सध्या स्वस्थ आहे ? "

" निराशा ? "

" नाहीं. "

" आशा ! अगदीं कालांतराची तरी ! "

" मुळींच नाहीं. "

" मग काय ? "

" काहींच नाही. "

थकलेलीं शरीरें आणि अस्वस्थ झालेलीं मनें घेऊन तीं लाल अस्तरणाची लांबलचक लॅन्शिया आपला प्रवास संपवून पुण्याला आली. नोकर, चाकर, मोटार सामानसुमान सर्व कांहीं पुण्यासच राहिलें. त्याच दिवशीं संध्याकाळीं मद्रास एक्सप्रेसनें शारदा शहाणे देशमुखांच्या सुनेबरोबर निघून गेली.

दोन दिवस पुण्यात राहून वासुदेव वाजपेयी मुंबईस गेला. सुटी सुरू झालीच होती. पण सुटींत आपल्या घरीं उमापतिपूरला त्याला जावेंसें वाटेचना — तेथेंही राहवेना. आपल्या दादरच्या मित्राला घरीं जातो असें सांगून तो थेट शेवन्तीला शाहूरावकडे आला.

# प्रकरण ६ वें

शेवंतीशेजारीं वाहणाऱ्या ओढ्याला गावचे लोक गौरवानें नदी म्हणत. त्याच्यालगत उंचवट्यावर दोन खूप मोठीं वडाचीं झाडें होतीं. आणि त्यांपैकीं एकाच्याखालीं एक जुनें देऊळ होतें. देवळाच्या आवाराभोंवतीं दीड पुरुष उंचीची पडकी भिंत असून एका बाजूला एक लहान पडीक ओरी होती. देऊळ मारुतीचें म्हणत पण देवळांत देव नव्हता तरी गावचे लोक भाविकपणें देव गुप्त झाला असे समजून आणि दर शनिवारी देवळीला शेंदूर, दाराला माळा आणि उंबरठ्याला पाणी घालीत आणि नारळ फोडीत. देऊळ आणि वडाचीं झाडें असलेली पडित जमीन ' वडाचें वावर ' म्हणून प्रसिद्ध होती आणि शाहूरावच्या मालकीची व त्याचे ताब्यात होती. पण अलिकडे भाऊबंदांनी त्याबद्दल तंटे सुरू केले होते. सरकारदरबारीं देवळाचे फक्त चौहिवारी म्हणून नोंद होती.

शेवंती गावाबद्दल दोन दंतकथा प्रचलित होत्या. एक अशी कीं, हे गाव दक्षिण देशाच्या शीवेवर असल्यामुळें त्याला हे नाव पडलें. दुसरी अशी कीं, या गावचें नाव शिवावतीचें शेवंती झालें या गावच्या मध्यभागीं एक भव्य शिवाचें देवालय होतें. दक्षिणच्या पहिल्या म्लेच्छ विजेत्यानें तें उध्वस्त करून त्याच जोत्यावर त्याच शिलाखंडानी एक मसजिद बांधली आणि गावचें नावही बदललें. नांव टिकलें नाही पण मसजिद अजूनहि टिकून आहे.

विद्येचा शोध लागला नाहीं आणि शोध लागण्याची आशाहि राहिली नाहीं. दादासाहेब दुःखी व विरक्त झाले पण त्यांच्या घरात व्यवहाराच्या शिस्तींत तिळमात्र फरक झाला नाहीं. विद्येच्या नावाचा उल्लेखही करणें कुणालाही शक्य नव्हतें आणि झालाही नाहीं. इतका कीं वासुदेव वाज-

पेयी पुढें काहीं महिने त्या वाड्यात शाह्रूरावचा पाहुणा म्हणून राहिला पण त्याला दादासाहेबाना कुणी मुलगी होती व ती नाहींशीं झाली या पलीकडे काहीसुद्धा कळले नाहीं.

नदीकाठच्या त्या देव नसलेल्या देवळात वासुदेव वाजपेयीचें ग्रामोद्धाराचें कार्य सुरू झालें लोक रिकामपणी तिथें जमू लागले आणि वासुदेव त्याना वर्तमानपत्रें वाचून दाखवू लागला आणि त्यातले मजकुराचें महत्त्व समजावून सागू लागला. शाह्रूराव प्रचाराचें काम करीत असे. हळूहळू दहा पाच लोकाचा एक प्रौढ शिक्षणवर्गही निघाला. गावकरी आपल्या अडचणी सागू लागले. पचायती होऊ लागल्या, बखेड मिटू लागलें आणि त्यातूनच नवीन उत्पन्नही होऊ लागले. फड पडले, कुरापती निघू लागल्या, पक्ष विपक्ष झाले, पण काही झाले तरी काहींतरी चळवळ गावात उत्पन्न झाली. जिवत वारें वाहू लागलें

वासुदेव वाजपेयी या नवीन वातावरणात अगदीं रगून गेला. शाह्रूरावच्या उत्साहाला भरते आलें हाते. दादासाहेब सहानुभूतीनें बघत होते. एका सुशिक्षित तरुणानें निरपेक्षपणें अगदीं निव्वळ अन्नावारी एका खेडेगांवात राहून लोकसेवा करावी हा प्रयोग त्या ठिकाणीं अगदीं नवीन होता.

प्रत्यक्ष अनुभवानें असें सिद्ध झाले कीं, कोणीहि सुशिक्षित इसम गांवकऱ्याच्या प्रापचिक अडचणींचें, आर्थिक गुतागुतींचें, ग्रामीण जीवनकलहांतील पेंचप्रसगाचें निराकरण करायला तसा प्रत्यक्ष कांहींच उपयोगी पडूं शकत नाहीं. पण मुबईहून अमूप शिकून आलेलीं हीं माणस आपणाबद्दल इतकी सहानुभूति बाळगतात याचेंच जास्ती आश्चर्य आणि कौतुक त्या रजलेल्या गाजलेल्या लोकाना वाटू लागलें. अज्ञानानें त्याना अगदीं अगतिक करून टाकलें होते. अनेकाना त्याच्या हेतूबद्दल अविश्वास वाटत राहिला पण कित्येक त्याच्या नादीं लागलें.

जून महिन्याचे शेवटीं त्यानें मुंबईच्या मित्राला आणि घरीं वडिलाना कळवून टाकलें कीं, आपण शिक्षणाचा नाद सोडून दिला असून कांहींतरी कायमचा उद्योग शोधीत आहोंत. वडिलाना लिहिलेल्या पत्रात कांहींतरी संदर्भानें देशमुखाच्या सुनेबरोबर आलेल्या मास्तरिणीची चौकशी केल्याशिवाय तो राहिला नाहीं.

वासुदेव वाजपेयीबरोबर गावांतील कांही अर्धशिक्षित तरुणही या नवीन कल्पनेत रंगले. गावात ओहोळानें केलेलें खाचखळगे ते जातीने टोपल्यानी माती टाकून बुजवू लागले. कुणालाही वाटेल तेथें केर टाकू देईनात. गावातील गचाळ मुलाना नाल्यांत नेऊन धुऊ लागले आणि त्याच्या आयाकडून शिव्या खावू लागले. स्त्रियाना छेडणाऱ्या उनाड माणसाशीं मारामारी करू लागले. दारूबाजाच्या हातातील बाटल्या हिरावून घेऊ लागले बायकाना मारणाऱ्या नवऱ्याचें हात धरूं लागले, ऋणकऱ्याची कड घेऊन सावकाराशीं भाडू लागले. सक्तीनें वसूल केल्या जाणाऱ्या वर्गण्या देईनात आणि गावकऱ्यांनाही देऊ देईनात.

नसत्या उठाठेवी आणि चाभारचौकशा करणाऱ्या — घरचे खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणाऱ्या या मुरदाड शिपायाचा अग्रणी शंभू आपोआपच झाला. दादासाहेबाचा तो जसा इमानी नोकर होता, तसाच गावचाही तो इमानी गावगुंड होता. या पिळदार फाकड्या जवानाला वासुदेवराव व शाहूराव जें म्हणतील तें एकदम पटे आणि तें पटलेलें आचरण्याची त्याहूनही घाई होई. यामुळें झालेल्या कितीतरी पचायती दादासाहेबाना आपल्या वजनावर सावरून न्याव्या लागत; आणि ते नेतही असत; कारण एखादे वेळीं जरी या लोकांचें करणे गैर असलें, अधिकाराबाहेरचे असले, तरी त्यांचा उद्देश चांगला होता ना! आणि त्यामुळें उत्पन्न झालेली खळबळ किती तरी चांगली होती!

त्यांचे तत्त्वज्ञान असे होते. कोणत्याही दिशेनें न जाता राहण्यापेक्षां कोणत्या तरी दिशेनें जाणें जास्त बरें. निदान दिशा चुकलेली तरी कळेल. एके ठिकाणीं राहून हालचाल करण्याची शक्तीच नाहीशी होण्यापेक्षा चालण्याचे श्रम फुकट गेले तरी चालतील.

शेवती गावात एक सरकारी प्राथमिक शाळा होती. मराठी चार इयत्ता शिकणाऱ्या या शाळेत अबदुल रहिमानखा नावाचा एक मुसलमान इसम सदर मुदर्रिस – हेडमास्तर होता त्याचे शिक्षण किती झालें होते त्याचें त्यालाच माहीत. लोक त्याला मौलवीसाहेब म्हणत त्याला स्वतःला आपल्या मराठीच्या ज्ञानाचा मोठा अभिमान असे. सर्व वर्गांना मराठी व्याकरणाची कत्तल करण्याची कला तोच शिकवीत असे. त्याला दुसरा मदतगार म्हणून मिळालेला मराठा शिक्षक पूर्वी मोहतमीमसाहेबांजवळ – इन्स्पेक्टरजवळ चपराशी होता. एकदा साहेब त्याच्यावर रागावले आणि शिक्षा म्हणून त्याला त्यांनी शाळामास्तर केला झाले ! पगाराशिवाय त्याला वरती एक छदामही मिळेनासा झाला. इन्स्पेक्टरसाहेबाबरोबर दौऱ्यावर असताना स्वतःचा खर्च बाहेर काढून, पगाराइतकेच रुपये तो वरती मिळवीत असे या अपमानानें चिडून जाऊन तो पगार पत्रकावर सही करण्यापलीकडे काहींही करीत नसे. तिसऱ्या मास्तराची नेहमी बदली होई म्हणून तो जास्त दिवस त्या गावात टिकतच नसे. शाळेंत विद्यार्थ्यांशिवाय सर्व काहीं व्यवस्थित होतें. इन्स्पेक्टर किंवा तहशीलदार किंवा दुसरा कोणी अधिकारी तपासणीला येई तेव्हा गावातलीं बरीचशी मुलें धरून आणून बसविलीं जातें. रजिस्टर काल्पनिक नांवानी भरलीं जात.

एके दिवशीं अचानक एक अधिकारी तपासणीला आले. गोकुळ अष्टमीचा दुसरा दिवस होता. वासुदेव व शाहूराव यानीं गावातील मुलाकडून गोपाळकाला साजरा करण्याचे ठरविलें होतें – सर्व गांवातली मुले आपआपले दहीपोहे घेऊन आली. जीं मुले जबरदस्तीने शाळेत धरून बसविली

गेली तीही नजरचुकवून पळून आली. काहीं मुसलमान लहान मुलेंहि गम्मत पहायला आली. शाळेंत हजेरी शून्य होती. तरी त्या उपकारी अधिकाऱ्यानें शेरा चांगलाच दिला पण मौलवीसाहेबांना मात्र चुटपुट लागून राहीली त्या दिवसापासून ते या मंडळींना पाण्यात पाहू लागले

वासुदेव वाजपेयीच्या प्रौढ शिक्षणवर्गानें गणेशोत्सव साजरा करण्याचें ठरविलें, पण 'जदीद गणपती' या सबबीवर त्यांना सार्वजनिक उत्सव करण्याची परवानगी मिळालीं नाहीं.

अबदुर रहिमानखां ऊर्फ मौलवीसाहेब मोठी कारस्थानी वल्ली होती. स्वतःच्या कलप लावलेल्या काळ्या कुळकुळीत दाढीखालीं परीटघडीच्या पांढऱ्या शेरवानींतील किडकिडीत देहयष्टीमध्य, धर्मवेडानें जहरलेलें मन नेहमी दडवून ठेवून, गावांतील प्रत्येक कामात कडमडायला तो हजर असे. पिवळ्या फेऱ्याखालीं कैद करून ठेवलेल्या त्याच्या मेंदूत कोणा अधिकाऱ्याला कसें वश करावें याचेच विचार नेहमीं येरझारा करीत असत. थापा मारण्यात तो पटाईत असे. शिवाय तो खुनशी आणि विश्वासघातकीहि होता. वासुदेवराव आणि शा.रराव गावातून नाहींसे झाल्याशिवाय आपलें वजन पुनः बसणार नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें होतें.

सय्यद उमरखां ऊर्फ छोटूमियां नावाचा त्याचा एक सावत्र भाऊ नुकताच गावात येऊन राहिला होता. या भावाला त्यानें पुष्कळ वर्षांपूर्वी आपला भाऊच नाहीं, सहील उलू नसल नाहीं, तोतया आहे असे म्हणून घरातून काढून लावलें होतें तो भटकत भटकत हैदराबादेस जाऊन तेथें गुत्तेदार झाला होता. तो एकदम पैसेवाला कसा झाला हे त्या अल्ला मियालाच माहीत आणि तो आपल्या बेगमेला घेऊन येथें का येऊन राहीला आहे याचेंही सर्वांना कोडेंच होते. पण मौलवीला मात्र त्याचें मोठें प्रेम आलेलें होतें. तो त्याला आता फारच भाईभाई करू लागला होता.

एके दिवशीं वासुदेव व शाहूराव मस्जिदीमागील बोळातून जात असताना मागून कोणीतरी हाक मारली :—

"शहाजीराव".

शाहूराव एकदम उभा राहीला. त्याने इकडे तिकडे पाहिले. डावीकडे दारावरील किंतानाच्या पडद्यामागून कुणीतरी म्हटले :—

"शहाजीराव, तुम्ही मला ओळखणार सुद्धा नाही मी माणिक."

हो ऽ ऽ — शाहूरावची फार पूर्वीची स्मृति जागृत झाली तीच ही — तिचाच हा आवाज! हैदराबादेस शिकायला असताना शेजारच्या वाड्यात राहणाऱ्या विदुराच्या सीताबाईची ही मुलगी माणिक ही येथे कशी?

ते त्या दाराच्या पडद्याजवळ आले. ते तेथे येऊन पोंचतांच आतून त्याच आवाजात 'हा ऽ आई' असें शब्द ऐकू आले आणि सर्व सामसूम झाले. निःसशय तिचाच आवाज!

बराच वेळ ते तिथें थांबले, पण आतून काहीच हालचाल ऐकू आली नाहीं. शाहूरावला चुटपूट लागुन राहिली. ही मुलगी वयात आल्यावर नाहींशी झाली असे त्याने वर्तमानपत्रात वाचलेले त्याला आठवत होतें.

"हे कोणाचें घर आहे?" वासुदेवने विचारलें

"रहिमानखांचा सावत्र भाऊ उमरखान आलीकडे येथें येऊन राहिला आहे. आणि गावात त्याने सावकारी सुरू केली आहे"

शाहूरावने वासुदेवाला माणिकची हकीकत थोडक्यात सागितली. तिची आई विदुराची सीताबाई एक प्रच्छन्न वेश्या म्हणूनच ओळखली जात असे. घरचें वळणच या मुलीला असे होते की तिनें उच्छृंखल, चवचाल व्हावें. मुलगी गेली तेव्हा तिच्या आईने बरेंच आकाडताडव केलें, पण मुलगी वयांत आल्यावर गेली — स्वखुषीनें गेली — म्हणून तिचे काही चाललें नाही असें त्यानें ऐकले होतें.

" काहीं असलें तरी माणिकनेच या घरातून हाक मारली यात मला काहींच शंका नाहीं."

मुलगी काळीसावळीच पण मोठी आकर्षक होती, अशी आपली त्या-वेळची आठवण शाहूरावनें सांगितली. आठपधरा दिवसाच्या खटपटीने त्यानें तिच्या भेटीचा योग जुळवून आणला. तिच्या शेजारी राहणाऱ्या धोबिणीनें दूतीचें काम केलें घरात कुणी राहणार नाही अशी खात्री करून घेऊनच माणिकनें वेळ कळविली होती तरी शाहूरावला ते साहसच वाटले त्याने वासुदेवला आणि शंभूलाही सावधपणें आपल्या मागावर राहण्यास सांगितलें न जाणो वेळ आहे.

" का पटते का काहीं ओळख ? " माणिकनें शाहूरावला मागीलदारानें घरात घेऊन अंगणातील एका चौपाईवर बसवून विचारले.

कशी पटेल ? त्या वेळची ती हिरव्या साडीची मुसमुशीत अवयवाची माळा वर्षांची थिल्लर तरतरीत आसावलेली मुलगी या गुडघी कुडती आणि ओढणी यानीं अवगुंठित झालेल्या, अंग सुटलेल्या, आळसलेल्या, निरसलेल्या तरुणीत मुळीच दिसेना.

आणि शाहूरावला एकदम तो प्रसंग आठवला की ज्यावेळी सध्यासमयाला यौवनविकारानें क्षुब्ध होऊन त्यानें तिला एकटी गाठून तिचे दोन्ही हात धरले आणि म्हटलें:—" माणिक तू माझी ना ? " आणि तिनेंही खाली मान घालून नुसतें " हो " म्हटल, तो तिच्या कानात काहीतरी सांगणार इतक्यात कुणी तरी आलें. नंतर त्याच्या पालकानें त्याच्याकडून मी या मुलीकडे बघणार नाही अशी आणभाक करविली आणि त्याने ती इमाने इतबारे पाळली

माणिकनें आपले आईबहीण जातगोत सर्व सोडून धर्मांतर कां केलें ? नवीन धर्म, नवीन संस्कृति, नवीन प्रकारची गुलामगिरी, गोषा, पहारा, जुलूम

सर्व तिनें स्वखुषीने स्वीकारलें का? का पहिल्यानें जाळ्यात फशी पडली आणि नतर नाइलाजानें अडकून राहिली?

नाही, ती जाळ्यात फसला नाही. सय्यद उमरनें तिला अजून तरी चांगलेंच वागविलें. तिची आई अजी तिमान का व कशी झाली तें तिला सांगता येणार नाहीं. पण गावातील अनेक सभ्य म्हणविणारे लोक तिच्या आईकडे येत, तिच्या अगावर पैसे फेकीत, असभ्यपणे तिच्याशीं वागत. या लोकांनीच आईस अगदा बेशरम बनविली असली पाहिजे माणिकने हे सर्व लहानपणी कळत न कळत पाहिले आणि सभ्य समाज या मुलीला कसा वागवीत असे!

शेजारीपाजारी आपल्या मुलामुलींना तिच्याशीं खेळू देत नसत. शिक्षणाची सोयच नाहीं ज्याने त्यानें दुसऱ्याचें पाहून नटावें, मुरडावं आणि कुणी मनुष्यप्राणी आपल्याला जवळ करील का? म्हणून आशनें भिरभिरत फिरावें. कॉलेजात शिकणाऱ्या तरुणानीं ती पुढे चालली असताना पाठीमागून तिला उद्देशून अचकट विचकट बोलावें, अनीतिमान आईची मुलगी म्हणून तिला गर्दीतून धक्के द्यावेत, कागदाचे बोळे करून तिला मारावेत, तिच्याकडे पाहून डोळे मिचकावावेत, पण तिनें त्याच्याशीं बोलण्याचा प्रयत्न केला कीं चिडून पळावें! असभ्यपणा करायला मात्र हवा, पण सभ्यपणाची इस्तरीची घडी मोडायला नको!

"त्या दिवशीं तुम्ही जे हात धरले होते ते सोडले नसते तर! माझ्या आयुष्यात तुम्ही त्या दिवशी मला पहिलें प्रेमानें बोलणारे भेटला; रुपये आणि नोटा दाखवून तर्जनीनें खुणा करणारे पुष्कळ भेटले, पण तुम्हीही भ्यालांत, बुजालात, नादान सभ्य ठरलात!"

तिच्या यौवनात असा एक काळ आला कीं, समाजातील सभ्य म्हणविणाऱ्या भुग्यानीं तिला आईप्रमाणें अनीतीमान जीवन कठावें किंवा काहीं तसा अविचार करावा याशिवाय तिसरा मार्ग ठेवला नाहीं आणि तिनें अवि-

चार करावयाचें ठरविले. त्यावेळी छानछोकीचे पोशाख करून गवळी गुड्याच्या रस्त्यातून फिरणाऱ्या अनेक हिंदू तरुणापैकी कुणीहि हिंमतीने तिला जवळ केले असतें तर ती त्याच्याशी एकनिष्ठ राहिली असती. चोरी करायला सगळे तयार होतें, चोरीचा माल जवळ बाळगायला कोणीहि तयार नव्हतें !

सय्यद उमर त्यावेळीं शेजारीं रहात होता. त्याचें तिच्यावर लक्ष होतें दादेखां नावाच्या पठाणाचीही तिच्यावर नजर होती एकदा तर उमरने तिच्याशीं मलगीचें बोलण केले होते त्यावेळीं तिने त्याला तुटकी चप्पल फेकून मारली होती, पण पुढे पठाणाने तिच्या आईला पैस दिले आणि 'लडकी लडकी' म्हणून तिला तो छळू लागला शेवटीं जामे मस्जिदच्या पेश इमामनें मी तुझे उमरशीं लग्न लावून देईन अशी हमी घेतली आणि ती पाळली. माणिक घराबाहेर पडली आणि लालडी बेगम झाली.

"आज सहा वर्षे मी उमरजवळ आहे पण कधीहि त्याने मला वाईट वागविलें नाहीं. मी लाभल्याचा आनद त्याला गगनात मावेना, कारचुबी चढाव, मखमली विजार, किनखापचें जाकीट, जार्जेटची ओढणी, जडावाचे कगन, इमिटेशनची कर्णफुले या थाटात मी त्याला दुल्हन म्हणून दिसलें; तेव्हा त्यानें म्हटलें 'लालन आमरण तुला जर अतर दिले तर मी जातीचा, सय्यदच नव्हे.'

"सरकारी अधिकाऱ्याना मी सांगितले की, 'मी वयात आलेली आहे आणि राजिखुषीनें धर्मांतर करून सय्यद उमरशी शादी करीत आहे आपल्या आईचें किंवा कोणाचेहि तोंड पहाण्याची मला इच्छा नाही' तें मनापासूनच सांगितले. कोणत्याही प्रकारची जुलूमजबरदस्ती मजवर झाली नाहीं. उलट मला जास्त सुरक्षित वाटूं लागलें.

"आज त्याच्या वशाचा अकुर मी आपल्या तनूमध्ये वागवीत आहे. त्याच्याविषयीं किंवा त्याच्या धर्माविषयीं मला काडीचेंहि प्रेम नाहीं. गोषातील

ही गलिच्छ रहाणी मला मुळींच आवडत नाहीं. स्वच्छतेनें आणि सुगरणपणें राहणारी म्हणून इतर मुस्लिम स्त्रिया मला वाखाणतात.

" माझी शादी झाली तेव्हा उमर एक कंगाल, उल्लू, बेदर्द आणि उधळ्या इसम होता. अनेक प्रकारच्या उलाढाली करून तो कशी तरी आपली गुजराण करी तो एकदम श्रीमंत कसा झाला मलाही कळत नाहीं. दादेग्वा पठाणाचा अजूनहि मजवर डोळा आहे, पण उमर मजसाठीं प्रसगीं प्राणही देईल किंवा घेईल.

" सुशिक्षित आणि सुसस्कृत मुस्लिम स्त्रिया आपल्या जीवनात संतुष्ट नाहींत. पण पहाल तुम्ही त्याचाही गोषा निघत नाहीं. मुसलमान पुरुष गोषा-साठीं रक्तपातही करतील. स्त्रिया काय करतील सागवत नाहीं – कळत नाहीं.

" एकदा तुम्हाला भेटावें आणि सगळे मनातले बोलून टाकावें असें मला वाटत होते म्हणून मी तुम्हाला हाक मारली. पुन्हां असें भेटता येईल अशी आशा नाहीं .

"शहाजीराव, केवळ शारीरिक सुखामागें लागलेली मी एक हीनदीन अबल आहे पण मला आपलें वाटतें कीं काहीं वद्य अपवाद वगळले तर सगळी माणसें अशीच – अशीच आहेत तुम्ही माझा तिरस्कार करीत असता तर भेटायला आलाच नसता. मी मात्र तुमचा तिरस्कार करीत होते. त्या दिवशीं तुम्हाला हो म्हटल्यानतरही तुम्ही माझा अनादर केलात, जिला आपली म्हटली तिला उकिरड्यावर टाकलीत म्हणून इतरांपेक्षा तुमचा जास्त तिरस्कार करीत होते. पण येथें सहा महिने तुमची वागणूक पाहिली, लोकमत ऐकलें, तुमच्या शत्रूकडूनही तुमच्या उमदेपणाची वागणूक तारीफ ऐकली आणि माझे मन निवळले.

" मला तुमचा इतका राग आला होता ना ! पण प्रेम नाहीं. तिथं राग नाहीं अशी म्हण आहे. तुम्ही आलात हे तुमचे फार उपकार आहेत. तुम्हीं मन मोठ केल !

" तुम्ही माझ्यासाठीं कांहींही करू शकत नाहीं. आपणच विणलेल्या अनेकविध धाग्यात, जाळ्यात आपण इतके गुंतलेले आहोत कीं एखादा झंझा वात सुटून हीं जाळी उडाली तरच आपल्याला मुक्तीची आशा ! "

शाहूराव खालीं मान घालून बाहेर आला विचाराच्या तंद्रीत इतकें न विसर लेला त्याला पूर्वी कधींच कोणाही पाहिला नव्हता. वासुदेवला त्यानें सगळें खरें सांगितलें. पण शंभूला कांही सांगितलें नाहीं.

## : : : : : प्रकरण ७ वें

विद्येला हवी असलेली नवी क्षितिज तिला उमापतिपूरला दिसली. ती आल्यानंतर कांहीं दिवसांनी देशमुखाची प्रकृति विकोपाला गेली. कल्याण-राव पूर्वीच येऊन बसला होता. असेच वडील रंगराव देवगिरीकर वकीलही आले होते. आणखीही कितीएक आस्थेवाईक ऋणानुबंधी येऊन पोंचले होते. एखाद्या कार्यप्रसंगासारखी अन्नसंतर्पणे होत होतीं.

रंगराव देवगिरीकर म्हणजे सामान्य नव्हे. कल्याणरावच्या दुप्पट पावसाळे पाहिलेलें. आणि दावे, धक्के, कोर्टकचेऱ्या, सरकार-दरबार यांत पक्के मुरब्बी. गृहस्थ देशमुखांना अगदी विसंबत नसे. कल्याणरावाला त्यानें देशमुखांशीं कधींही एकांत मिळू दिला नाहीं असा येतांच तिनें आपल्या डोळ्यादेखत कल्याणरावाला दत्तक घ्यावें असें देशमुखांनी बोलणें केलें. पण तिनें 'आपली प्रकृति थोडी बरी होऊं दे' असें म्हणून टाळलें आणि दुसऱ्या खेपेस बापाची सल्लामस-

लत घेऊन तिने निक्षून सांगितले की, "कल्याणरावाला दत्तक घेणें शक्य नाहीं. दत्तकाचा प्रश्न माझा मी ठरवीन. आपण काळजी करू नये."

या दुरुत्तराने देशमुखसाहेब रावावले, पण पण ते दिवसेंदिवस क्षीणच होत गेले. एके दिवशीं घाबरे झाले, दुसरे दिवशीं बेशुद्ध झालें, आणि तिसरे दिवशीं दिवगत झाले. रंगराव देवगिरीकरानी हवी ती मसलत करून जिल्हाधिकाऱ्याना अनुकूल करून घेऊन असेला मालकीण प्रस्थापित केलें. आणि देशमुखाचे क्रिया कर्मांतर करू पाहणाऱ्या कल्याणरावाला वाड्यातून हुसकून दिले. जाताना तो असेला माहित नसलेले पुष्कळसे किंमती चीज वस्त व कागदपत्र घेऊन गेला असे म्हणतात.

विद्येला अर्थात् देशमुखाच्या आजारीपणात काहीच काम नव्हतें. तिला या अजब तमाशाचे नुसते प्रेक्षक व्हावे लागले रिकामपणानें विद्येची हुरहूर वाढती केली. तिला सारखी आपल्या घराची आणि दादासाहेबाची आठवण होऊ लागली. मालक म्हणून आपण कसे वागत आलो. आणि नोकर म्हणून आपणाला कसे वागावें लागतें हा फरक मुंबईपेक्षा तिला येथे जास्त जाणवू लागला. आपल्याही श्रीमतीचे – आता ती आपली – राहिली नसली तरी – हेच धिंडवडे निघायचे आहेत याची तीव्र जाणीव तिला सारखी होत राहिली.

या अफाट संपत्तीची उपभोग्यशून्य स्वामिनी असा होती. तिला अनेक व्याधीमुळे विद्येजवळ लिहिणे वाचणें शिकणे शक्यच झाले नाहीं. विद्येचा बराच वेळ अनंतभट जोशाच्या संगतीत जात असे. हा वृद्ध आणि विद्वान् ब्राम्हण तिच्या कुतुहलाचा विषय झाला होता.

त्याला बरें वाटावे म्हणून तिने आपण बाह्यतः तरी फॅशनेबल दिसत असलो तरी अंतर्यामी कट्टर सनातनी आहोंत अशी बतावणी केली. रोज सकाळी ती त्याच्याबरोबर गंगास्नानाला जात असे आणि तो स्थानसंध्या

करीत असला म्हणजे ही जलक्रीडा करीत असे. ते शहर नव्हतें नाहींतर ह्या स्नानविधि पाहण्यासाठीं बंध्याचा उरूस भरला असता. तो अनत भट जोशी नुसता वैदिक होता. काव्यालकारादिकाचे अवलोकन त्यानें आवरजून वर्जिलें होते. नाहींतर वयाचें वरुणत्व विसरून त्यानें सस्कृत वाङ्मयातलें जलक्रीडा वर्णनाचें वास्तवत्व पडताळून पाहिलें असतें.

तिला पाणी उडवावेसे वाटे पण कुणाच्या अंगावर उडवावें ? खेडेगावचे लोक चिचकतील आणि वयोवृद्ध तपोवृद्ध अनंतभटजीना वावगें वाटेल म्हणून तिने आपला बीचवरचा अगरगी बेदिंगसूट बाहेर काढला नाहीं. त्याची स्नानसध्या सरेपर्यंत ती नदीतीरच्या बारीक वाळूत खेळत बसे.

" मी एक पोरका मुलगी आहे लहानपणी मला माझ्या आजोबानीं वाढविलें, शिकविलें पण तेहि काही दिवसापूर्वी वारले आणि मला काहीच छत्र राहिलें नाहीं " असें तिने त्याना सागितले वासुदेवरावच्या ओळखीनें शारदाबाई आमच्याकडे आल्या असे असेने सहज बोलता बोलता अनत भटजीजवळ म्हटले पण ' वासुदेवची तुमची ओळख कुठली ? ' या प्रश्नाला उत्तर देण्याचे या शारदा शहाणेनें कौशल्याने टाळले. वासुदेवनें जेव्हा पुढें तिजसबधीं पत्रात चौकशी केली आणि तीहि सभ्य दूरतेची असें त्या वयस्क वैदिकाला वाटलें. तेव्हा ही शारदा शहाण अनतभटजीना विश्वासाचा विषय झालेली होती.

ती त्या विद्वान् ब्राम्हणाला निरनिराळे चतुर प्रश्न विचारी आणि कुंठित करी आणि भटजीनाही ते आवडे बोलता बोलतां त्याची स्वतःची माहिती व वासुदेवच्या बालपणाची हकीगत त्याचा अभिमान जागृत करून तिनें काढून घेतली. आपल्या बुद्धिवान् मुलाविषयीं त्याना मोठा अभिमान वाटे. दुष्यताला आपला आर्य मनाबद्दल वाटला नसेल इतका असंशय विश्वास त्याना वासुदेवच्या अभिजातपणाबद्दल वाटे.

त्यांना संसारात कांहीं पाश असल्यासारखं दिसलेच नाही. सहधर्मचारिणी होती तेव्हा त्यांनीं परंपरागत अग्निसेवा केली. वासुदेवहून त्यांना एक वडील मुलगी होती ती वरंगलकडे एका बारीकशा स्टेशनवर रात्रपाळीच्या मास्तरच्या घरी सुखाचा संसार करीत होती. उत्पन्न अगदी मर्यादित. स्वाभिमानामुळे लाचारी दिसायची नाहीं. शक्यतों करून मुलाला व्यावहारिक शिक्षण दिलेले. शांत, आर्जवी आणि लोकसंग्रही स्वभाव, निरिच्छ निर्भय अल्पसंतुष्ट वृत्ति, सर्व प्रकारच्या अध्ययनाचा व अवलोकनाचा सतत व्यासंग. असे हे भटजी देशमुखाच्या आश्रयाने रहात असत देशमुखानाही त्यांच्यापुढें जास्त-कमी बोलण्याचे भय वाटे सर्वांना त्यांच्याबद्दल आदर वाटे. ते दुसऱ्याच्या पंचायती कधीही करीत नसत माझा तो विषय नव्हे असे ते नेहमीं म्हणत. त्यांची राजकीय मते मोठी चमत्कारिक होती, अगदी सनातनी होती, पण ती मतें दुसऱ्यावर लादण्याचा ते प्रयत्न करीत नसत.

दिवसेंदिवस लोकांची दानधर्मावर श्रद्धा कमी कमीच होत जाणार आणि भिक्षुकवर्गाने दानधर्मावर आपला चरितार्थ चालेल अशी अपेक्षा यापुढे करू नये कोणताही ऐतखाऊ वर्ग नवीन समाजात व्यवस्थित टिकणार नाही असें ते प्रतिपादित तेव्हा हे सनातनीच का? अशी लोक शंका घेत.

चहाबद्दल अनंत भटजींचें फारसें चांगलें मत नव्हतें. कारण देशमुखाच्या घरीं होणारा संस्थानी चहा ते एखादे दिवशीं घेत पण म्हणत कीं, 'असले बेचव पेय लोक मिटक्या मारीत का पितात कोण जाणे ?' पण शारदा शहाणे आल्यानंतर त्यांचा हा अभिप्राय पालटला. बुढें पुढे ते चहा घेऊ लागले आणि म्हणू लागले कीं, 'चांगला केला तर चहासारखा विषमय प्राश देखील अमृतं क्वचित् भवेत्!' हळूहळू शारदा शहाणे त्यांना इतकी आवडू लागली कीं वासुदेवाला लिहिलेल्या पत्रात त्यांनीं तिची भरपूर स्तुति केली.

कल्याणरावाला हैदराबादच्या एका सोनेरी टोळीने गाठले. दोन कारस्थानी वकील, एक कोमटी सावकार, दोन कर्नाटकी दलाल अन एक गड्डी पैगकार यांच्या जिवावर त्याने मुकदमेबाजी सुरू केली सर्व इस्टेटीचा मीच वारस आहे, कुळांतली एक विधवा म्हणून असा फक्त अन्नवस्त्राची हक्कदार आहे असं त्याने वादपत्र केले, पण देवगिरीकर वकिलांनीं त्याच्या सर्व प्रकारच्या पैरवीला काटशह दिला. वादाचा निकाल लागेपर्यंत जप्ती रहावी आणि आपल्याला गुजारा मिळावा अशी मागणी करून त्याने भली मोठी रक्कम त्यापायी खर्च केली, पण देवगिरीकरांनी त्याहूनही मोठी रक्कम कारणी लावून निकाल आपल्यासारखा करून घेतला. तारखा वाढत राहि-ल्या आणि कल्याणरावाचे कर्जही वाढत राहिले.

कल्याणराव कर्तबगार तर खराच. त्याने अनेक मातबर साक्षीदार आणून आपला खोटा वंशवृक्ष खरा दाखविला. आणखी पुष्कळ साक्षीपुरावा करून आपले घराणे मिथिलेच्या धर्मशास्त्राचे अंकित असेंही प्रमाण केलें. तीन ठिकाणीं अपीलें होऊन या वादात उभयपक्षाचा अलोट पैसा वेचला.

चारपाच महिने उमापतिपूरला राहून असा कंटाळली. वाडा नायबाच्या आणि देवधर भटजींच्या हाती निरखून आपल्या वडिलांच्या सल्ल्यानें ती हैद्राबादेस निघून गेली

आणखी एक नवीन ठिकाण पहायला मिळेल या हौसेने विद्या तिच्या-बरोबर गेली खरी, पण अनंत भटजीचा आपल्या मुलाशीं नियमित होणारा पत्रव्यवहार विश्वासाने तिला पहायला मिळत होता. त्या सुखाला — तिनें तें कबूल केले नसते — आपण अंतरलो असें तिला राहून राहून वाटले. हैद्रा-बादेत पुनः नवी माणसें नवी दृश्ये, नवी दृष्टि आणि नवीच वाणी.

गेल्या दिवशींच तिला आढळून आलें कीं, गोपा हा तेथील स्त्री जीवनाचा प्राण आहे. सायंकाळीं बंगल्यात करमेना म्हणून तिनेंच आग्रहानें देशमुखांच्या

न्या घरदाज सुनेला बागेआममध्ये फिरायला नेली. बंद मोटारीतच त्या गेल्या आणि बराच वेळ मोटारींत बसूनच त्यानीं तेथील थंड हवा खाल्ली. हिरवळी ताटवे, तळीं कळकाची बेटें, बदकें, कमळाचीं फुलें, निवात बाकें इत्यादि पाहून ती आपण जनान्याच्या राज्यात आहोंत हे विसरली आणि तळ्याकांठच्या फूटपाथवर फिरू लागली. "एका बाजूचे निवात ठिकाण आहे तुम्हीही खाली उतरून पाय मोकळे करा" असा आग्रह ती असा-बाईला दुरून आवाज न करतां शांततेचा भंग होऊ नये म्हणून हावभाव, अंगविक्षेप आणि हस्तविचलित यानीं करू लागली, आणि असा तसें कर-णार इतक्यात एखादे मोहोळ उठावे तशी माणसाची येजा त्या तळ्या काठ-च्या पायवाटेला सर्व बाजूनीं होऊ लागली. जणूकाय त्या विस्तीर्ण बागेंतील कोणत्याही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्याची सर्वांत जवळची वाट हीच होती. गांधिलमाशाचे मोहोळ उठलें म्हणजे जे ते मनुष्य स्वतःचें तोंड झाकून घेऊन पळतें तसें तिनें केले गोषाच्या मोटारीचें दार लावून घेतल्यानंतर हास्याची एक लकेर सोडून तिने अमेला म्हटलें, "गोषा सिस्टिम की जय!"

दुसरे दिवशी पोलीस खात्यातील एक सदर अमीन साहेब देवगिरीकरांना काही खासगी कामानिमित्त भेटायला आले असताना त्याचें संभाषण आंतल्या दालनात असलेल्या विद्येच्या कानावर पडलें. सदर अमीन आपण प्रत्येक प्रकरण मोठ्या चातुर्याने मिटवतो अशी बढाई मारीत होता.

"त्याचें असे झालें वकीलसाहेब तुमच्या लोकाच्या स्त्रिया आजकाल काचीगुडा स्टेशनरोडवर पुष्कळ फिरायला जातात, हे तुम्हाला माहीत आहेच. पुष्कळ लोकाच्या माझ्याकडे तक्रारी आल्या की काहीं गुडलोक वेस्टेंड सिनेमाच्या समोर बसून, येणाऱ्या जाणाऱ्या स्त्रियाना छेडतात. आतां या लोकांना काय म्हणावें? या स्त्रिया स्वतः गोषा पाळीत नाहींत आणि दुसऱ्याला परेशान करतात. इव्हने आदमला या बेदर्दगीनच तर स्वर्गांतून

खालीं ओढले. आमच्या रियासतचा स्वभाव न जाणता हे लोक मनमानेल तसे वागतातच का? छेः त्यांतल्यात्यात या सुशिक्षित स्त्रियानी तर 'नाकमें दम' करून टाकलाय"

हैद्राबादला आल्यानतर असेचे शिक्षण सुरू झाले खरें पण दिलेला एक दिवसाचा अभ्यास तिला आठ दिवसातहि पाठ होत नसे सकाळी ती उशिराने उठे. चहानतर थोडा वेळ अभ्यासाच्या नावानें बसावें तो स्नानें करून जेवणाची वेळ होई जेवण झाल्यानतर वामकुक्षी, नतर चहा, नतर पत्ते, कॅरम, नंतर बद मोटारीतून टँकबंडवर फिरणें, रात्री जेवणें, सिनेमा किंवा झोप अशा रीतीनें दिवसामागून दिवस जात होते.

विद्येला लवकरच या ठिकाणाचा कटाळा आला. सामाजिक जीवन असें काही तेथे नव्हतेंच. दोन महिन्यात एकही व्याख्यान झाले नाहीं. गणेशोत्सवांत बाहेरून पैसे देऊन बोलावलेले वक्ते देखील कटाळवाणेच बोलले, नाहीं म्हणायला सीनेमा मात्र पुष्कळ पहायला मिळत असे आणि असेलाही त्याचा भरपूर नाद लागला होता. वरच्या वर्गाच्या झनान्यात बसून तिने हटरवालीपासून मर्जोलपर्यंत सर्व प्रकारचे बोलपट पाहिले आपल्या जवळपास बसलेली एखादी तरुणी अधार होताच उठून बाहेर जाते आणि अर्धविरामाचा उजेड होण्यापूर्वी परत येते असें का? सिनेमाचें तिकिट काढूनही ती सिनेमा का पहात नाहीं, हे विद्येला कळले नाहीं. एका सुशिक्षित दिसणाऱ्या पोरसवदा स्त्रीला तिने विचारलेंहि, पण तुम्ही इथल्या दिसत नाहीं तुम्हाला कळायचे नाहीं येवढेंच सागून ती उठून गेली.

विद्येला यथे फारच ओकें ओकें वाटू लागले. उमापतीपूरला असलेलं खेडेगांवचें मोकळें वातावरणही येथें नव्हतें. आल्यापासून दोन महिन्यात वासुदेवची काहीं बातमी तिला कळली नाहीं. उमापतिपूरला असतांना वासुदेवची जी काही पत्रे आपल्या वडिलाना आली, त्यांत दादासाहेबाचा

अत्यंत गौरवाचा, अभिमानाचा आपलेपणाचा उल्लेख असूनहि, त्यांच्या नाहींशा झालेल्या मुलीबद्दल चकार शब्दही नव्हता यावरून तिने असें अनुमान काढलें कीं, दादासाहेब आपल्याला पूर्णपणें विसरलें तिला अतिशय वाईट वाटलें, तिचा अभिमान दुखावला. तिला राग आला कंटाळा तर आलेलाच होता. दसरा होताच आपण दिवाळीला मुंबईला आपल्या मैत्रिणीकडे जावें. पुष्पाला आपल्याला पाहून आनंद होईल. ती आपल्या वडिलांना कळवील. अनायासे त्यांना खिजविल्यासारखे होईल काहीं झालें तरी आपण परत त्यांच्याकडे जायचें नाही, असे तिने मनाशीं ठरविले. असा बाईकडून रजा मिळाली आणि तिने जाण्याची तयारी केली, पण—

का आणि कसे, पण तिला आपलें वाटले कीं जायचे तर इकडून मनमाडमार्गे जावे वासुदेवला तार करून रोटेगाव स्टेशनवर भेटायला बोलवावे. दादासाहेबाची सगळी हकीकत विचारावी. ते आपली आठवण काढतात का? अजून त्यांचा राग कायम आहे का? का मुलगी मेली असेंच ते समजले आहेत. त्यांचा स्वभाव तामसी म्हणून तोंडसुद्धा पाहू नये, पण आपल्याला राहावत नाहीं म्हणून चौकशी करायची. वडील आहेत; छत्र आहे. त्यांच्या संपत्तीची आपल्याला गरज नसली तरी त्यांच्या मायेची . सुंभ जळला तरी पीळ जळत नाहीं काहीं काहीं किती किती तिला वाटलें. शेवटपर्यंत तिचा निश्चय झालाच नाहीं पण शेवटी एकदा तिनें "मी अमक्या तारखेला सकाळीं निघून मनमाडमार्गे मुंबईला जात आहे रोटेगाव स्टेशनवर गाडीला रात्री येऊन भेटा. – शारदा शहाणे – अशी तार वासुदेवच्या नावानें दादासाहेबांच्या पत्त्यावर केली आणि कोजागिरीच्या दिवशी सकाळीं ती मिटरगेज गाडीने एकदाची निघाली.

गाडींत तिला सारखी हुरहूर वाटत होती कीं आपण तार केली ही चूक केली. त्यात आपल्या मनाचा कमकुवतपणा दिसून आला आपण या बाजूनें यायलाच नको होतें. काही गरज नव्हती.

आणि जणू काय आपण हे चोरीचे काम लपून छपून करीत आहोत अशा भावनेने तिनें सर्व प्रवास स्त्रियांच्या डब्यात वर्तमानपत्रात डोकें खुपसून केला आणि मनात वारवार निश्चयही केला कीं, झालं ते झाले यापुढे तरी स्वतःशी कठोरपणें वागायचें.

रोटेगाव स्टेशनवर गाडी थावली आणि वासुदेव तिला चांदण्यांत डब्या-डब्यातून डोकावताना दिसला. तिचा आनद तिचें न ऐकतां मुद्रेवर आवा-जांत आणि आचारात झळकला. तिने दारातून बाहेर डोकावून त्याला खुणविलें आणि म्हटले.

" हॅलो, दॅट्स् नाईस ओबिडियन्ट बॉय, पण इथ गाडी फार वेळ थाबत नाही म्हटल ! तो पहा गार्ड येतोच, त्याला सागून एका डब्यात शिरा लवकर. बिनतिकिटाचा प्रवास करायची तुम्हाला सवय आहेच, पण – " एवढेच म्हणून ती इकडे तिकडे पाहू लागली.

" हा बायकाचा डबा आहे म्हटल ? मोगलाई संपेपर्यंत मी गोषात आहे हं ऽ ऽ ! "

ती हासली, तोही हासला. गार्डाने शीळ वाजविली " मी मनमाडपर्यंत येतो आहे ह ऽ तेथें देईन पैसे " असें त्याला ओरडून सागुन तो चालू लाग-लेल्या गाडींत सापडेल त्या डब्यात चढला.

गार्डाचे लक्ष शारदा शहाणेच्या हसत मुखाकडे असेतो त्याने काहीच ऐकले नाहीं आणि मानलेही नाहीं. मनमाडला पोचल्यावर त्याने शेवटच्या तपासणीच्या स्टेशनापासूनचें भाडें दडासुद्धा वाजवून घेतलें. वासुदेवने मनात आणि जनातही रेल्वेला लाखोली वाहिली. मनमाडच्या प्लॅटफॉर्मवर बाकाशेजारी सामान जमवून चांदण्यात निवात चहा घेत गाडीची वाट पहात हितगुज करीत असताना देखील त्याला ती तिकिटाबद्दलची चुटपूट लागूनच राहिली.

" रोड झाला बरं का ! दगदगीनें असेल म्हटल ग्रामसेवक कुणांकडे बघायला तरी तयार आहेत का ? सवड मिळाली म्हणायची – खरच, आज कोजागिरी नाहीं का ? मग आपण इथ प्लॅटफॉर्मवर चहान साजरी करीतच आहोंत कीं ! "

तिनें आपला कप त्याच्या कपाला लावला आणि म्हटलेः—

" टू युवर – काय म्हणाव बर ? "

" तें जें काय म्हणाव त्याला हे चालत नाहीं. "

" मग काय वारुणी हवी ? "

" काही तरी मादक हव. "

त्यानें तिच्याकडे पाहिलें. मादक तर होतेच – चादणे तिच्या गालांवरून फवाऱ्यासारखे वहात होते. ती जिवणीची किनार, ती नाकपुडीची पाकळी सारे त्याला अगदीं – अगदी आपल्याजवळ दिसत होतें. तिकडे पहातच तो आपल्या बशींत चहा ओतू लागला. चहा तरी कसला खट ! बशींत न साडता हातावर साडला. भाजले विशेष नाहीं. निवाला होता बराच पण दुसऱ्या हातातला कप सुटून बशीत पालथा झाला.

"पाहिलं ? म्हणतच आहे – देअर्स ए स्लिप बिट्वीन दि कप् ॲंड दि लिप्"

त्याने हें वाक्य म्हटलें असते तर नक्की "बिटवीन दि लिप ॲंड दि लिप" असेंच म्हटलें असतें, पण बशींतला साडलेला चहा पीत त्यानें म्हटलः—

" टु युवर हेल्थ ॲंड ब्यूटी. "

त्यानतर त्यानें तिला आपल्याला तार ऐनवेळेला कशी मिळाली; आपल्या ग्रामसेवासंघाचा कोजागिरी उत्सव सोडून कसें यावें लागले; दादासाहेबाची आपल्या कार्यांत कशी मदत आहे; त्यांनाही सकाळीं कुणाचीशी तार आल्यामुळें एकदम दुपारच्या गाडीनें हैद्राबादला जावें लागले. समारभाचा सगळा भार शाहूरावावर पडला आहे, शाहूराव आपला मित्र कसा आहे, इत्यादि

हकीकत सांगितली तिनेंही पण आपल्या घरची माहिती अगदी तिऱ्हाईत-पणाचा आव आणून पण खोदखोदून विचारून घेतली.

दिल्ली एक्सप्रेसनें त्या उभयतांना दादरला नेलें. दादरला व्हिन्सेंट रोडवर काति मॅन्शन्समध्यें नुकत्याच उघडलेल्या एका गुजराथी हॉटेलांत ते उतरले. नाव लिहून देतांना शारदा शहाणे पुढें झाली आणि तिनें त्याचें नाव वसंत आत्माराम शहाणे असें नोंदविलें. कारकुनानें त्याचें सामान एका डबल रूम-मध्यें ठेवण्यास गड्याला फरमावलें तेव्हां तिनें त्याला हंसून म्हटलें, "तुमची गैरसमजुत झालेली दिसतें."

चहापाणी झालें आणि त्याला आपल्या खोलीच्या व्हराड्यांत हवा खात बसवून ती आपल्या मैत्रिणीकडे म्हणून गेली अचानक आणि अनिच्छया वसंतराव शहाणे बनलेले हे पांथिक आपण मुंबईला का आलो याचाच विचार करीत राहिले. बसून बसून कंटाळले पाटील टेरेसमध्ये जाऊन आपल्या मित्राचा तरी शोध घ्यावा असे त्याच्या मनांत आलें पण कृतींत आलें नाहीं

हिंदू कॉलनींतील पुष्पाच्या मामाच्या घरीं जाण्यासाठीं विद्या चाळीच्या फाटकांत शिरली तो तिला सुब्बी दोन अिमारतींमधल्या कॉर्पोरेशननें सक्तीनें सोडायला लावलेल्या जागेंत एका तिऱ्हाईत मुलीबरोबर बॅडमिंटन खेळत असलेली दिसली. त्याच ठिकाणीं त्याच सुबीला अन् कुमुदला अन पुष्पाला तिनें किती तरी लव्हसेट दिलेलें होतें. सुबीनें तिला पहातांच धावत येऊन कडकडून मिठी मारली अन् म्हटलें, "काय ग बिंदी, कुठ हरवली होतीस इतके दिवस? अन् केव्हां आलीस? अन्......"

सुबीनें खेळ अर्धाच सोडून तिला ओढत दुडदुडत तिसऱ्या मजल्यावरील आपल्या बिऱ्हाडीं नेलें आणि तिचें दोन्ही हात धरून म्हटलें:—

"काय लबाडे! कुणाबरोबर पळाली होतीस अऽ? अन असतेस कुठें? सांग सगळें, सगळं सांग. आम्हाला तर कळलं होतं कीं तू हैद्राबादेस होतीस अन् इथ मुंबईत कशी?"

" तुम्हाला कळल ? "

" होय पुष्पाच्या नवऱ्यान तुझ्या खुणाखुणा अगदी सगळे बरोबर सांगितलें आणि — " " पुष्पाचा कोण म्हणालीस ? "

" हो ऽ ऽ तुला काहींच माहिती नसेल नाहीं का ? "

"पुष्पाचें गेल्या शुक्रवारी रजिस्टर लग्न झाले. कल्याणराव नावाच्या मोगलाईतील एका ब्राह्मण देशमुखाशीं"

" कल्याणरावाशी ?. "

" हो, तुला ओळखतात का ते ! "

" होय, पण हें कस झाल ? "

" मोठी इस्टेट आहे ना त्याची."

" हक्क तर सागताहेत — पण हें कस झाल ! "

" का ग, तुला त्यात एवढ आश्चर्य कसल वाटतंय् ? तू येथें असतांनाच म्हणे त्याची कोर्टशिप् सुरू झाली. पुष्पाच्या वडिलांची आणि त्यांची पूर्वीची ओळखही होती, आणि त्यानीं आधींच आपली मान्यता दिली, मग काय ! "

" अन् पुष्पा, त्याच्यावर प्रेम करते ! "

" तें मला माहीत नाही, पण ती खुप आहे एवढ खर ! "

सुबीने तिला आणखीही बरीच माहिती सांगितली. सहा महिनेपर्यंत मनधरणी करून घेतल्यानतर पुष्पाने अखेर समति दिली. कल्याणराव मोठे रसिक आहेत तू गर्व करू नकोस की, मीच तेवढी पुष्पाची जिवलग मैत्रिण होते. माझ्यापासूनही ती काहीं लपवीत नाही. देशमुखीबद्दल त्याचें तटे चालले आहेत हें सुद्धा तिनेंच मला सांगितलें. परवा सहजच बोलतां बोलता कल्याणरावानीं म्हटलें कीं अशा अशा वर्णनाची एक मुलगी गेल्या उन्हाळ्यांत असाबाई नावाच्या आपल्या घराण्यातील एका विधवेजवळ कंपॅनियन् म्हणून

राहिली. त्यावरून आम्ही नक्की अनुमान केलें कीं, ती सूच असली पाहिजेस पुष्पानें तुझ्या वडिलांना पत्र लिहिले कीं हैदराबादेस तुझा पत्ता लागला आहे आणि ती आपल्या पतीसह अमुक तारखेला तिथें जाणार आहे आजच ती निघणार होती, पण तुझ्या वडिलाची तार आली कीं, मनमाडमार्गे जा आणि ताबडतोब पहिल्या गाडीने निघा. मला तार करा मीही बरोबर येणार आहे. म्हणून काल सकाळीं पुष्पा आपल्या पतीसह गेली आणि मी तुझ्या वडिलाना तारेनें कळविलें.

विद्येनें विचार केला कीं, आपल्याला आदले दिवशीं सध्याकाळी भेटलेल्या हैदराबादकडे जाणाऱ्या गाडींत पुष्पा, कल्याणराव नि दादासाहेब होते. तर विद्येची मनस्थिति मोठी चमत्कारिक झाली दादासाहेब आपल्याला भेटायला उत्सुक आहेत हें कळून तिला आनद झाला, पण पुष्पाचें लग्न कल्याणरावाशीं झाल याबद्दल तिला हुरहूर वाटू लागली. तिला आपले वाटलें कीं, पुष्पाला सुख होणार नाहीं.

पुष्पाच्या सगतीत खेळीमेळीने चार दिवस घालघावेत म्हणून ती आलेली पण तिला पुढे काय करावे हाच विचार पडला. आलें तसे परत जावें तर असाबाईला काय सागावें ? पुष्पा भेटेल, मनमोकळेपणानें बोलेल, पण दादासाहेब आपल्याला हट्टानें घरीं नेतील, आपण असें अचानकपणें पकडलें जाऊ अशी विद्येला मुळींच कल्पना नव्हती तिची इतक्यात घरीं जाण्याची तयारी नव्हती. तिचा कोणताच बेत नक्की नव्हता. काय करावें हें ती ठरवू शकली नाहीं.

ती जेव्हां जायला निघाली, तेव्हा सुब्बीनें तिला म्हलले "काय ग, पुष्पाच्या मामाला भेटत नाहींस का ? अन तू उतरलीस कुठें ?"

"मी पुष्पाच्याकडें रहावें म्हणूनच आलें होतें पण, –"

"मग माझ्याकडे रहा. तुझे सामान कुठें आहे ?"

" सामान आहे असेंच कुठें तरी, पण नको, मी तुझ्याकडे रहातही नाहीं आणि मामाला इतक्यात भेटतही नाहीं. "

" मग पुन्हां फरारी होते. "

" नाहीं, मी पुन्हा भेटेन "

" शप्पथ "

" अगदीं शप्पथ ? "

तिने किती किती आग्रह केला, पण विद्येने ऐकले नाहीं. कांतिमॅन्शन-मधील त्या नव्या गुजराथी हॉटेलांत परत येताना, तिच्या मनानें एक वेडा विचार निश्चित केला तिथेंच या हॉटेलात रहावें. चर्चगेटला राहणाऱ्या ख्रिश्चन मैत्रिणीच्या साहाय्यानें इथेंच मुंबईत दुसरी नोकरी पहावी; पुन्हा अज्ञातवासात दिवस काढावेत. ती हॉटेलात आली. वाट पहात बसलेल्या वासुदेवबरोबर जेवली. दुपारीं चर्चगेटला जाऊन आपल्या मैत्रिणीला भेटली तिने तिला पाहून आनद व्यक्त केला. " तू तेथे परगावला कटाळली असली तर इथे चार दोन जागा रिकाम्या आहेत, तुला एखादी मिळू शकेल." असें आश्वासन ही दिलें.

वासुदेव सायकाळीं पाटील टेरेसमधील आपल्या मित्राकडे गेला; पण त्यानें आपलें बिऱ्हाड बदललें होतें. नवीन ठिकाणाचा त्याला नीटसा पत्ता लागला नाहीं. पुष्पाचा हैद्राबादचा पत्ता म्हणजे कल्याणरावचा पत्ता. ते असेंचें प्रतिवादी असल्यामुळें विद्येला माहीत होते. तिनें तिथेंच पुष्पाला पत्र लिहिलें. तिच्या विवाहाबद्दल अभिनदन केलें विद्येसारख्या एका मुलीसाठीं तिनें दादा-साहेबाना हैद्राबादला नेल्याबद्दल तिचें कौतुक केलें आणि लिहिलें कीं, 'विद्या इथेंच होती, आहे आणि राहणार आहे. हैद्राबादला तिला शोधत फिरून तिथले रस्ते झिजवू नका ! '

दुसरे दिवशीं वर्तमानपत्रातून बातमी आली कीं, " शेबंती गावांत कोजागरीनिमित्त मारामारी झाली. त्यात एक इसम मेला व पुष्कळ लोक

जखमी झाले. बरेचसे गुन्हेगार धरले गेले असून, काहीं प्रमुख आरोपी फरारी आहेत."

संदिग्ध अशी ही बातमी ऐकून, वासुदेव जाण्यासाठीं चुळबूळ करू लागला, पण विद्येनें त्याला निक्षून सांगितलें की, "सविस्तर हकीगत कळल्याशिवाय कांहीं हालचाल करू नका" तिला त्यातल्या त्यात एवढें समाधान होतें की, दंग्याच्या वेळी दादासाहेब गावात नव्हते. तिसरे दिवशीं फारच चमत्कारिक आणि विकृत हकीगत प्रसिद्ध झाली— "पाटीलकीच्या वतनाबद्दल शाहूराव आणि सटवाईराव या भाऊबंदात वाद होता आणि आपसात वैमनस्यही होतें. त्यामुळें गावांत दोन तट पडले होते आणि श्रीमंत दादासाहेब चौधरी यांचा आश्रय शाहूरावला होता सटवाजीनें आपले वडाचे वावर म्हणून प्रसिद्ध असलेलें शेत सय्यद उमर नावाच्या सावकाराला विकले. पण शाहूरावनें गावातील अनेक गुंड जमा करून कोजागिरीच्या रात्री सावकाराला बेदखल करण्याचा प्रयत्न केला. सावकार, उमरखा व त्याचा भाऊ रहिमानखा व त्याचे इतर आप्तइष्ट यांनी त्याला प्रतिबंध केला. पण शाहूरावने जुमानले नाहीं. प्रकरण मारामारीपर्यंत गेले आणि उमरखा हॉस्पिटलमध्यें मेला. त्याच्या भावाला व आणखी एका दोघाना किरकोळ स्वरूपाच्या दुखापती झाल्या असून आरोपीपैकी दोघे अत्यवस्थ आहेत. गावांतील अनेक लोकांना मारामारीत सामील असल्याच्या आरोपावरून पकडलें असून, स्वतः शाहूराव फरारी आहेत."

ही बातमी वाचून विद्येने निश्चित ठरविलें की, शेवतीला जाण्यात वासुदेवला धोका आहे. आणि तिनें त्याला तसे बजावलेंही. तिनें त्याला काहीं दिवस असेच आपल्याजवळ ठेवून घेतले असते, पण —

दुपारीं चारच्या सुमाराला ती कातीमॅन्शनच्या फाटकात शिरत असतांना संतुकराव व पेकाजीराव तिला आतून बाहेर पडत असताना दिसले. पेकाजी-

रावाचा घेर एकदोन इचानीं वाढला असेल आणि सतुकरावांचा कमी झाला असेल, त्याशिवाय त्याच्यात कांहींही फरक झालेला नव्हता. या खेपेला तिला त्यांना टाळता आलें नाहीं. पैकाजीरावानीं अगदीं प्रशस्त हात पसरून अडवूनच तिला विचारलें " कांहो विद्याताई, ओळखले नाहीं का ? "

" न ओळखायला काय झाल ? "

" पण गतवर्षी पुण्याला जाणाऱ्या गाडींत आम्ही तुमच्याबरोबर कल्याणपर्यंत प्रवास केला, पण तुम्हीं काही ओळख दिली नाही." सतुकराव म्हणाले.

" हो का ! " मला नाहीं बाई आठवत. मग कदाचित् मीं पाहिलच नसेल.

" इकडे कुणीकडे ? " पैकाजीरावाने विचारलें.

" मी इथेंच असतें ना दादरला शिकायला, तुम्हाला तर माहीत आहे."

" पण आम्हीं ऐकलें तुम्ही पळून – "

" उगीच रागावून आले " असें म्हणून ती झुकांडी देऊन आत जाऊं लागली.

" अहो थांबाना ! अशी जलदी का म्हून ? " पैकाजीराव आपल्या सपाट आवाजात म्हणाले.

" आम्ही येथें या हॉटेलात वर्ध्याचा एक गुजराथी कापसाचा दलाल रमणिकलाल उतरला आहे त्याच्याकडे आलों होतो. "

" पण मग एकदा या कीं आमच्याकडे हिंदुकॉलनींत. तुम्हांला पत्ता माहीत आहेच." असें म्हणून विद्या तेथून निसटलीच.

धापा टाकीत ती वासुदेवच्या खोलींत आली आणि तिने धाड्दिशीं दार लावून घेतलें. वासुदेव टेबलाशीं बसून पत्र लिहीत होता. त्यानें वळून पाहिलें.

" हॅलो ! श्रीयुत वसंत आत्माराम शहाणे. काय चाललें आहे ! "

तिनें त्याच्या खाद्यावरून पत्रावर नजर टाकिली. "काय दादासाहेब चौधरी यांना पत्र ? काय म्हणून ?" तिने तें पत्र शांतपणें वाचून पाहिलें आणि शांतपणे फाडून टाकलें.

शेवतीशीं यापुढें कांहींही संबंध ठेवणें नाहीं. उगीच जीव धोक्यात घालू नका. समजल ? एका लोकप्रिय भावगीतातील तान घेत ती न्हाणीघरात गेली. वासुदेव स्तिमित झाला. एका वाक्यात तिनें आपला सर्व अभिप्राय व्यक्त केला होता.

कांही वेळानें ती परत येऊन म्हणाली, "पण आपल्याला इथ अस राहता येत नाहीं. निदान तुम्हाला तरी आजच इथन गेल पाहिजे !" "मग मी तरी काय म्हणत होतो ?" तिनें हॉटेल बॉयला चहा आणण्यास सांगितले.

"चहा घेऊन आपण इथन निघू मी आपल्या मैत्रिणीकडे जातें. तुम्ही मनाला वाटेल तिकडे जा, पण जाण्यापूर्वी मला एक वचन मात्र दिलें पाहिजे."

"कसल पण ?"

"दिल म्हणाना."

"दिलं ... .."

"शेवतीला जायच नाहीं, तिकड बघायचसुद्धा नाही. तिथें कुणाशीं पत्र-व्यवहार करायचा नाहीं. तिथें असलेल्या आपल्या सामानसुमानाची पैशा-अडक्याची आशा धरायची नाहीं. हे सारं माझ्यासाठीं करायच."

"शारदा ऽ —"

"मला वाटत तुम्ही इथून थेट उमापतिपूरला आपल्या वडीलाकडेच जाव आणि तिथेंच सहा महिनेपर्यंत कांही चळवळ न करतां शेवंतीचें सारे वातावरण शांत होईपर्यंत रहावें. खरच तुम्हाला खर्चासाठीं पैसे लागतील ना ! असें म्हणून तिनें काही नोटा आपल्या बॅगमधून काढून त्याच्या शर्टच्या

खिशात कोंबल्या. वासुदेव काहीं बोलणार इतक्यात चहा आणणाऱ्या पोऱ्यानें दार उघडलें. चहापाणी झाल्यावर तिनें सामानाची बांधाबांध करविली, हॉटेलचें बिल चुकतें केलें, टॅक्सी मिळविली आणि कार्तीमॅन्शनच्या फाटकाजवळ त्याला निरोप दिला.

"अहो पण तुमचा पत्ता मला नको का?" त्यानें अगदी शेवटीं विचारलें.

"तुमच्या घरच्या पत्यावर लिहीन तुम्हाला तेथेंच राहाणार आहातना!" असें म्हणून तिनें टॅक्सी चालवण्याला फर्मावलें.

काहीं मिनिटानी ती दिसेनाशी झाली, आणि अंगावरच्या कपड्यानिशीं तो व्हिन्सेंट स्ट्रीटवर एकाकी सोडला गेला. पण या वेळीं त्याच्या अंगात उत्साह, मनांत प्रसन्नता आणि जीवनांत गोडी वाटत होती.

---

## : : : : : प्रकरण ८ वें

---

शाहूरावचा भाऊबंद सटवाजी पाटिलकीच्या वतनाचा मोठा हिस्सा खात होता. त्याच्या तोडीचे मूर्ख आणि व्यसनी शिवारगावात दुसरें कुणी नव्हते. सटवाजीची बैठक नेहमीं मौलवीसाहेबाकडे असे. त्याला तो गुरु मानीत असे आणि त्याच्या अगदीं अर्ध्या वचनांत असे. पाटिलकीचें वतनाची कारगुजारी सटवाजीकडेच होती, पण धाकदपटशा जुलूमजबरदस्ती फसवाफसवी इत्यादि अनेक गुन्हे त्याच्याविरुद्ध सिद्ध होऊन त्याला काढ-

ण्यात आलें आणि सरकारतर्फे गुमास्ता नेमण्यात आला. पण त्यानंतरही मौलवीसाहेब त्याला बनवून त्याच्या हातून हे प्रकार करवीत. आणि अशा लाभलेल्या पैशातून त्याला व्यसनाचीं साधनेही पुरवीत.

शाहूराव उमरच्या घरात तो नसताना शिरला एवढी बातमी मौलवीला समजली पण त्यानें ती मसाला लावून उमरला सांगितली. उमरनें लालडी बेगमला विचारल पण तिनें उडवून दिलें, म्हटलें, "कधीं ? मला तर कुणी कुठें दिसले नाहींत घरांतली काहीं चीजवस्त तर गेली नाहीं ना ?"

उमरनें आपल्या मनाची समजूत केली कीं, काफर उचलेगिरी करण्यासाठीं शिरला असेल पण साधलें नाहीं. रहिमानखानें एकदां हळूच सुचविलें कीं, काफर तुझ्या लालडीला चोरायला आला असावा पण उमरखाने या भाषणाचा आपल्या मनावर काहीं परिणाम झाला असें दाखविलें नाहीं.

ग्रामसेवक संघाच्या सर्व चळवळी वडाच्या वावरात होत. त्यामुळें त्या ठिकाणाला दिवसेंदिवस महत्त्व येत चाललें होतें. तें शेत शाहूरावचें होते. याबद्दल सटवाजीरावाला फार वैषम्य वाटत होते. मौलवीच्या बैठकींत याबद्दल चर्चा चाले. सटवाजी जेव्हां मत्सराच्या शेवटच्या मजल्याला पोंचला तेव्हां म्हणू लागला की, तें शेत मला मिळालें नाहीं तरी चालेल पण शाहुरावचा नक्षा उतरला पाहिजे मौलवीने उमरला हा फायदेशीर सट्टा करण्यासाठीं फितविलें. त्यानें शेताचे विक्रीपत्र एक पैसाही न देतां, उमरच्या नांवानें रजिस्टर करून घेतलें. थोडेसे पैसे खर्च करून मागील पहाणी पत्रकातून ताबा सटवाजीचा लिहवला आणि अजमीरहून पळून आलेल्या दोन फकीराच्या साहाय्यानें शेतावर जबरदस्तीनें कब्जा करण्याचें गुप्तपणें ठरविलें. त्यांची खात्री होती कीं, एकदा आपण या फकिरांना चौदींवारींत नेऊन बसविले म्हणजे मग कोणीहि त्यांच्या वाटेस जाण्यास धजणार नाहीं. शाहूराव, शंभू, आणि त्यांचे स्वयंसेवक यांना कसलीच कल्पना नव्हती.

त्यानीं कोजागरीची तयारी मोठी कसोशीने केली, दूध, साखर, केशर, बदाम वगैरे पदार्थांची वर्गणी गवळी, व्यापारी, सावकार, वाणी, उदमी, आसामी, वगैरेकडून अपेक्षेबाहेर जमा झाली होती. दुधासाठी मोठ्या काहिली नदीच्या वाळूनें घासून पुसून तयार झाल्या होत्या, आणि इकडे काटेरी ताराची बंडले रहिमान व उमर यानी बैलगाडीत भरून आणली आणि स्वत. आपल्या देखरेखीखालीं खांब रोवून व तारा बांधून वडाच्या वावराची हदबंदी पुरू केली.

हें ताराचें कुपण तिनीसांजाला तयार झालें. त्याच वेळीं दोन अज्ञात पठाण गावांत आले. ओढ्यावर पाणी प्याले "तारा कां लावता शेत कोणाचे" म्हणून विचारू लागले. राखण बसलेल्या दोन अजमीरी फकीरानीं जेव्हा उमरचे नांव सांगितलें, तेव्हा तो कुठें राहतो असें त्यानीं विचारलें. गावात मशिदीजवळ तो राहतो असें कळताच ते गावात निघून गेलें.

काहीं वेळानें कोजागिरीसाठीं दूध घेऊन आलेल्या एका गवळणीला त्या अजमिरी फकिरानी धक्के देऊन बाहेर घालविलें आणि तिच्याजवळील दुधाचा सडा त्या वडाच्या वावरात केला. तिने आरडाओरड केली. हा हा म्हणता माणसें जमा झाली. बोलाचाली झाली. पण शंभू आणि त्याच्या बरोबरीचे काही नवजवान येताच त्या फकीरानीं पळता पाय काढला.

जरूर तेवढ्या तारा उपटून टाकून शंभूने वाटा करून घेतल्या. नदींतून काहीली आल्या, रानातून सरपण आलें, गावातून दूध आले, आणि कोजागिरीची तयारी मोठ्या धामधुमीनें सुरू झाली.

घडलेली आणि न घडलेली हकीगत अजमिरी फकीराने जाऊन रहिमान व उमर वगैरे मंडळींना सांगितली. मशिदीत मंडळी जमली. मशवरा झाला.

मिळतील ती हत्यारें घेऊन ते धर्मवीर त्या फकीराच्या अपमानाचा बदला घेण्यास निघाले.

इकडे गावातील सर्व प्रमुख मंडळी कोजागिरीनिमित्त बोलावली गेली पाटील पटवारी, शेठ, सावकार, वाणी, उदमी, शेतकरी, कामकरी, भलाबुरा सर्व या उत्सवात भाग घेण्यासाठीं आले पुजेची तयारी झाली. हुतुतूहमामा सुरू झाला. दादासाहेब चौधरी व हरीराम रामरतन फक्त नव्हते. वासुदेवरावची सर्वांनीं आठवण केली. सुभान नावाचा एक सालस म्हातारा शेतकरी दादासाहेबाचा आसामी मुसलमान असूनही मुद्दाम शंभुच्या आग्रहास्तव आणि प्रेमास्तव आला होता. रात्री दहाच्या सुमाराला उमरखानें पुढे येऊन सर्व लोकाना सांगितलें कीं, "शेत माझें आहे आणि तुम्ही सर्व येथून माझ्या जमिनींतून चालते व्हा. तारा तोडणाराचा समाचार मी घेतल्याशिवाय राहणार नाहीं." लोक म्हणू लागले. "शेत शाहूरावचें आहे." पाटील पटवारी उगीच बसून राहिले. कुणीकडेच बोलेनात. रहिमान सटवाजीला आणा म्हणून ओरडू लागला पण सटवाजी तेथें नव्हता. कुठे दारू पिऊन पडला होता. शंभूनें मौलवीला बजावले कीं, "आता तुम्ही गोंधळ न करता निघून जा आमचें धर्मकार्य चाललें आहे शेत तुमचें असलें तरी काहीं बिघडलें. नाहीं शेत कोणाचें आहे याचा निकाल उद्या होऊ शकेल." पण दुसरे लोक म्हणू लागले. "शेत शाहुरावचें आहे हे आम्हाला माहीत आहे" मौलवी म्हणू लागला "शाहुराव जर शेत माझे नाही उमरभाईचें आहे, असें सर्वांच्या साक्षीने लिहून देत असेल तर आम्ही जातो." शाहूराव तसें करणें शक्यच नव्हत. बोलाचालीनंतर बाचाबाची झाली. म्हातारा सुभान भांडण मिटावें म्हणून मध्यें पडला, पण रहिमान आणि उमर यानीं त्याला नाहीं नाही त्या शिव्या हसडल्या तेव्हा त्याने रागाने मौलवीच्या मुसकटात भडकावली. उभयपक्षीं गडबड उसळली, आणि त्याच सध्याकाळीं ते दोघे अज्ञात पठाणही गर्दीत मिसळले. मारामारी झाली, आणि ज्या ठिकाणीं दुधाचा

सडा पडला होता त्याच ठिकाणीं रक्ताचा सडा पडला. उमरच्या पाठींत सुरा खुपसला गेला. रहिमानच्या पाठीत लाठी बसली. शंभु सुभान आणि पूजा करायला आलेला जोगी खूप ठेचले जाऊन बेशुद्ध झाले. मौलवीच्या बरोबर आलेल्या लोकाना आपण सशस्त्र आहो अशी घमेंड होती पण त्याचें संख्या-बळ कमी पडलें फार लोकाना लहान मोठ्या स्वरूपाच्या जखमा झाल्या. आपआपल्या जखमी लोकाना घेऊन उभय पक्षाचे लोक घरोघर गेले आणि काटेरी तारा दुधाच्या, घागरी, काहिली, तुराट्या, फुलें आणि इतर सामान पचनाम्याची वाट पहात चादण्यात बसून राहिलें.

ही बातमी दुसरे दिवशीं सकाळी औरगाबादला कळली आणि तेथून मुद्दाम स्पेशल पाठविला गेलेला फौजदार आपल्या पद्धतीनें प्रकरणाची चवकशी करू लागला. पाटील, पटवारी, जोशी, गावचे इतर वतनदार, सुभान, शंभू, आणि त्याच्या आखाड्यातले सर्व गडी आधीं पकडलें गेलें आणि मग जागेचा पचनामा झाला.

हरीराम रामरतन केवळ गावात होते म्हणून पकडले जाणार होते, पण त्यानीं आपली सुटका करून घेतली. शाहुरावानें बेशुद्ध झालेल्या शंभू सुभान व जोशी याना आखाड्यातील गड्यांच्या सहाय्यानें दादासाहेबाच्या देवडींत आणलें आणि त्याची शुश्रूशा केली. सुभान पहिल्यानें शुद्धीवर आला, त्यानें सर्व गोष्टी आठविल्या. सखोल विचार केला आणि शाहुरावला म्हटलें, " या झगड्याचे परिणाम फार दूरवर होणार आहेत. तुम्ही सर्व कागदपत्र, हिशेब, नि किल्या घेऊन हैद्राबादेस जा. तेथें दादासाहेबाच्या स्वाधीन करा. सर्व हकीगत सविस्तर सागा. इकडे येऊ नका असें बजावा आणि स्वतः फरारी व्हा. भगवान् तुम्हाला साभाळील." पहिल्यानें शाहूरावनें मानलें नाहीं. पण सुभानने त्याला ऐकायला लावलें. रात्रभर जागून शाहूरावनें सर्व आवरा-आवर निरवानिरव केली. रात्रभर जागून आखाड्यातील गड्यानीं शंभूला शुद्धीवर आणलें. पहाटेच शाहुराव गांव सोडून गेला.

शाहूराव तडक हैद्राबादला जाऊन दादासाहेबांना गुप्तपणे भेटला. सविस्तर हकीगत सांगून व कागदपत्र, हिशेब, किल्ल्या सर्व त्यांच्या स्वाधीन करून तो तेथून नाहींसा झाला. विद्यादेवी सापडली. तिनें आपल्या मैत्रिणीला मुंबईहून पत्र पाठविलें हें ऐकून त्यातल्या त्यात त्याला बरें वाटलें.

वासुदेव वाजपेयीचा कांहीं पत्ता कळेना. म्हणून तो उमापतिपूरला आला, पण अनंतभटजींना कांहींच माहीत नव्हतें. त्याला कुणाची तार आली असेल किंवा तो कुठें गेला असेल याचा अंदाजही त्यांना सांगता आला नाहीं. कांहीं झालें तरी वासुदेवला शेवतीला जाऊं देऊ नका येवढें बजावून तो तेथुन गेला.

दादासाहेब चौधरी मुलीला भेटण्यासाठी मुंबईला जाण्याच्या विचारात होते इतक्यात शेवतीहून "तावडतोब या" अशा तारावर तारा येऊं लागल्या. पहिली निनावी आली. दुसरी सुभानच्या आणि तिसरी शंभूच्या नावें शेवटीं त्यानें शेवतीला जाऊन नंतर पुढें मुंबईला जावें असें ठरविलें. शेवतीला येतांच त्यांना कळून आलें कीं तारा स्पेशल पोलीस अधिकाऱ्यानें करविल्या होत्या. त्यानें दादासाहेबांना त्यांच्या गढींत भेटून समज दिली कीं – "दंग्याला चिथावणी देण्याचा आरोप तुमच्यावर ठेवला जाऊ शकतो. तुमच्या नोकरांनी दगा केला. दंग्यानंतर ते जखमी स्थितींत तुमच्या घरीं पकडले गेलें. तुम्ही दंग्याच्या दिवशीं दुपारीं एकदम निघून गेला वगैरे पुरावा आणि दंग्याची मसलत करताना ऐकलेलें प्रत्यक्ष साक्षीदार तयार आहेत.'

हा बनाव व उद्दामपणा पाहून दादासाहेब संतापाने बेफाम झाले आणि त्याचा परिणाम एवढाच झाला कीं, दहाबारा दिवसांनीं ते स्वतःही पकडले गेले. त्यांच्या अटकेची बातमी लगेच वर्तमानपत्रात आली आणि ती वाचून मात्र विद्या अगदीं घाबरी झाली. तातडीनें ती शेवतीला यायला निघाली, पण

दादासाहेबांना औरंगाबादला नेलें आहे असें कळताच ती थेट तेथें गेली. दादासाहेबांचे स्नेही गणेशराव वकील हे तेथें त्याना जामिनावर सोडविण्याची खटपट करीत होतेंच. पण मॅजिस्ट्रेटनीं त्याचा जामीनअर्ज शेवटीं फेटाळून लावला.

दादासाहेबाना ती तुरुंगांत भेटली तेव्हा त्यांनीं तिला पोटाशीं धरलें आणि म्हटलेः– " ताई, माझी चूक झाली. मी उगीच तुझ्यावर रागावलों पण तूं कुठें होतीस आणि काय केलेंस हेंही मी तुला विचारीत नाहीं. तूं परत आलीस यात मला सर्व कांहीं मिळालें." विद्येच्या डोळयात अश्रु पाहून ते म्हणाले, "तू काळजी करू नको. देवदयेनें आपण याही सकटातून मुक्त होऊं. अनुभवानें शहाणी झालेली तू असें दुःख करतेस?" विद्येनें आपले अश्रु पुसून म्हटलें, " नाहीं बाबा. नाहीं करीत."

उसनें आणलेलें अवसान होते तें! फार थोडा वेळ टिकलें. पुन्हा अश्रु सतत धार वाहू लागलें. कांहीं केल्या थांबेनात. किती पुसले तरी राहीनात. " आता जा, खटला जिंकण्याची धडपड कर. वाटेल तितका पैसा खर्च कर. आम्हां जमीनदारांचा पैसा अनाठाईच खर्च व्हावा असा ईश्वरी सकेत दिसतो. गणेशरावजीच्या सल्ल्यानें सर्व कांहीं होऊं दे. ते आपल्या घराण्याचे एकच खरे मित्र आहेत."

जे काय प्रयत्न करायचें ते गणेशराव करीतच होते. विद्या आपली आपल्या ओढानें इकडे तिकडे धावपळ करीत होती, इतकेंच. कांहीं दिवसानीं रीतसर खटला भरला गेला आणि प्राथमिक पुराव्यानंतर सेशन कमिटीही केला गेला. वासुदेव आणि शाहूराव हे आरोपी फरारी नमूद केले गेलें. प्राथमिक कैफियत सादर केली गेली कीं:—सटवाजीनें आपले शेत उमरखाला विकले ते त्याच्याकडून जबरीनें परत घेण्याचें दादासाहेब शाहूराव वगैरे पार्टीनें कट करून ठरविलें आणि कोजागिरी समारंभाचें निमित्त करून जनिनीचा जबर-

दस्तीनें तावा घेण्याचा घाट घातला आणि जेव्हां उमरखानें आपला भाऊ व मित्र याच्या समवेत येऊन आडथळा करण्याचा यत्न केला तेव्हा आरोपीनें मिळून त्याना मारलें आणि त्यात उमरखा मेला ”

वासुदेव देखील आरोपी आहे हे कळले तेव्हा विद्या अगदी कावरी बावरी झाली तिला धाकधूक वाटत होती कीं तो उमापतिपूरला पकडला जाणार म्हणून तिनें त्याला कबूल केल्याप्रमाणें पत्रही लिहिले नाहीं न जाणो पत्राच्या पाळतीवर पकड वारटही जायचे. पण मग तिला कळले की त्याला धरायला पोलीस उमापतिपूरला गेले होते पण तो तेथें नव्हता आणि तिचा जीव खाली पडला.

या खटल्यात तिला समाजाची एक नवीन बाजू दिसून आली कोणीही असा विश्वास दाखविना कीं पोलीसचा पुरावा खोटा असल्यामुळें आणि काहीं झाले तरी न्यायालय निःपक्षपाती असल्यामुळें कुणीही लायक वकील द्या म्हणजे यश निश्चित. गणेशराव सारखे अनुभवी आणि नावाजलेलेही म्हणू लागले कीं काळ फिरला आहे जसा होईल तसा हात सोडवून घेतला पाहिजे.

सेशनमध्यें दादासाहेबाचा जामीन अर्ज एकदम मजूर झाला आणि दहा हजाराची जामीनकी आणि तितकाच जातमुचलका यांवर त्याची सुटका झाली. झाले हे बरेच झाले कारण खटला किती दिवस चालेल याचा नेम नव्हताच.

विद्येला घेऊन दादासाहेब शेवतीला आले तेव्हां दुपार टळून गेली होती. ती गढी ते बुरूज ते दरवाजे सगळे काही जसेच्या तसे अगदीं निर्विकार होते. गणेशरावच्या सल्यानें विद्येनें पहाऱ्यावर नेमलेल्या शिखानें पुढे होऊन दिंडी उघडली पण आपले दोन्ही इमानी नोकर शंभूसुभाना वेगळयाच बुरूजांच्या आणि वेगळयाच दरवाजांच्या मागें होते याची आठवण होऊन दादासाहेबांना गहिंवरून आले. विद्या तर आपण कोणत्या परिस्थितींत गतवर्षी

ोयून गेलो हे आठवून ओक्साबोक्षी रडू लागली. दादासाहेर रुद्ध कठाने पाणी आणून तिला म्हणाले—

" ताई, तुझी आई नेहमी म्हणत असे, घरंदाज माणसानी आपल्या भावनाचा आवेग इतराना दिसू देऊ नये "

याच अजस्र दरवाजाने आणि उंच बुरुजाने तिला गतवर्षी तुरुगाची कल्पना दिली होती. पिजऱ्यातून बाहेर पडलेल्या पाखराप्रमाणें ती भुर्रदिशी उडून गेली होती आज त्याच दारातून परत घरात शिरताना तिला एका फार मोठया तुरुगातून बाहेर पडल्यासारखे वाटत होते. उगीच अकारण वाटत होतें. तिनें मागे वळून पाहिलें.

चार दिशेने जाणारे रस्ते सायकाळच्या उन्हात अगदी स्पष्ट दिसत होते. पण झाडी, टेकडया आणि क्षितिजे याचा कडेकोट त्या दृश्याच्या भोंवती होता.

बापाला भेटायला ती गेली तेव्हा औरगाबादचा तुरुंग पाहून तिच्या मनावर विलक्षण परिणाम झाला होता. त्या उच उच भिंती, तो एकच बद दरवाजा ती मनाविरुद्ध सक्तीने कामे करवण्याची पद्धती, ती मुजोर आणि मगरूर सत्ताधारी माणसे या सर्व गोष्टी ती त्या तुरुंगाच्या बाहेरही पहात होती. वावरायला जास्ती जागा आणि जुलुमाची वेगळी पद्धत याशिवाय आत आणि बाहेर यात फरक काय ?

हीच ती वारुणी असेल का ? वास्तविक आपण तुरुगात असताना बाहेरच आहो असा भ्रम उत्पन्न करते. आपण परेच्छेने परक्यासाठी एखाद्या कैद्याप्रमाणें आपणाला नको असलेलीं कामें करीत असताना, तीं आपण आपखुषीनें करीत आहोत अशी भूल पडते. आपल्या विचार–उच्चार–आचारावर बदी, निषेध, नियत्रणें यांच्या अजस्र श्रृंखला बांधलेल्या असतांना आपण स्वतत्र आहोत अशी समजूत करून देते.

अनुभवाचे अमृत आपण प्यालों. वारुणीचा अम्मल आपल्या मनावर चढणार नाहीं. मग असें का वाटतें ? जिथें आपली सत्ता चालत नाहीं, कितीही मोठा अफाट विस्तीर्ण असो, तो सर्व तुरुगच आणि या घरात आपली सत्ता चालू लागली ना ? म्हणून या घरात पाऊल टाकताना आपल्याला तसें वाटलें, तुरुगातून सुटल्यासारखें वाटले. त्याच आवेगाच्या तद्रींत ती म्हणाली, "पण बाबा, हें घर माझेंच आहे ना ?"

"होय बाळ !"

आणखी काही न बोलता ती डोळे पुसून उबरा ओलाडून आत गेली.

काही महिने मोठया धामधुमींत गेले. एकीकडे मारामारीच्या खटल्याचा साक्षीपुरावा चालू होता. एकीकडे सत्याग्रहाची वाढती उर्मी गावात सनसनी फैलवीत होती. बातम्यावर बातम्या येत होत्या. गुप्त पोलिसाचा सुळसुळाट झाला होता

रहिमानखाचे तर सर्वप्रकारें फावलें होतें. उमरखा जग्मी होऊन घरीं आणला गेला तेव्हां चागला शुद्धीवर होता. रहिमाननें आपल्या एका शिष्याला कन्नडला डॉक्टर आणायला पाठविलें आणि तो त्याच्याजवळ बसून राहिला.

"लालन कुठें आहे ?" उमरनें विचारलें.

"आत आहे" रहिमान म्हणाला.

"तू बाहेर जा. तुला माहित आहे ती तुझ्याशीं गोष्ट पाळते. तू माझा भाऊ असलास तरी ती तुझा तिरस्कार करते."

रहिमान दात खात बाहेर गेला. काहीं वेळाने माणिक आंत येऊन म्हणाली, "भोगलास आपल्या मस्तीचा परिणाम ? कितपत लागलें आहे ?"

"लालन, मी घटका दोन घटकाचा सोबती आहे पठाणी सुरीचा एक खोल वार माझ्या काळजाला जाऊन भिडला आहे. लालन, लालन ?

"कुणी मारलें तुला ? शाहूराव ?— "

"नाहीं, शाहुराव मर्द माणूस आहे लालन, दादेखा तेथल्या गर्दीत होता. त्याच नामर्दानें सधी साधून माझ्या पाठीत सुरा खुपसला."

"कोण ? दादेखा ?"

"होय, तीच कुत्र्याची अवलाद !"

"दादेखा इथे आला आहे ?"

"दादेखाने आपलें काम साधले लालन मला भोवळ येते आहे. मी जाना जगत नाही रहिमान तुझे रक्षण करील "

"मला कुणाचेंही रक्षण नको आहे "

"माझा सगळा पैसा तुझ्यासाठींच आहे "

"मला तुझा पैसा नको आहे उमर, मला तू पाहिजेस."

पण उमर डोळे फिरवू लागला.

"मला तुझा पैसा नको, तुझा माफ नको, मला तू पाहिजेस. उमर मला तू पाहिजेस." असें ती म्हणत असतानाच रहिमान आत आला.

उमरखा पुन्हा कधी काहीच बोलला नाही. बेहोष स्थितीत त्याला हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले आणि शक्य ते इलाज केले गेले, पण तो काही तासानी खलास झाला.

रहिमानने त्याची इस्टेट आणि बेगम दोन्हीही ताब्यात घेतली. स्पेशल पोलिस ऑफिसर मारामारीची चौकशी करीत असता, उमरने सागितलेली खरी हकीगत त्याच्या कानावर घालण्याचा माणिकने प्रयत्न केला, पण हा स्वतः काफर आहे आणि काफराना मिळालेली आहे आणि त्याना वाचविण्यासाठी काहीतरी बनावट सागत आहे, असे म्हणून रहिमानने तिला खोटी ठरविली. अगदी निरपराध लोक फासळे जात आहेत हे पाहून माणिकला फार दुःख झाले. रहिमानची तर तिला अगदी घृणा आली. तिने उमरच्या

पैशाअडक्याबद्दल विचारले तेव्हा रहिमानने निव्वळ शेरवानी झटकली तो म्हणू लागला " उमरजवळ काहीं नव्हतेंच. येईल कुठून ? त्यानें कधीं काय वजीरी केली कीं अमीरी ? " पूर्ण दिवस न होताच माणिक प्रसूत झाली आणि उमरच्या वंशाचा अंकूर उगवण्यापूर्वीच जळून गेला. आणि शेवटीं कळस झाला जेव्हा रहिमान तिला एका अधिकाऱ्याची चवथी बेगम हो म्हणून आग्रह करूं लागला. अगदी विटून ती एके दिवशी निघून गेली.

रहिमानला ते पथ्यावरच पडले उमरजवळ जी काही रोकड होती ती घेऊन त्याची लालडी बेगम फरारी झाली असें तो राजरोस सांगत सुटला. खटला चालविण्यासाठीं वर्गणी जमविण्याला त्याला चांगले निमित्त झालें उमरच्या स्थावर इस्टेटीचा तो वारस झाला. " वडाचे वावर " तर खाऊन बसलाच, पण उमरच्या खातेवह्यात तुझ्याकडे इतकी बाकी निघते असे तो अडाणी शेतकऱ्यांना दटावू लागला

दादासाहेब जामिनावर सुटून परत आल्यानंतर दोन तीनच दिवसांनी दोन सहानुभूतीचे मूर्तिमंत पुतळे सतुकराव आणि पैकाजीराव शेवंतीला येऊन पोचले. त्याचे स्वागत झालें नाहीं.

" सहज मुंबईला व्यापारासाठीं गेलों होतों. तुमच्याबद्दल बातमी समजली, म्हटले जाऊन समक्ष चौकशी करावी. हे असे कसे झालें हो ? "

" तुम्हाला काय समजलें ? "

त्यांना सर्व काहीं वेळीच कळलें होतें, पण त्यावेळी स्वस्थ बसून ते आता कोरडी सहानुभूति दाखवायला आले होते.

" ओहो ! विद्याताई इथेच आहेत का ? काहीं महिन्यापूर्वीं आम्हाला त्या मुंबईच्या एका हॉटेलात भेटल्या होत्या." पण दादासाहेबांनी त्याचे काहींच ऐकून घेतले नाही. त्यांनीं चाणाक्षपणें विषय बदलला आणि त्यांना घालवून देण्याचा एक रामबाण उपाय योजला. खटल्याची अडचण दाखवून त्यांनी दोन हजार रुपये त्यांच्याकडे उसनवार मागितलें.

"हा हा जरूर, आपल्यापेक्षा काय जास्त आहे दादासाहेब" असे वरकरणी बोलून त्या दोघांनी त्याच दिवशीं काढता पाय घेतला ते गेल्यावर विद्या दादासाहेबांना म्हणाली, "बाबा तुम्ही किती चांगले आहा?"

## : : : : : प्रकरण ९ वें

विद्येच्या सूचनेला मान न देता कांहीं दिवस वासुदेव मुंबईसच राहिला. दादासाहेबांच्या अटकेची बातमी त्याने वर्तमानपत्रात वाचली आणि कांहीं-एक विचार न करता तो शेवतीला येण्यासाठी निघाला.

मनमाड स्टेशनवर रात्रीं गोदावरी लाईनची गाडी प्लॅटफॉर्मवर येण्याची वाट पहात, कांहीं दिवसापूर्वी विद्येनें केलेल्या गोडगोड गोष्टींची आपल्या मनांत आठवण करीत तो उभा असताना एक शीख त्याच्याजवळ येऊन तुम्ही कुठे जाणार असे विचारू लागला शेवतीला तुम्ही काय करता? तेथेंतर झगडा झाला. दादासाहेब चौधरींना ओळखता का? ते गावात नव्हते तरी मारामारीला चिथावणी देण्याच्या आरोपावरून त्याना पकडलें आहे. तुम्हालाहि पकडतील नेम नाहीं असें म्हणू लागला? तुम्ही कोणत्या गावचे? काय काम करतां असें विचारतां त्याने मीहि शेवतीचाच पण आता येथें असतों असें सांगितलें. इतक्यात गाडी आली आणि वासुदेव तीत चढू लागला तेव्हा त्यानें त्याचा रहा धरून म्हटले "तुझा जीव तुला जास्त झाला आहे वाटत?"

वासुदेव चपापला.

"माझ्या बरोबर चल" त्यानें हुकमी आवाजांत फर्मावलें.

"तू कोण" असें म्हणताच त्यानें अगदीं हलकेच त्याच्या कानात सांगितलें "शाहू".

वासुदेव एक अवाक्षर न बोलता त्याच्याबरोबर गेला. त्यानें त्याला गावात नेले आणि सगळी हकीकत सांगितली. शेवतीच्या मारामारीला पोलिसने कसे स्वरूप दिले आणि दादासाहेबाना आणि वासुदेवलाही अप्रत्यक्ष गुन्हेगार ठरवून कसे आरोपी केलें. वासुदेवला पकडण्याला उमापतीपूरला पोलीस कसे गेले आणि निराश होऊन परत आले. दादासाहेब जामिनावर कसे सुटले, आपल्याला ही सर्व हकीगत कशी कळली, खटल्यात पुरावा कसा बनवला जात आहे इत्यादि हकीगत सांगून म्हटलें, "मी अचानक भेटलो नसतो तर अलगद त्याच्या हातात जाऊन पडला असतास. आपण माणमातून उठलो असे समजून जसा होईल तसा स्वतःचा बचाव कर मी सध्या दाऊरवाडीस आहे उद्याचे देव जाणे—पण तूही मला ओळखले नाहीस, त्यावरून वाटते की काहीतरी टिकाव धरू शकेन."

"पण अज्ञातवासापेक्षां बंदिवास बरा नव्हे का ?"

"जन्मठेपेचा बंदिवास ! मी साधा मराठा गडी आहे. मला नाही तुझें ते तत्त्वज्ञान समजत मरायचेच तर सडून मरण्यापेक्षा झगडून मरेन"

"कायदा आणि शांतता याच्या या राजवटीत आपल्याला कितीशीं आशा आहे !"

अजून प्रहररात्र असतानाच मानवतेला पारखे झालेले ते दोन मित्र आपापल्या वाटेने परागंदा झाले.

लपत छपत वासुदेव उमापतीपूरला आला. वडिलांना त्यानें शेवतीची सर्व हकीगत प्रामाणिकपणें सांगितली. न सांगण्यासारखें त्यांत कांहीं नव्हतेंच. रंजेवर जाणाऱ्या शारदा शाहणेला भेटायला आपण स्टेशनवर गेलों होतो म्हणून केवळ योगायोगाने दंग्यांतून कसें वाचलों हेंही सांगितले, पण तिच्या

बरोबर तसेंच पुढें मुंबईला गेलो हे मात्र सांगितले नाहीं. तिचे पत्र उमापती-पूरला येणार होतें त्याची तो अधीरतेनें वाट पहात राहिला. पण तें पत्र आलेच नाहीं.

उमापतीपूरला त्यानें राहणें धोक्याचें होतें म्हणून अनंत भटजींनीं त्याला हैद्राबादेस असेच्या घरी श्रीमतीच्या छत्राच्या आश्रयानें राहण्यास सांगितलें आणि शारदा शहाणे भेटेल या आशेने त्यानें तें कबूल केलें. त्यावेळीं हैद्राबादेस सत्याग्रहाची चळवळ फार जोरात होती. प्रत्येक व्यक्तीच्या हालचाली बारकाईने निरीक्षिल्या जात होत्या हा आपला नवीन पुजारी आहे असें असेनें चौकसांना सांगून टाकलें.

शारदा शहाणेने एक दोन ओळींचें पत्र लिहून असेला कळविलें होतें कीं, "परिस्थितींत अचानक बदल झाल्यामुळें मला नौकरीवर येता येत नाहीं. आपण आजवर केलेल्या उपकाराबद्दल सदैव ऋणी राहीन."

बस, पत्रात पत्ता नाहीं, ठाव नाहीं कीं ठिकाणा नाहीं.

नाइलाजानें वासुदेव असेकडे राहिला.

हा निखारा पदरात बांधून घेऊं नको असे अनेकवार देवगिरीकर वकिलांनीं तिला सांगितलं. पण तिनें मानले नाहीं. ती त्याला सहसा घराबाहेर जाऊं देत नसे. तिच्या बंगल्यासमोरील विस्तीर्ण चौक सत्याग्रही लोकांनीं सोईस्कर म्हणून पसंत केला होता. बंगल्याच्या माडींत चिकाचे पडदे लावलेल्या गॅलरींत किंवा गच्चीवर बसून कायदेभंगाची गडबड धरपकड पहावी, वर्तमानपत्रे वाचावीं, खावे, प्यावे, पडून रहावे, असें दोन तीन महिने गेले. वासुदेवला अगदीं कटाळा येऊन गेला. देवगिरीकरहि म्हणू लागले कीं, "जरी देशमुखणीने थोरपणाने तुला आश्रय दिला आहे तरी परिणामीं हे तिला अपायकारक आहे हे तू जाणतोस. तू तिचा खरा हितचिंतक असशील तर निघून जाशील. आपल्या सुखासाठीं तिचे हित तू इरेला घालीत आहेस."

देशमुखाची माणसें चार दोन दिवसाला उमापतीपूरची कैफियत आणीत, पण शारदा शहाणेंचे चिरवाञ्छित पत्र काहीं आलें नाहीं. वासुदेवला वाटू लागलें. घनतिमिरें दाटू लागली म्हणजे दहापाच वेळ वीज चमकते, वीज चमकून जाते आणि काळेकुट्ट आभाळ मात्र राहतें. तसें तिनें केलें. सत्याग्रहाच्या धामधुमीचा त्याच्या तरुण मनावर फार परिणाम झाला. त्यात त्याच्यासमोर रस्त्यावर गम्मत पहायला जमलेल्या तरुण विद्यार्थ्यांवर पोलिसने बेटन चार्ज करून घरात शिरून मुलाना मारलें हे पाहून त्याचें मन बेतोल झालें. या अमत्रक का होईना पण होत असलेल्या यज्ञात आपणहि आपला हविर्भाग दिला पाहिजे असे तो म्हणू लागला. त्याच हिरीरीत तो निघाला आणि पुण्याच्या सत्याग्रह शिबिरात आला.

शाहूराव शीख बनून नांदेडला अज्ञातवासात दिवस काढीत असतां एक नवल वर्तलें. ते पाहताच त्यानें आपण स्वप्नात तर नाहींना म्हणून डोळे चोळून पाहिले. घाटावरून स्नान करून येत असता त्याला समोर माणिक दिसली. ती गुडघी, कुडती, ओढणी काहीच नव्हते. एकाद्या आधुनिक ब्राह्मण स्त्रीसारखी ती दिसत होती. तो तिच्या मागोमाग गेला. ती गावात नवीन वस्तीत एका दारासमोर उभी राहिली आणि आत शिरणार इतक्यात त्यानें हाक मारली –

“ माणिक ! ”

माणिकने दचकून मागे पाहिलें,

“ माणिक तू येथे कशी ? ”

“ कोण तुम्ही ? ”

“ मी शाहू – ”

“ शाहूराव मी तुम्हाला अगदीं ओळखलें नाहीं. मला तुमच्याशी पुष्कळ बोलायचे आहे. मी येथें एक ब्राह्मण विधवा आहे. येथें आपण बोलणें ठीक नाहीं. उद्या पहाटे उजाडताना मी नदीवर येईन. तेथें तुम्ही येतां का ? ”

दुसरे दिवशीं पहाटे नदीवर तिनें शेवतीची सर्व हकीगत सांगितली. उमर कसा मेला, कुणीं मारला, रहिमान कसा नीचपणानें वागला, आपण कसे निघालों, काय काय केले, सर्व तिनें सांगितलें.

"एक अनाथ, अकिंचन, पतित विधवा म्हणून मी येथील एका घरदाज सुधारकाकडे गेलें. त्यानें माझें पूर्वचरित न विचारता मला कसा आश्रय दिला कळत नाही. मला चांगलें वागविले जातें. अभागिनीनें याहून जास्त काय मागावे? आपण कोण होतों हें न सांगता असे राहणें पाप आहे हे मला कळतें. नाहींतरी आजवर मी आणिक काय केले आहे?"

आणखी कांही दिवस गेले शाहुराव आणि माणिक कधीं बाजारात, कधीं घाटावर, कधीं कुठें भेटत, एकदोन शब्द बोलत, एकमेकांच्या सुखदुःखाची चौकशी करीत. पुन्हा कधीं कुठें भेटण्याचा संभव आहे हें सांगत आणि त्याप्रमाणें भेटतही.

पण त्यांना एका गोष्टीची कल्पना नव्हती. साधारण बरी दिसणारी ही तरुण विधवा कोण, कुणाची, काय, याची चौकशी हमखास करणारे कांही पुण्यात्मे त्या नंदिग्रामात होते. त्या घरदाज सुधारकाच्या येथें ती राहते हें कळताच ती कुठें जाते, काय करते, कशी वागते याबद्दल त्यांचे कुतूहल वाढीस लागलें आणि त्याचा परिणाम म्हणजे त्यानीं पाळत ठेवून ती वारवार एका शिखाला भेटते असा शोध लावला; त्या घरदाज सुधारकाला त्यानीं सांगि-तलें, आणि संधी साधून प्रत्यक्ष दाखविलें.

एके दिवशीं बाहेरून येतांच तिला घरमालकिणीनें विचारलें, "काय हो बाई, मठाच्या दारात भेटलेला शीख कोण?"

"कोण शीख? माझ्या ओळखीचे कुणी शीख इथें नाहींत"

"नाहीं कसं? चांगली दहा मिनिट तुम्ही त्याच्याशीं बोलत उभ्या होता!"

सर्वांनीं जगजग पछाडले पण आपण कुणा शीखांशी बोललो होतो कबूल करीना. तिच्या पोटात मात्र धस्स झालें आपल्यामुळें शाहूराव संकटांत येईल असें तिला वाटू लागलें. आपल्यावर नजर ठेवणाराचा डोळा चुकवून त्याला इषारा देऊन सावध कसे करावें या काळजीत ती पडली. अमुक वेळीं अमुक ठिकाणीं भेटेन असा सांगितलेला संकेत तिनें चुकविला, फाजील चौकसांना चकविलें पण शाहुरावला काळजींत टाकलें.

शाहूरावच्या काळजीला तसेंच एक सबळ कारण झालें. माणिकनें सांगितलेल्या हकीगतीवरून आणि वर्णनावरून कोजागिरीच्या दंग्यांत दिसलेले परकी अनोळखी पठाण हेच दादग्या आणि त्याचा दोस्त असले पाहिजेत असें त्यानें हेरलें होतें. एकदा दिवसा आणि एकदा रात्रीं अगदीं जवळून पाहिलें असल्यामुळें शाहूराव पुन्हा त्यांना ओळखूं शकला. तेच दोघे दोनतीन दिवसांपासून गांवांत फिरत होते. माणिक त्यांना दिसली तर ते तिच्यावर कदाचित् कांहीं प्रसंग आणतील असें त्याला वाटत होतें. म्हणून तो तिला भेटूं इच्छित होता, पण माणिकला भेटणें त्याला साधलें नाहीं. तो त्या पठाणाच्या पाळतीवर राहिला.

त्याच्या अपेक्षेप्रमाणे झालें. माणिकच्या आश्रयदात्याच्या घरापुढे आपापसांत मारामारी करून, त्यांच्या हस्तकांनीं गोंधळ करून दिला आणि त्या गडबडींत संधी साधून दादग्यानें तिला पळवून, तोंड बांधून एका पडदा लावलेल्या टांग्यांत घालून, गांवाबाहेर पाठवून दिलें. जें अत्याचाराचें कृत्य न केल्याबद्दल शाहूराव अज्ञातवासाची शिक्षा भोगीत होता तें त्यानें आतां केलें. गांवाबाहेर एका निवांत ठिकाणीं त्यानें त्या टांगेवाल्याला लोळविलें आणि माणिकची सुटका करून तिला घेऊन आडवाटेनें तो दूरवर निघून गेला.

कोठें जावें, काय करावें, हा या परागंदा युगलाला प्रश्नच होता. खेडोंपाडीं लपत छपत, झाडाखालीं, रानांत, ओढ्यावर, गुफांत, कपारींत असे त्यांनीं दिवस काढले. दोघांनीं एकत्र राहणें दोघांनाही सुरक्षित नाहीं असें नक्की झालें, तेव्हां माणिकनें श्रद्धानंद आश्रमांत जावें आणि शाहूरावानें दूर पंजाबांत निघून जावें असें त्यांनीं ठरविलें. इतका जिव्हाळा, इतकें प्रेम, इतका आपलेपणा त्यांनीं कधींच अनुभवला नसेल. एकमेकांना सोडून जातांना त्यांना आतोनात दुःख झालें.

शेवटीं-मारामारीचा खटला अपेक्षेबाहेर लवकर निकालांत निघाला. सेशन जज्जांनीं, आपणासमोरील भरभक्कम पुराव्यावरून सर्व हजर आरोपींना जन्मठेपेची शिक्षा दिली आणि दादासाहेबांना त्यांच्यावरील चिथावणीचा आरोप सिद्ध ठरवून, केवळ दहशत बसविण्यासाठीं म्हणून दोन वर्षांची सक्तमजुरी आणि दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. हायकोर्टांत

अपील होऊन तेथे जामीनअर्ज मंजूर होईपर्यंत पुन्हा काही दिवस दादासाहेबांना कारावास भोगावा लागेल असे ठरलें. सत्याग्रहाचा भर औरंगाबाद येथे जास्त आहे या सबबीवर त्यांना ताबडतोब हैदराबादेस चंचलगुडा जलमध्ये पाठविण्यात आले

पण हायकोर्टाने जामीनअर्ज मंजूर केला नाही सर्व फाइल्स आल्याच आहेत. विलंब न करता अपीलाचाच निकाल करू असें कारडे आश्वासन दिले. जामीनतीवर दादासाहेबांची सुटका होत नाही हे निश्चित झाल तेव्हा गणेशराव वकिलांना विद्येसाठी त्यांना भेटण्याची परवानगी मिळविली

पण प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वी त्यांना चांगले अडीच तास थांबावें लागलें. आशा, उत्कंठा, संताप, उद्वेग इत्यादि अनेक विकारांनीं भरलेल्या मनाने ती प्रतीक्षेचे तास कंठीत होती इतक्यात—

लॉरीमध्य भरून जेलमध्ये आणल्या जाणाऱ्या सत्याग्रह्यांच्या बॅचमध्यें तिनें वासुदेवाला पाहिलें तो सत्याग्रह्यांच्या गणवेषात होता. खालीं उतरताच सर्वांनीं गंभीर आवाजात " वंदेमातरम् " असा रणघोष केला, आणि घाईघाईनें शिपायांनी त्यांना आत नेलें विद्या नुसती पहातच राहिली.

काही वेळाने एका शिपायाने त्यांना आत बोलावून नेले. जेलच्या दुय्यम अधिकाऱ्याने तिला विचारलें, " तुमचा कोणी भाऊ सत्याग्रहाच्या चळवळीत पडला आहे काय ? "

" होय, काही वेळापूर्वी लॉरींतून आलेल्या बॅचमध्ये तो आहे." तिनें चाणाक्षपणे चटकन् उत्तर दिले. गणेशरावांना आश्चर्य वाटले, पण त्यांनी समजसपणानें तें चेहऱ्यावर दिसू दिलं नाही. " तो तुमच्याशीं दोन मिनिटे बोलू इच्छितो आणि मी स्पेशल केस म्हणून त्याला परवानगी दिली आहे." अधिकाऱ्यानें शिपायाला " वसंत आत्माराम शहाणेला घेऊन ये " असा हुकूम केला.

" तुमचें नाव काय ? " अधिकाऱ्याने सहज विचारलें.

" शारदा शहाणे."

या उत्तराने मात्र गणेशरावांना चांगलाच धक्का दिला, पण विद्येने त्यांना डोळ्यांनी इषारा केला— गणेशराव काय समजायचें ते समजले. पण या

बतावणीचा सपादणी शेवटपर्यंत कशी निभेल याची त्यांना नवीनच काळजी लागून राहिली वासुदेवाला आत आणण्यात आलें.–

"शेवटीं माझे शब्द अशा रीतीनें खरे केलेस ना?" त्याला पाहतांच तिनें म्हटलें.

"पण मीं आपलें वचन पाळल आहे तुझ्या नावाला उजळा येईल असेंच मीं केले."

"आणि हें खडतर जीवन– हाल, अपेक्षा, श्रम, अपमान..."

"वरात आत्माराम शहाणे या सत्याग्रह्याला फक्त सहा महिन्याची शिक्षा झाली आहे आणि हे अधिकारीही चागले सज्जन आहेत."

ते अगदीं जवळ जवळ उभे राहून बोलत होते एकदम विद्येनें त्याचा उजवा हात दोन्ही हातानीं धरला आणि त्यच्या उघड्या बाहूला आपल्या उरोभागानीं स्पर्श केला आणि म्हटलें, "साग, हें साहस का केलेस?"

"शारदा, हें तुला सागून कळायचें नाहीं."

"मला सर्व काही कळून चुकलें आहे"

"ज्याच्या मागे कांहीं पाश नाहीत त्यानींच कोणतीही चळवळ करायची असते."

"तू मला फसवलेंस. मी तुझी कुणीच नाहीं का?"

"तू माझें सर्व काही आहेस! इथून सुटल्यावर तरी—"

"होऽ! मी त्या दिवसाची अगदी आतुरतेनें वाट पहात बसेन."

असें म्हणून तिनें आपला गाल त्याच्या खाद्यावर टेकला क्षणभर, पुढें एक क्षणभरच– तिला कुरवाळावें अशी भावना त्याच्या बाहूंत उत्पन्न होण्यापूर्वीं ती दूर झाली आणि अधिकाऱ्याचे आभार मानून चटकन् गणेशरावाबरोबर ती बाहेर निघून गेली. बरोबरच्या शिपायाने वासुदेवच्या दुसऱ्या खाद्यावर हात ठेवला.

ऑफिसच्या बाहेर पडताच एवढा वेळ आवरून धरलेला दु:खावेग मुक्तबध होऊन ती हुदकून हुदकून रडू लागली. तिचा सयम सुटला. तिला आपलें रडे आवरेना. गणेशरावानीं तिचे सात्वन करण्याचा यत्न केला, पण तिच्या दुःखाचें कारण त्याच्या कल्पनेबाहेरचे होतें. बाध फुटलेलें तळें सगळें

वाहून गेल्याशिवाय थांबत नाहीं तसें तिच्या दुःखानें केलें. मनसोक्त अश्रू सिंचन करून ती शांत होण्यापूर्वी मुख्य अधिकाऱ्याच्या खोलींत दादासाहेबांना भेटण्यासाठीं बोलावल्याची वर्दी आली. आपले अश्रु न पुसताच ती गेली. बापाला कडकडून भेटली. आणखी खळखळ अश्रु वाहिले. तेथें असलेल्या सर्वांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या. दादासाहेब तिला म्हणाले:—

"ताई, तू आपल्या आईचें वचन विसरलीस का? ती काय म्हणत असे? घरंदाज माणसांनीं आपल्या भावनांचा आवेग इतरांना दिसू देऊं नये."

त्यांनीं तिला परोपरीनें धीर दिला, पण त्यांच्या त्या गंभीर भाषेमागें अत्यंत खोल खळबळ आहे हे तिला कळून चुकलें.

जेलमध्यें त्यांनी प्रथम वासुदेवाला पाहिलें, तेव्हां ते एकदम अभावितपणें म्हणणार होते, "कोण वासु —"

पण इतक्यांत वासुदेवनें खूण केलेली त्यांच्या लक्षांत आली आणि त्यांनेंहि चटकन् म्हटलें.— "होय, मी वसंत ब्राह्मणे."

सायंकाळीं ओढ्यावर स्नान करतांना त्यांना स्वस्थपणें एकमेकांशीं बोलायला मिळालें. वडिलांना त्रास होऊं नये म्हणून नांव बदलून आपण सत्याग्रह केला असें वासुदेवनें सांगितलें. जेलमध्ये तो एखाद्या भारलेल्या माणसासारखा वागत होता. कसली तरी गोड स्मृति त्याला नेहमीं प्रसन्न ठेवी. तो उग्मा, तें जाडेंभरडें अन्न, ती सवय नसलेली अंगमेहनत, तें गलिच्छ कुसंस्कृत वातावरण, यांनीं त्याच्या शरीरावर भरपूर परिणाम झाला; पण मनावर कांहींच झाला नाहीं. "राजकन्येच्या रतिलीलाच फक्त मला स्मरतात, दुसरें कांही स्मरत नाहीं." असे मृत्युमुखांत उभा राहून सांगणाऱ्या बिल्हणाचें मन त्याच्याकडे पाहून कुणालाही कळलें असतें.

कांहीं दिवस गेले हरिप्रकाश नांवाच्या दुसऱ्या एका तरुण आर्य सत्याग्रह्याशीं त्याचें सख्यही झालें; पण या बळजबरीच्या एकांतवासांत आपल्या मनावर परिणाम करून राहिलेल्या, आपल्याला सतत कैफांत ठेवणाऱ्या या मोहिनीचें रहस्य कुणाजवळ तरी सांगितल्याशिवाय राहणें त्याला अशक्य झालें हा कैफ, ही वारुणी त्याला त्या इहलोकांतील यमलोकाच्या सर्व यातना विसरायला लावीत होती. दुःखापासून सुखाची संवेदना देत होती.

रतनसिंग नावाचा एक रजपूत जन्मठेपेचा कैदी त्याच्या सहवासात येऊन त्याच्यावर भक्ति करू लागला. प्रतिवादीने पैशाच्या जोरावर सगळे निकाल आपणासारखे करून घेतल्यामुळे, चिडून त्यानें न्याय व अमलबजावणी स्वत:-च्या हातीं घेतली आणि त्याचे प्रायश्चित् त्यानें बारा वर्षे निमूटपणे भोगल होते. आणि हे सुखवस्तु तरुण उमेदीचे लोक केवळ लौकिकासाठी कोणताही गुन्हा न करता जेलमध्ये येतात हे काय आहे हे न कळल्यामुळे, तो आदरानें भरून जाऊन आपल्या जेलमधील दीर्घ अनुभवाचा फायदा त्याला देत असे. तो नको नको म्हणत असतांही अन्यायाचा विषय झालेल्या काहीं कैद्यांचा कैवार घेऊन वासुदेव आणि हरिप्रकाश यानी एका वॉर्डरशी भांडण केले हा पूर्वी दरवडेखोर होता, नंतर मुसलमान झाला आणि नंतर वॉर्डर झाला त्यानें संधि साधून दोघानाही फटक्याची शिक्षा देवविली हरिप्रकाशला काही विशेष झाले नाहीं पण वासुदेव चांगला आजारी पडला. आजारीपणात रतन-सिंगने त्याच्यासाठीं फार मेहनत घेतली. मिळेल तितका सर्व वेळ त्याने त्याच्या शुश्रूषत घालविला

दिवसा, रात्रीं, कामाच्या आणि विश्रांतीच्या वेळीं वासुदेव कशाचे तरी सारखें चिंतन करी. हातातला घाम हातात राही, धोटा, चक्की अथवा घाणी-वरचा हात जेथल्या तेथें राही आणि त्याला स्वत:चा विसर पडे कोठडीच्या गजांमधून तो शून्य दृष्टीने बाहेर आकाशाकडे पाहू लागला म्हणजे दादा-साहेब त्याला म्हणत :—

"का? कसल चिंतन चाललय् ?"

दादासाहेब हे फार मोठे श्रीमंत इनामदार आहेत आणि दुर्दैवविलसितानें तुरुंगांत आले आहेत. ही गोष्ट लौकरच सर्वांना कळून चुकली त्याना चांगलें वागविण्यात लाभ आहे हें त्या त्या लोकाना चटकन् उमजून आले. कामाची सक्ति त्याना होईनाशी झाली. शक्य तितक्या सुखसोई आणि सवलती मिळू लागल्या तरीही ते खगले, दिवसेंदिवस क्षीण होत चालले. पण ते वासुदेवाला वारंवार धीर देत :— सारखा विचार करीत बसणें, कुढणें, मनाला लावून घेणें हे ठीक नाही. अशाने निभाव लागणार नाहीं. मजकडे पहा, आपण आपले मन खंबीर केले पाहिजे."

शेवटीं वासुदेवनें त्यांच्याजवळ कबूल केलें कीं, आपण एका असाधारण कुमारिकेच्या प्रेमाने वेडे झालों आहोत व तिच्याच स्मृतींत आपण दंग आहोंत झाले, धरणाचा बांध फुटला. दादासाहेबांइतकें विश्वासाचें स्थान तेथें दुसरें कुठलें ?

"ती चाफ्यासारखी गोरी आहे, चंदनासारखी गंधवती आहे, एकाच स्पर्शानें तिनें आपलें सारें हृदगत सांगितलें एकाच शब्दानें तिनें आपल्याला कायमचें वेडे केले.

"एखादी घोकून पाठ केलेली कविता आठवावी पण तोंडात येऊ नये तशी ती आपल्या स्मृतींत भरून राहिली आहे तिनेंच कोजागिरीच्या दिवशीं तार करून आपल्याला स्टेशनवर बोलाविले आणि अवश करून, मंत्रमुग्ध करून मुंबईला नेलें. तिनेंच प्रेम केल आणि प्रेमवेडे केले. तिनेंच हें खोटें नांव दिले आणि ही गोड गोड आठवण दिली, आणि आतुरतेने वाट पाहीन असें वचनही दिलें."

दादासाहेब या तरुणाच्या भावनेच्या प्रवाहात क्षणभर तरुण होत, पण शेवतीच्या खटल्यात हा आपल्याबरोबरच आरोपी आहे. आपल्या भाकिता-बरोबरच याचें भाकीत बांधलेलें आहे याची स्मृति झाली म्हणजे ते दुःखानें दंग होत व म्हणत :—

"चाफ्यासारखी गोरी
चंदनासारखी गंधवती
वारुणीसारखी मादक
आणि वेदना विसरविणारी !"

## : : : : : प्रकरण १० वें

दादासाहेबांचे अपील आज निघेल चार दिवसांनीं निघेल असे होत गणेशराव वकिलांना विद्येसह महिनोमहिने हैदराबादेस रहावें लागलें. दोन

तारखांच्या मधल्या वेळात ते औरंगाबादेस आपल्या स्वतःच्या कामासाठीं जात. दादासाहेबासाठीं गणेशराव काय करणार नाहींत ? ते त्याचे समवयस्क बालमित्र तर होतेच, पण त्यांचा स्वभावच असा उपकारी, बाणेदार आणि धीरगंभीर कीं, त्यानी तुरुंगात भेटलेल्या सत्याग्रही तरुणासंबधीं विद्येला एका अक्षरानें आपण होऊन विचारलें नाहीं. हैदराबादेस विद्या गणेशरावाचे एक स्नेही डॉक्टर जोशी यांच्याकडे राहिली.

लवकरच विद्येला दिसून आलें कीं, गणेशरावानी सांगावें आणि इतरांनी ऐकावें असा अलिखित नियमच होऊन बसला आहे. त्यांची प्रेमळ आज्ञा कोणीहि नाकारीत नसे. दुसऱ्याच्या मनाचा पूर्ण विचार केल्याखेरीज ते कधी कुणाला कांहीं सांगत नसत. मिसेस् जोशी तर एखाद्या आज्ञाधारक सुनेप्रमाणे त्यांच्याशी वागे. एवढी बडखोर विद्या, पण त्यांच्या म्हणण्याप्रमाणें वागू नये असें तिला कधींहि वाटलें नाहीं म्हणूनच ती त्यानीं सांगताच डॉक्टर जोशी यांच्याकडे राहिली, आणि मिसेस् जोशींनीहि आपल्या प्रेमळ वागणुकीनें तिला कधी परकेपणा असा भास दिला नाही.

गणेशराव वकील स्वत. "मालच्या" कामांत विशेष अनुभवी आणि धर्म शास्त्रांत विशेष पारंगत म्हणून नावाजलेले. पण दादासाहेबाच्या अपिलात त्यांनीं एका मोठ्या ॲडव्होकेटला उभे केले. नामांकित डॉक्टरदेखील स्वतःच्या आजारीपणात आपल्या औषधयोजनेवर विश्वास ठेवीत नाहींत.

एके दिवशीं सायंकाळीं विद्या डॉक्टरांच्या गच्चीवर फिरत असताना त्यांच्या बंगल्याच्या फाटकात तिने पुष्पेला शिरताना पाहिलें. विद्या धावतच खाली आली आणि कुणी कुणाला मिठी मारली हें सांगणे फार कठीण आहे.

"बर झाल अचानक भेटलीस ! कुणीकडे आली होतीस ?" विद्या म्हणाली.

"अचानक नाहीं, मी मुद्दाम तुझ्याकडेच आलें होते."

"मी येथें आहे म्हणून कस कळल ?"

"कस आणि काय ? तुला बालमैत्रिणीची गरज नसली, तरी तिला आहे ना ?"

"असें म्हणू नको पुष्पा! मी तुझ्यासाठी मुंबईला गेलें होतें ना!"

"आणि मला शोधत फिरून तिथले रस्ते शिणवू नका" असे लिहि-णारी तूच ना?"

"बर, पण वर चल. मला तुझ्याशीं किती किती बोलायचंय"

गच्चीवर वाळयाच्या सरबताची बाटली, गार पाण्याची सुरई, आणि काचेचे ग्लास पुढ्यात घेऊन त्या दोन मैत्रिणी किती तरी वेळ बोलत बसल्या.

"अमाबाईच्या येथे कॅपनियन म्हणून राहिलेली मुलगी तू नव्हेस असे अजून म्हणायचें आहे काय?"

"नाही"

"मग तुझा पत्ता कळताच मी दादासाहेबांना येथें आणले, पण तू मात्र तसे पत्र लिहिलेंस – तुझ्या लबाड पत्रानें मी फसेन असे तुला वाटले!"

"मी अजूनहि अज्ञातवासात राहू इच्छित होते?"

"विद्येसारखी दिसणारी ती मुलगी विद्याच होती हे कळायला मला वेळ लागला नाहीं"

"कसें?"

"तू लगेच अमाबाईला पत्र लिहिलें नाहींस का कीं परिस्थितीत अचानक बदल झाल्यामुळे मला नौकरीवर येता येत नाही? मी अमाबाईकडे तुझा पत्ता विचारायला गेले तेव्हा त्यांनी ते पत्र मला दाखविले. त्या वेळीं त्यांना कल्पना नव्हती मी त्यांच्या प्रतिवाद्याची बायको आहे. दोन्ही पत्रें एकाच हस्ताक्षरातलीं!"

"अय्या, खरंच कीं!"

आणि मग विद्येनें तिला आपल्या गृहत्यागाची आणि अज्ञातवासाची सगळी हकीगत सांगितली; पण वासुदेवचा उल्लेख मात्र कुठेही होऊ दिला नाहीं शेवतीच्या प्रकरणाची आणि दादासाहेबांच्या तुरुगवासाची हकीकत पुष्पेला आधींच माहित होती.

"ही अशी तुझ्या श्रीमंत जमीनदार मैत्रिणीची कहाणी आहे." विद्या शेवटीं म्हणाली. या शेवटच्या वाक्यानं पुष्पाच्या डोळ्यांत पाणी आलें, ती

म्हणाली, "या मृगजळानें मी फार वाईट रीतीनें फसले ग ऽ ऽ !–जमीनदारी श्रीमती, देशमुखी, जहागीर या भपक नावाची माझ्या बाबाच्या मनावर जबर मोहिनी पडलेली त्यानें माझें मात्र मातेरं झालें !"

हिरेमठ सावकारानीं कल्याणरावाला कांही रुपये हातउसने दिले होते ते त्यानें मुंबईला आल्यावेळीं साभार सव्याज परत दिले ते पुष्पेच्या जवळ दिलें त्यावेळचा त्याचा रुबाब खरोखर और होता. पुष्पेच्या मनावर त्याचा फार परिणाम झाला

हिरेमठ सावकारानीं जेव्हा चौकशी केली तेव्हा त्याना समजलें कीं, तो उमापतिपूरच्या देशमुखाच्या भाऊबंदापैकीं आहे आणि देशमुखाच्या मागें तोच इस्टेटीचा वारस ठरण्याचा संभव आहे. अर्थात् त्याच्या व पुष्पेच्या परिचयाला उत्तेजन देण्यात आलें. मुंबईला असताना बहुतेक वेळ त्यानें पुष्पेच्या मनोरंजनार्थ खर्च केला आणि पुष्कळ पैसाही ! त्यातला कांहीं असेच्या खर्चात खोटे हिशेब दाखवून वाचविलेला म्हणजे मिळविलेला होता. आणि बाकीचा देशमुख साहेबाच्या मेहरबानीच्या तारणावर खुद्द हिरेमठ सावकराकडूनच कर्ज काढलेला होता. मुंबईहून कल्याणराव जाण्यापूर्वी उभयताच्या प्रेमाचें आणाशपथान रूपातर झालेले होते

उन्हाळ्याच्या सुट्टीसाठीं आलेली पुष्पा अजून शहापूरलाच होती, तेव्हां एके दिवशीं कल्याणराव अचानक येऊन पोचले आणि सागू लागले कीं, "मजवर प्रेम करणारे देशमुखसाहेब इहलोक सोडून गेले आणि त्याच्या सुनेनें आपल्या श्रीमंत आणि कायदेपंडित वडिलाच्या साहाय्यानें सर्व इस्टेटीचा ताबा घेतला आणि मला हाकून दिलें आता मला कोर्टदरबार करूनच आपला हक्क सिद्ध केला पाहिजे देशमुखानीं विश्वासानें दिलेले कांहीं कागदपत्र एवढेंच आज माझें भाडवल. पैशाच्या अभावीं मी लाचार आणि कंगाल झालों आहे. तारुण्यामुळें, प्रेमामुळे, अविचारानें तुला शपथप्रमाण देण्याचा प्रमाद मीं केलेला आहे. मला क्षमा कर मी तुला फसवू इच्छित नाहीं. हवेतर आहे ही परिस्थिती जाणून मला आपला म्हण, मी तुझा आहे.

हिरेमठ सावकारानीं त्याचे कागदपत्र पाहिले. शोध, चौकशी, विचारपूस केली. कायदेपंडिताना विचारलें आणि इस्टेटीच्या भाडणासाठीं कल्याणरावला

पैसा पुरविण्याचे ठरविले हे भाडण अपेक्षेबाहेर लांबले आणि पैसाही कल्पनेबाहेर गेला. पुष्पेचे मन अजूनही दुडोलच होते तिला पहिल्यानें वाटलेलें आकर्षण आज राहिले नव्हतें, पण तिची वडीलधारी मंडळी म्हणू लागली तू लग्न असे लांबणीवर टाकतेस खरे पण कल्याणरावच खटल्याचा निकाल लागून इस्टेट हाती येताच बदलला आणि सावकाराचे पैसे सव्याज देऊन मोकळा झाला तर मग? कल्याणराव म्हणू लागला "तुझे जर माझ्यावर प्रेमच नाही केवळ इस्टेटीवरच आहे, तर मला आशेला तरी का गुतवतेस?" आणि तिसरे कुणीतरी नव्हे काहीं तरी तिला म्हणत होते "सुखविषयाच्या अभिमुख होऊन मनुष्य फार वेळ दूर राहू शकत नाही. मॅग्नेटच्या कक्षेतील टाचणीला तिकडे वेगानें जावेंच लागते

दसऱ्याच्या दुसरे दिवशी त्यांचे लग्न रजिष्टर झाले आणि पुष्पेनें हैदराबादेस येऊन घर केले हा घरखर्च आणि कर्जाचा खर्च हिरेमठ सावकाराच्या डोक्यावरून गेला रोकड गेली जंगम वस्तुजात गेली, कर्जाचा बुजबुजाट झाला आणि स्थावर मिळकतही विकण्याचा विचार होऊ लागला तव्हा पुष्पेला राहवले नाही. तिने वडिलांना निक्षून सांगितले, "माझ्या नशिबाचे काहीही होवो, तुम्ही आपली हरळीची मुळी उपटू नका."

शेवटी जें व्हायचे तेच झाले. इनाम कोर्टाच्या वरिष्ठ बेंचाचा निकाल कल्याणरावाविरुद्ध झाला, सबंध इमारत कोसळली गणेशराव वकील मालन्या कामात कसलेले गुरुजी, त्यांना विद्येच्या तर्फे सर्व कागदपत्र दाखवून काही होऊ शकते का पहावें यासाठी पुष्पा आदरून आली होती.

विद्येच्या व्यथित अंतःकरणाने मूक अश्रुपात केला.

"कल्याणराव तरी तुला प्रेमाने वागवतात का?" "त्यांनी वागवण्याचा प्रश्नच नाही मीच त्यांना आज कसे वागवते हें भय त्यांना पडलें आहे. आयुष्याचा खेळ त्यांच्या इतका अंगावर आला आहे की, या आर्यपतिव्रतेने त्यांना सावरले नाहीं तर कठीण आहे यशस्वी जीवनात ते कदाचित् बेजबाबदारपणें वागलेही असते. भरवशाच ते गृहस्थ नाहीत; पण तुला आपलें सांगतें सहवासाचा कैफ म्हणूनही काही असतोच. मी कशीही वागले तरी ते मजपासून दूर राहू शकत नाहीत."

दुसरे दिवशीं गणेशरावांनीं तिचे कागदपत्र, साक्षीपुरावा व निकाल पाहिले आणि यशाची काहीं आशा नाही असें आपलें मत दिले तें ऐकून मात्र पुष्पेनें अनिर्बंध अश्रुसिंचन केले आणि विद्येलाही करायला लावलें.

जमीनदारी, वतनदारी, इनामदारी, जहागीरदारी हे दुरून साजरे दिसणारे डोंगर त्या दोघींना अगदी जवळून फारच भयानक दिसत होते यातील ज्या संपत्तीच्या मृगजळामागें आपण धावतों ती कोणत्या मार्गानें आली, कोणत्या दिशेने वाहते, याचा कटू अनुभव विद्येला आलेलाच होता. राजनिष्ठादर्शक वर्गण्या, नजरनजराणे सत्तीच्या खुर्चीच्या देणग्या, त्याच खाणारे अधिकारी, नात्यांच्या वशील्यानें कामें करणारे पैलकार, वतनदाराच्या संपत्तीची वाहतूक एका विशिष्ट दिशेनें करणाऱ्या या सर्व शक्ती, एकाच राक्षसी यंत्राच्या घटक आहेत श्रीमतीच्या आमिषामागे धावणारे सर्व मासे या गळाला लागून आपल्या अंगातील सर्व चरबी घालवून बसतात. याच चरबीवर तें राक्षसी यंत्र चालतें, वंगण पावतें आणि अनेकांना चिरडायला, पिळायला कारण होते असे तिनें बोलून दाखविले.

पुष्पा आपल्या पराभवानें फारच हताश झाली होती. ती कडवटपणे म्हणाली, " या आंधळ्या कोशिंबिरीत बाहेरील गडणीही कवटाळल्या जातात ठेचाळतात, रक्तबंबाळ होतात हें अजब नव्हे का ? "

" असं तर खरच ! सुरुंग लागले आहेत, सावध म्हणून कुणीतरी ओरडायला पाहिजे ना ? नाहीतर जवळपास गाफीलपणे राहिलेल्या लोकांच्या डोक्यात हे असे दगड पडतात."

थोडा वेळ दोघीही काहींच बोलल्या नाहींत.

" विद्या, मी उद्या मुंबईला मामाकडे जातें."

" का ग ? "

" मग काय तर ! ते जाणे आणि त्याचे ऋणकरी जाणे ! "

" पुष्पा, तू आपल्या पतीला सोडतेस ? "

" नाही, ते कसेही असले तरी माझें त्याच्यावर प्रेम आहे. नसें नसतें तर मी लग्नच केलें नसते."

" मी आपल्या स्वतःच्या परिस्थितीनें अशी दुबळी झालें आहे ग ! नाही तर मी तुला काहीतरी—"

" विद्या, गरिबीला मी भीत नाहीं ग ! पण मला कोणत्या अपराधाचें हें प्रायश्चित्त मिळतें आहे ? "

" अज्ञान, गाफिलपणा, आणि गोडपणा ! तुझ्याइतकी गोड मुलगी कधीतरी सुखी झालेली आहे का ? "

"चल, काहीतरी बोलू नकोस "

पुष्पेचा अनुभव विद्येला स्वतःला घडलेल्या अद्दलीप्रमाणे लागून राहिला.

दोनतीन दिवसांनी विद्या अशीच बाहेरून फिरून जरा उशीरानें आली. घरातील सर्व मडळी बाहेर जाण्याच्या तयारींत होती. मिसेस जोशी तिला म्हणाल्या, " विद्याताई, चला लवकर कपडे बदला, आज आपल्याला मेजवानीला जायचंय "

"कुठं काय" या प्रश्नाला उत्तर न देता त्या म्हणाल्या, "डॉक्टराचे एक स्नेही आहेत. आम्ही सर्वांनीं मिळून तुमचें आमंत्रण स्वीकारलें आहे." विद्येनें गणेशरावकडे वळून म्हटलें,

"पण मीही आलंच पाहिजे का ?"

"ते माझे जुने स्नेही आहेत आणि त्यांनीं फार फार आग्रहानें सांगितलें आहे."

विद्या यावर काही न बोलता आपल्या खोलींत गेली आणि दहा मिनिटांनी कपडे बदलून परत आली.

मोटार रंगराव देवगिरीकराच्या फाटकांत शिरतांच तिला कळून आलें आपण कुठें जाणार तें पण उडी टाकून पळून तर जायचें नाही ? व्हराड्यांतच रंगराव होते एवढेंच नव्हे असाहि होती. तिनें झटकन् पुढें होऊन विद्येचा हात धरला आणि म्हटलें,

"ओहो शारदाबाई, आम्हाला चकित करायचं ठरवले होत वाटत ? कशा वेळेवर आलात अगदी !"

"आपल्या माणसांमध्ये दुःखाप्रमाणे आनंदही दुणावतो." रंगराव म्हणाले.

“अहो शारदाबाई, आत चलायच म्हटलें!” गणेशराव आपल्या उतार वयाला न साजेशा मिस्किलपणें म्हणाले. बरें झालें डॉक्टर व मिसेस जोशी यानीं ऐकलें नाहीं. गाडींतून उतरताच दोघाच्या ओळखीच्या एका विदुषीशी बोलत ते उभे होते.

मुलीच्या देशमुखीच्या प्रकरणात यश मिळाल्याबद्दल देवगिरीकरानीं ही पार्टी आपल्या इष्टमित्राना दिली होती. असेने तिला आत नेले आणि म्हटले, “काहो? आम्हाला अशा अचानक सोडून गेला? का गेला? कशा गेला? अन् शिवाय आपला पत्ताही दिला नाही. काय समजायचं माणसानीं? मला वाटलं तुम्ही लग्न करूनच गेलात”

“तुमचा तर्क काही चुकला नाही”

“हो ना? मला वाटलच!”

“विद्या हे माझ सासरच नाव”

“तरीच तुम्हाला शोधायला आलेली मैत्रिण हे तुमच नाव सागत होती.”

“भेटली—बावळट आहे. पत्ता विसरली होती दुसरें काय?”

“पण तिची ही बतावणी फारशी यशस्वी झाली नाही. जेवण झाल्यावर असेने गणेशरावाना सांगितलें की, याची आमची पूर्वीची जानपछान आहे. आता लग्न झाल्यावर जरी याचे नाव विद्याताई ठेवलेले असले तरी आम्ही याना माहेरच्याच शारदाबाई नावाने ओळखतो” आणि हे एकून गणेशराव खोखो हसू लागले. विद्या पण पहाण्यासारखी झाली. आपण का हसलो हे मात्र त्यानीं मुळीच सांगितले नाही. ते म्हणाले, “म्हातारपणीं माणसाला असें एखादेवेळी उगीच अकारण हसायला होत झालं.”

“गणेशरावजींचा आणि बाबाचा फार जुना स्नेह आहे” असेनें विद्येला सांगितलें. “त्यांच्या एका स्नेह्याची मुलगी त्याच्याबरोबर आहे. तिलाही मी अतिशय आग्रहानें बोलावलें आहे. एवढेंच बाबानी मला सांगितले; पण ती मुलगी तुम्ही असाल अशी मला मुळीच कल्पना नव्हती”

आपल्या वडिलासबधीं जास्त चौकशी नको म्हणून गणेशराव आपले मामेसासरेही आहेत असे विद्येने सागून टाकले होतें तेंही तिच्या अगलटच आलें. असेने गणेशरावाना म्हटले. “का सुनबाई, किती दिवस राहणार आहेत?”

सुनबाई गोरीमोरी झाली, पण गणेशराव सस्मित म्हणाले "राहीलना, काही दिवस? न रहायला काय झालं? हो ना सुनबाई?"

कधी एकदा समारंभ संपतो आणि आपण घरी जातों असे विद्येला झालें होते इतके नकोसे तिला यापूर्वी कधींही झाले नसेल. जाताना मिसेस् जोशी असेला म्हणाल्या, "विद्याताई असेतो एकदा चहाला आलें पाहिजे ह् ऽऽऽ नाही म्हणायचं नाही."

"पण विद्याताई आमच्याकडेच चार दिवस रहायला येणार आहेत. होय ना हो?"

परत यायला रात्री बराच उशीर झाला होता विद्या तडक जाऊन बिछान्यावर पडली आणि विचार करू लागली: -

"एकूण अशा देशमुखीण कुलमुखत्यार झाली श्रीमंत झाली. पैपैशाला आसावलेलीं आशाळभुते तिच्याभोंवती नाचतील. लोकांच्या मनोदास्याला, दौर्बल्याला ती कारण होईल, भलत्याच्या तुमड्या भरील, भलत्याला सहाय करील, भलत्याची मिश्री राहील"

मध्यरात्र झाली होती, चांदणें पिठासारखें पडले होते. दादासाहेब आणि वासुदेव आपल्या श्रमजीवनानें थकून गाढ झोंपले होते. विद्या मिष्टान्नानें तडीस लागून आपल्या मऊ बिछान्यावर तळमळत होती.

---

## : : : : : प्रकरण ११ वें

---

दुसरे दिवशीं जागरणानें मलूल झालेल्या विद्येला गणेशराव म्हणाले, "का सुनबाई, बरं वाटत नाहीं का?"

विद्येच्या सोन्यासारख्या गोऱ्यापान गालावरून मोत्यासारखे अश्रु ओघळू लागले. गणेशराव लगेच म्हणाले, "विद्या वेडे पोरी, मी चेष्टेनें नाहीं बोलत"

अश्रूंचा ओसरलेला सर ओंजळीनें येचण्यासाठीं तिनें आपलें तोंड दोन्ही हातानी झाकून घेतलं.

खरच, तुझ्या त्या तरुण बाणेदार वसत आत्माराम शहाणेला मी आपला भाचा मानला आहे.

घसरलेल्या साक्षीदारावर एकदम कमा भडीमार करावा हे त्यांना रोजचेच होते. विद्येला त्यांचा फार राग आला – आणि लोभही आला – विश्वास कृतज्ञता आदर सर्व काहीं वाटले. कारण गणेशरावांनी गुलकावून गुलकावून तिला बोलती केली.

" पण काग ताई, मला मामेसासरा करण्याचे कुठून सुचले तुला ! "

काय उत्तर द्यावें हे न सुचून विद्या चुटमळली

"तुला सागायचं नसले तर नको सागूस बर का ? मी कुणाच्याही खासगी बाबी विचारू इच्छित नाहीं – पण तुझा माझ्यावर विश्वास आहेना."

" अस कस म्हणता ? "

" मग मला तूं आपल सागायसारख जेवढ गुपित आहे तेवढ सांगून टाक बर. "

" गुपित असं नाहींच मुळी. "

" तू काही लोकांना आपले नाव शारदा शहाणे सांगितले आहेस एवढच मला माहित आहे. "

" मग काय अज्ञातवासात खर नाव सांगायच होत ? "

आणि जबानी, उलट तपासणी, फेर तपासणी असे करीत त्यांनी विद्येला आपली सारी हकीकत सागायला लावली.

"ते वसत शहाणेबद्दल मी सर्व काहीं हेरले आहे. तुला लाज वाटत असली तर सांगू नकोस ह ऽ – पण तो कोण, कुठला, काय हे मात्र मला कळल पाहिजे नाहीं का ? " अशा थाटाचें त्याचें बोलणे.

हा वसत शहाणे कोण काय, त्याची आपली भेट कशी झाली, आपले त्यावर किती प्रेम आहे, सर्व काहीं विद्या कळत न कळत सागून गेली आणि मग म्हणू लागली–"माझ मन तुम्ही जाणले आहे, मला सुखी किंवा दुःखी करण सर्वस्वी तुमच्या हातात आहे."

"ताई, तूं काहीं काळजी करू नकोस. तुला नाहीं तरी आपल्या भाचाला सुखी करण हें त्याच्या अज्ञात मामाच आद्य कर्तव्य आहे."

"खरच तुम्ही किती वाईट आहा!"

"पण तो तरी तिनका चागला आहे ना? नाहीतर..."

"जा, मी काहीं बोलतच नाही."

या आश्वासनानें विद्येला हवे होतें ते धैर्य आणले आणि गणेशराव कामानिमित्त औरंगाबादेस गेले असतांना ती खुशाल असेकडे तिच्या आग्रहास्तव जाऊन राहिली. वाळ्याचे पडदे, विजेचे पख, बर्फाचे ढीग, शीत पेयें याच्या सुखोपभोगात दादासाहेब आणि वासुदेव याच्या खडतर कालक्रमणाचें अहर्निश चिंतन करीत राहिली "डोळ्यात अश्रू, गालावर हसू" अशी वागली. आपले दुर्दिन थोडे उरले आहेत. वरिष्ठ कोर्टात दादासाहेबाना न्याय मिळेल. चळवळीच्या वाढत्या गतीमुळे तिला यश येईल व राजकीय कैदी सुटतील अशी तिला आपली आशा वाटू लागली.

उन्हाळ्यानिमित्त असा बगळूरला निघून गेली आणि नतरचे पधरावीस दिवस विद्येला कमालीचे कटाळवाण गेले. तिला आणखी एकदा दादासाहेबाना भेटण्याची सधी मिळाली त्याची खालावलेली प्रकृती, उतरलेला चेहरा, खाल गेलेला आवाज, काळवडलेली मुद्रा व तळावलेले डोळे पाहून तिला कसेसेच झाले, काळजात धडधडू लागले. "मन चिंती ते वैरी न चिंती" असें होत राहिलें.

वासुदेवच्या नुसत्या दर्शनाची तरी तिला अभिलाषा होती, पण ते झालें नाही. तिने अप्रत्यक्षपणें वडिलाजवळ सत्याग्रही लोकाची चौकशी केली, पण तो उल्लेखच झाला नाही. विद्येचे मन कुठेंतरी गुतले आहे याची लवमात्र कल्पना दादासाहेबाना नव्हती. ते कटाच्या खटल्यातील आरोपीचा उल्लेख अकारण का करतील? कमळाच्या पानाआड गेलेल्या चक्रवाकीप्रमाणें तिला झालें.

सरकारी वकिलाला वेळ नाहीं या सबबीवर अपिलाची सुनावणी सारखी लाबणीवर पडत चालली होती. पुन्हा गणेशरावानीं अर्ज दिला कीं सुनावणी लौकर होणें शक्य नसले, तर आरोपीला जामिनावर सोडावें. कारण त्याची प्रकृति खालावली आहे. शेवटीं एकदाचा खटला सुनावणीला निघाला. काही दिवस चालला आणि न्यायमूर्तीनी दादासाहेबाचा गुन्हा साबीत धरून भोगली इतकी शिक्षा पुरे झाली असे म्हणून त्याना सोडून दिलें.

दादासाहेबांच्या सुटकेने सर्वांना आनंद झाला, पण त्यांना स्वतःला झाला नाहीं. त्यांचे दोन इमानी नौकर शंभु सुभाना कायमचे माणुसकीला मुकले होते. हे दोन निरपराधी जन्माचे बंदी झालेले जीव कुणाला शापत असतील हाच चटका त्यांच्या जिवाला लागून राहिला.

परत शेवतीला जाणे दादासाहेबांना अशक्य आणि अनिष्ट आहे असें त्यांच्या हितचिंतकांनीं समजाविलें. कारण तेथें अजूनहि कलीचेच प्राबल्य होते आणि तो काय प्रसंग आणील याचा नेम नव्हता. दादासाहेबांनी ही सूचना न मानता, शेवतीलाच जायचें ठरविले, पण विद्या त्यांना हळूच म्हणाली, " कशाल विद्याची परीक्षा पाहता बाबा ? काय होत काही दिवस इथं घर करून राहिल तर ? "

आपल्या सुशिक्षित आणि समजस कन्येचें म्हणणें म्हणूनच त्यांनी ते मानले व म्हटले, " आपण जीवनाच्या समराला भ्यालो असं होईल बर का ताई ? "

इथे रहावें म्हणण्यात तिचे दुसरे काही अंतस्थ हेतू असतील हे त्यांना काय माहीत ? पण ती शेवतीची अजस्र दारें आणि चिरेबंदी बुरूज असलेली देवडी मात्र तशीच वाट पहात राहिली.

विद्येने गणेशरावांनाही काहीं दिवस आग्रहानें आपल्याजवळ ठेऊन घेतले. "तुमचें इथले काम अजून झालच नाही" असे त्यांना बजावलें. गणेशरावही मग तिचा आशय लक्षात घऊन विशेष आढेवेढे न घेता राहिले.

गणेशरावचे राहणें तिला एखाद्या देवदूताच्या राहण्यासारखें वाटलें. त्यांनी योग्य वेळी योग्य रीतीनें सर्व काहीं दादासाहेबांच्या कानावर घातले. विद्येला एक अक्षरही बोलावें लागलें नाहीं. वसंत शहाणेची चाफ्यासारखी गोरी प्रियतमा म्हणजेच आपली विद्या हें ऐकून दादासाहेबांना जितकें आश्चर्य वाटले तितकेंच वसंत शहाणे म्हणजेच वासुदेव वाजपेयी असें ऐकून गणेश-रावांना वाटलें आणि वाईटही वाटले शिक्षेचें भवितव्य वासुदेवच्या डोक्यावर सतत लटकत होते. दादासाहेब एकदा शिक्षा भोगून आलेले होते, शिवाय वासु-देवच्या गुणाची त्यांना चागली पारख होती. आपल्या निवडीने दादासाहेब नाराज नाहीत हे ऐकुन, विद्येला मोठाच आनद झाला. तिला सुखस्वप्नं पडू लागली.

एकदम सत्याग्रह स्थगित झाला आणि राजकीय कैदी भराभर सुटू लागले. विद्येने गणेशरावाला आणखी एकदा तुरुंगाच्या दारात पाठविले. गणेशरावांनीं वसत शहाणे कधीं सुटणार याचा शोध घेतला. तो सुटताच त्याला मोटारीत घातलें आणि सांगितलें :—

"मी तुमचा मामा आहे"

"आ ! मामा ? मला कुणी मामा नाही."

वासुदेवाने आश्चर्यचकित होऊन विचारले. ड्रायव्हरने गाडी चालू केली आणि त्याला उत्तर मिळाले, "होय, तुम्ही जसे वसत आत्माराम शहाणे तसाच मी तुमचा मामा !"

"म्हणजे ? तुम्ही मला कोठे नेत आहा ?" वासुदेवने घाबरून विचारलें.

"अज्ञात ठिकाणीं ऽ" गाण्याच्या स्वरात त्याला उत्तर मिळालें.

वासुदेव आठवूं लागला शारदा शहाणेला आपण तुरुंगात भेटलो तेव्हा तेथें त्या खोलीत हे गृहस्थ होते. हे पोलिसचे अधिकारी तर नाहीत ?

"मी तुम्हाला ओळखीत नाही."

"पण मी तुम्हाला ओळखतों ना !"

"हे किडनॅपिंग आहे का ब्लॅकमेल ?" असे शंकित होऊन विचारणाऱ्या, काही तरी अनिष्ट आहे ही भीति मनात बाळगून अस्वस्थ झालेल्या, या बंध-मुक्त देशसेवकाला घेऊन ती मोटार नवीन वसतींतील एका छोटेखानी बंग-ल्याच्या फाटकात शिरली. समोर कुणी नव्हते. गणेशराव उतरताच झटकन् आत निघून गेले, ड्रायव्हरही चटकन् मोटार घेऊन गेला. व्हराड्यांत उभा राहून क्षणमात्र वासुदेव बुचकळ्यात पडला. ही संधी साधून निसटावें का ? तो परत फिरला आणि पायऱ्या उतरू लागला इतक्यात...

कुणीतरी एक नाजूक एकवलयांकित हात त्याच्या डाव्या स्कंधावर ठेवला. त्यानें वळून पाहिले. त्याला भोवळ आल्यासारखें झालें. त्या शेवटच्या पायरी-वर तो तिच्या पायाशीं मटकन् खाली बसला तीही बसली.

"तुझी सर्व काहीं कशी आतुरतेनें वाट पहात होते !"

"शारदा !"

"चल ना घरात. चल. हे घर आपले, तुझे माझें आहे."

"शारदा!"

"आत चल, तुला थोडें गरम दूध हवें आहे आणि विश्राति हवी आहे."

शांत, शीतल, सुसज्ज आणि निवात अशा एका शय्यागारात तिनें त्याला सक्तीनें विश्राति घ्यावयाला लावलें होतें. मोजरपावलांनी ती आत ये जा करीत होती. बाहेरच्या दिवाणखान्यात गणेशरावजींनी तिला हाक मारली :–
"विद्या, ए विद्याताई—"

"हो आले ह ऽ"

"कुठे आहेस?"

ती लगबग बाहेर निघून गेली. गणेशरावांचें हळू बोलणें शेजारच्या दोज-घरात छान ऐकूं येत होतें.

"विद्या, तुझा तो देशभक्त कुठे फरारी झाला ग? चांगला घरापर्यंत आणला होता कीं!"

"शुक् – हळू बोलाहो ऽ. ते बाजूच्या खोलींतच आहेत." तिनें आपल्या नाकावर तर्जनी ठेवून लटक्या आविर्भावानें म्हटलें.

"झालें ना माझं इथलें काम? आज सायकाळीं गाडीला जाऊं द्यायचं कीं नाहीं आता तरी?"

"अजून नाहीं." लाडीकपणें शीळ घालीत ती निघून गेली.

"शारदा, विचारूं का?" वासुदेवनें ती आत येताच तिला म्हटलें.

"हो हो ऽ –"

"तुझं नाव विद्या?"

"तें माझें सासरचें नाव."

"आणि मला ज्यांनीं आणलें ते गृहस्थ कोण?"

"ते माझे मामेसासरे."

"म्हणजे? शारदा, तूं कुणा भाग्यवंताची –"

"शुक् – विश्रांती घेणाऱ्या माणसांनीं जास्त बोलायचं नसतं." तिनें भ्रुकुटीतर्जन केलें, मिस्किल स्मित केलें, खट्याळ ग्रीवाभंग केला आणि आनंद-भैरवीचे आलाप घेत ती दाराबाहेर पडली.

आकाशवाणीवर गोड संगीताबरोबर तुफानवाताहातेंही कानावर आदळावींत तसें त्याच्या मनांत झालें. काय होत आहे हें कांहींच त्याला कळेना.

काय करावें हेही सुचेना आणि ही स्थिति किती काळ टिकली असती कोण जाणे ! पण—

कांहीं वेळानें दादासाहेब त्याच्या खोलीत आले. त्याना पाहून तो चकित झाला, पण तो उठला, पुढें होऊन त्यानें त्याना नमस्कार केला. त्यानीं त्याला जवळ घेऊन मनःपूर्वक आशीर्वाद दिला.

"मी येथें आहे हें आपल्याला कस कळल ?"

"तू माझ्याच घरीं आहेस "

"हें घर शारदा शहाणेचें नाही ?"

"तिचेंही आहे. तीच माझी नाहींशी झालेली मुलगी विद्या."

आजवरच्या कोणत्याही घटनेनें बसला नसेल एवढा जबर धक्का या निवेदनानें त्याच्या मनाला बसला. कितीतरी वेळ त्याच्या तोंडून शब्द फुटला नाहीं. तो मुकाट्याने खालीं मान घालून त्याच्यासमोर उभा राहिला.

"चाफ्यासारखी गोरी."

"चंदनासारखी गंधवती" दादासाहेब हळूच म्हणाले.

"मला क्षमा करा " त्यानें शेवटी हतबल होऊन म्हटलें.

"वेडा आहेस का ? आपण अपराधी आहों अस तुला वाटतं ?"

दादासाहेबांशीं मनमोकळेपणें झालेल्या भाषणांत त्याला सर्व कांहीं कळून आलं. त्यात पुढें त्याचे मारून मुटकून झालेले मामाही सामील झाले. चोरपावलीं दाराशीं आलेल्या विद्येला त्यानीं आंत बोलावलें, पण ती एखाद्या लहान मुलीप्रमाणें तेथून पळाली.

कांहीं दिवस असेच आनंदाचे गेले. "या आवलीचे लग्न केव्हा उरकता ? कारण त्याशिवाय ती मला येथून जाऊं देत नाहीं !" असें गणेशरावानीं बोलणें केलें. दादासाहेबांनीं वासुदेवकडे विचारणा केली. त्यानें एकदां घरीं उमापतीपूरला जाऊन वडिलांना भेटून येतों असें सांगितलें. विद्याही बरोबर जायला निघाली. एकदा तिच्या मनानें घेतल्यावर मग ती काय राहते ?

शेवटीची लटकती तलवार अजून कोणाच्याच डोळ्यांसमोरून हालली नव्हती; पण विद्येला आपलें वाटत होतें कीं, वासुदेव कांहीं पोलिसच्या दृष्टीनें दादासाहेबांप्रमाणें महत्त्वाचा माणूस नाहीं तेव्हा कांहीं दिवसानीं ती केस

आपोआपच दप्तर दाखल होईल. दादासाहेबानी गणेशराव जवळ बोलून दाखविलें कीं, "परिस्थिती आपल्याला दुःख दाखवायला सजलीच आहे; पण त्यांतूनही आपण मिळतील तितके सुखाचे क्षण हिसकावून घेतले पाहिजेत. आपण इंद्राच्या परंपरेचे आर्य आहो. सोमासाठी लढायचे आणि लढण्यासाठी सोमपान करायचें !"

उमापतीपूरला विद्या वासुदेवाबरोबर गेली ती बरेच दिवस रमली. नदीकिनारी, सकाळ संध्याकाळ दूरवर फिरायला जावें, वाळून खेळावें, पाण्यात डुबावे, एकमेकाच्या अंगावर पाणी उडवावें, हसावे, झाडावर चढावे, फांद्यावरून लोंबकळावे, शिवाशिवी खेळत पळावें, असें करून थकून परत यावें तो देशमुखाच्या वाड्यातील देवघराचा नेवद्य तयारच असे का नाहीं हा हा म्हणता दिवस जाणार ?

वासुदेवने हळूंहळू आपल्या वडिलाना आपला बेत सांगितला. शारदा शहाणे खरा कोण आहे हें कळल्यावर अनंत भटजींना मोठा अचंबा वाटला, पण या थराला गोष्टी आल्यानंतर काहीं बोलावे हेही त्याना योग्य वाटना. ते बोल्लेहि नाहीत. एवढेंच म्हणाले, " सर्वपरीनीं विचार करून कोणतीहि गोष्ट ठरवायला हवी होती, पण तारुण्याचा हा धर्मच नव्हे अस्तु झालें हे ठीकच झालें आपल्या इच्छेप्रमाणें जे काय करायचं तें करा, आमचा आशीर्वाद आहेच " समारंभ कोठे आणि कसा करायचा हे दादासाहेबाच्या इच्छेवर ठेवण्याचे ठरलें. " एक दोन दिवसात परत येऊ " असे पत्रही पाठविलें गेलें

विद्या नेहमीं छायेसारखी वासुदेवाबरोबर असे, पण त्या दिवशी सोमवार म्हणून ती बेल निवडीत बसली होती. " लवकरच परत येईन, इतक्यात आलोच " असे म्हणून वासुदेव बाहेर गेला तो आलाच नाही. रात्रीं दहा वाजेपर्यंत वाट पाहिली आणि मग विद्येचे चित्त अस्वस्थ होऊ लागलें. अपरात्री एक इसम त्याची चिठ्ठी घेऊन आला. त्यांत लिहिले होतेः—
" शेवतीच्या प्रकरणात मला धरलें आहे आणि औरंगाबादेस नेत आहेत."

रडून रडून सुजलेल्या डोळ्यानीं विद्या दुसरे दिवशी एकटीच आपल्या घरीं परत आली. काय झालें असेल हें दादासाहेबांना न सांगतांच कळलें.

लगेच गणेशरावाना तार केली गेली लगेच त्यानीं जामीनअर्ज दिला. आणि सुदैवाने यावेळी त्याच्या पदरी यश बाधले. सहा दिवसानीं जामिनावर सुटून वासुदेव परत आला.

अत्यत कसोशीनें खटला लढवूनही सेशन्समध्यें त्याला दोन वर्षाची शिक्षा झालीच. अपील झालें आणि तीच जमानत कायम राहिली.

दरम्यानचा काहीं महिन्याचा काळ त्या उभयतांना अतिशय वाईट गेला. कशातच स्वास्थ्य राहिलें नाहीं. मनःस्वास्थ्य खलास झालें. एकमेकाच्या सांनिध्याचें सुखसुद्धा काळजीनें कडवट झालें. गणेशराव आपल्याकडून प्रयत्नाची शिकस्त करीत होते त्याना विद्या म्हणेः—

“ माझें सर्वस्व कारणीं पडले तरी चालेल, पण याना वाचवा होऽ ! दोन वर्षाचा काळ, दोन दिवसाचाही विरह आता आम्हाला सोसवत नाहीं ! ”

हायकोर्टानें शिक्षेची मुदत कमी करून सहा महिन्याची केली ज्युडिशिअलने काहीच केलें नाहीं वीस हजाराचे जामीन जप्त होऊन वरती शाहुरावसारखें अज्ञातवासाचें मरण नको असेल तर आपण होऊन हजर व्हायला पाहिजे हातें हातीं अलोट पैसा असून आपण काही करू शकत नाहीं याबद्दल विद्येला परमावधीचें दुःख झालें तिचा नूर पार उतरला, तडफ नाहीशी झाली. ती बारीक दिसू लागली वासुदेव तिला म्हणे, शारदा, तू असें जिवाला लावून घतलेस तर मी आपले दिवस कसे कटू.

दादासाहेबाच्या मनाचें गाभीर्य, समतोलपणा आणि कडवेपणा हे तुरुगातून परत आल्यानतर वाढले होते वासुदेवला विशेष आदरणीय झाले होते. उद्या कारावासात गेलेच पाहिजे अशी कठोर सूचना तेच म्हणून न गहिवरता सागू शकले

“ आपलें धैर्य गळाले आहे. पूर्वीची वीरता या वेळीं आपल्यात उरली नाही.” असे वासुदेवाने त्याच्याजवळ कबूल केलें. तेव्हा ते म्हणाले, “ हे मला कळते. सुखाच्या लालचीने, प्रीतीच्या मोहानें असें मन दुबळें होणें साहजिक आहे. तुला हा कारावास कठीणच जाईल.”

सर्व रात्र वासुदेवानें विद्येचें समाधान करण्यात घालविली. तिची जमिनीला पाठ लागली नाही की डोळ्याला डोळा लागला नाहीं, कीं अश्रूना खळ पडला नाहीं. रात्रीचे चारी प्रहर न सागता निघून गेले आणि दिवस उगवला.

वासुदेवानें स्नान केलें, न्याहारी केली, आणि तो जायला निघाला, पण विद्येने त्याचा हात सोडला नाहीं, म्हटले, "जाशील म्हणे ! अजून सबध दिवस आहे."

तिच्या पाठीवरून हात फिरवून त्यानें म्हटलें,

" हीच का ती शारदा शहाणे ? "

" नाहीं, ही विद्या वाजपेयी. शारदा शहाणे अशी मुळुमुळू रडली नसती; होय ना ? "

उत्तरादाखल त्याने तिला आणखी जवळ घेतले

" पण तू मला अशी गोगलगाय बनवलीस अन् सोडून चाललास ! "

" मग पुन्हा म्हणाना अगदी आतुरतेने वाट पहात बसेन म्हणून "

" नाहीं म्हणत जा ! तू लबाड, फसवा अवसानघातकी आहेस ? "

पण त्याचा हात मात्र तिनें सोडला नाही, अन् म्हटले, " जाशील म्हणे, काय घाई आहे ? "

दोन्ही हातानी धरून ठेवलेला तो हात आपल्या गळयात घेऊन त्याच्या अगावर रेलून ती विचार करीत राहिली वेळोवेळी गालावर ओघळणारे अश्रु पुसण्याचें तिने सोडून दिलें

" वारुणी ह माणमाला अवश करणारे, परिस्थितीला आलेले दैवी सामर्थ्य, प्रकृतीनें योजिलेली किमया, आवरणाची माया, पण ती शारदा शहाणेच्या पराभव करू शकली नाहीं, आणि विद्या वाजपेयीचा पण करू शकणार नाहीं. ती काही कच्च्या मातीची बाहुली नाहा."

याच विचारात तिने डोळे मिटले. रात्रीच्या अविरत जागरणाने तिला गुगी आली. काहीं वेळानें तिचे हात सैल पडले आणि त्याच्या बाहुपाशात ती विश्रामान झोपी गेली.

वासुदेवनें तिला अलगत खालीं ठेवलें, सुकलेल्या अश्रूनीं क्षारलेल्या तिच्या गालाचें ओझरते चुबन घेतले आणि पाऊल न वाजवता तो दाराकडे गेला.

विद्या झोपेंत पुटपुटत होती.

" तू लबाड, फसवा कसाही असलास तरी मी अगदीं आतुरतेने तुझी वाट पाहीन, कारण मी तुझी आहे ........."

— इति शम् —